Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २७३ * ** नागपूर ** | मंगळवार, दिनांक ३१ डिसेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## स्वदेशी डिजिटल चलनाची चाचणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३०:**
भारतीय रिझर्व्ह बँक स्वदेशी डिजिटल चलनाची म्हणजेच सेंट्रल बँक डिजिटल करन्सीची (सीबीडीसी) चाचणी करणार आहे. केंद्रीय बँकेकडून सुरक्षित आणि स्मार्ट पेमेंट पर्याय, तसेच क्रिप्टोकरन्सीचा सामना करण्याचे मोठे पाऊल म्हणूनही याकडे बघितले जात आहे.

सीबीडीसी आरबीआयद्वारे डिजिटल पद्धतीने जारी केले जाते आणि ते डिजिटल वॉलेटमध्ये असते. याद्वारे कुठेही पेमेंट करता येतो. भारतात हे पूर्णपणे कायदेशीर आहे. सध्या क्रिप्टोकरन्सीमध्ये पेमेंट करणे भारतात कायदेशीर नाही.

## अग्राग्रलेख खरीखरी...

## बिहारच्या वावड्या

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार काहीतरी गडबड करणार आणि इंडिया आघाडीच्या सरकारचे गणित बिघडवणार. अशा प्रकारच्या अफवा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पसरवल्या जात आहेत. सध्या आपल्या भारतात हा सोशल मीडिया नावाचा जंतू मोठा धुमाकूळ माजवीत आहे. लोकसभेच्या निवडणुकीनंतर चंद्राबाबू नायडू, नितीश कुमार आपले एकनाथ शिंदे आणि रामविलास पासवान या चार नेत्यांच्या पक्षाच्या पाठिंबामुळे मोदीजींना पंतप्रधान पदावर आरुढ होत आले. हे पक्ष आणि इतर लहान मोठे पक्ष यांचा पाठिंबा घेऊन भारतीय जनता पक्षाच्या संसदीय मंडळाची बैठक न बोलावता मोदीजींनी डायरेक्ट एनडीएचीच बैठक बोलावली होती. त्यात सवार्नुमते नरेंद्र मोदी यांची नेते पदी निवड करण्यात आली. मोदीजींनी आपल्या जुन्या सहकाऱ्यांपैकी एकालाही वगळले नाही. ज्या ज्या वरिष्ठ मंत्र्यांकडे जे जे खाते होते, ते तसेच कायम ठेवून आपले मंत्रिमंडळ बनवले. समजा नितीश कुमार यांनी जरी पाठिंबा काढला. तरी एनडीए सरकारचे काही वाकडे होत नाही. चंद्राबाबू नायडू यांचा भक्कम पाठिंबा कायम असेपर्यंत सरकारला मुळीच धोका नाही. त्यात शिंदे यांचे सात आणि पासवानांचे पाच खासदार सध्या कोणताही धोका पत्करतील असे अजिबात वाटत नाही. अशा परिस्थितीत नरेंद्र मोदी यांच्या सरकारला कसे काय पायउतार करता येईल हा सुद्धा प्रश्नच आहे. कारण याचे गणित म्हणावे तेवढे सोपे नाही. चंद्राबाबू नायडू यांना जे जे पाहिजे आहे, ते ते फक्त हे सरकारच देऊ शकते. जर त्यांनी पाठिंबा काढला आणि सरकार गडगडले नाही. तर त्यांची फाईल तयारच आहे. या अशा परिस्थितीत दररोज वेगवेगळ्या कंड्या पिकवणे आणि जनतेचे मनोरंजन करणे. हे काही तथाकथित पत्रकारांचे दररोजचे काम आहे. आज नितीश कुमार यांच्या बारा खासदारांपैकी किती खासदार त्यांच्याबरोबर आहेत. याचा लेखाजोखा नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्याकडे आहे. हे सरकार कसे चालवावे, त्यासाठी जे काही करावे लागेल ते कसे करावे आणि कोणाला आपल्याकडे कसे वळवावे. याची संपूर्ण योजना भारतीय जनता पक्षाच्या श्रेष्ठींकडे तयार आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या अपमानाचा गवगवा मोठ्या प्रमाणावर झाला. ठिकठिकाणी निदर्शने झाली, आंदोलन झाले. पण त्यामुळे अमित शहा राजीनामा देतील किंवा या सरकारला काही धोका पोहोचेल, अशा भ्रमात कोणी राहू नये. तरीही आज आपल्या देशातील सरकार पडले तर, इंडिया आघाडीत सर्वसंमत नेता कोण असेल. यासाठी लट्ठालट्ठी होणार नाही याची शाश्वती कोण देणार. कारण काँग्रेसचे तोंड पूर्वेकडे आहे. ममता बाईंचे पश्चिमेकडे आहे. आम आदमी पक्षाचे उत्तरेकडे आहे आणि लालूजींचे दक्षिणेकडे आहे. इतर पक्षांचे पाठबळ या परस्परांकडे पाठ असलेल्या पक्षांना मिळेल काय, हा सुद्धा प्रश्न आहे. राहुल गांधी यांना अदानी आणि प्रिय नाहीत. पण इतर अनेक पक्षांना अदानी हा मोठा दानी वाटतो. यामुळे केवळ अदानी-अदानी करून अखिलेश पासून इतर अनेक पक्षांना आपल्याकडे वळवणे काँग्रेस पक्षाला शक्य आहे असे आज तरी दिसत नाही. समजा काठावरचे बहुमत मिळून इंडियाचे सरकार बनले. तरी काठाकाठाने हे नवे काठीबाज मंत्रिमंडळ किती दिवस टिकेल, हा प्रश्न आहेच. याचे मुख्य कारण म्हणजे प्रत्येक पक्ष आपली काठी घेऊनच उभा आहे. अशा सर्व वातावरणात सोशल मीडिया मध्ये नको त्या भानगडी करून, अफवा पसरवून केवळ आपला टीआरपी वाढवण्याचा हा उद्योग दिसतो. दुसरा कोणताही अर्थ यामधून काढता येत नाही. ते काहीही असले तरी समजा दोन-चार पक्षांनी पाठिंबे काढले. तरी भारतीय जनता पक्षाच्या चाणक्यांजवळ प्लॅन ए, प्लॅन बी, प्लॅन सी असे अनेक बहारदार प्लॅन तयार आहेत. त्यामुळेच मनाचे मांडे खाणारे आमचे तथाकथित पत्रकार कल्पना विलासाच्या सुख स्वप्नात दंग राहून जे जे दावे करीत आहेत. ते फसवे आहेत, असे आम्हाला वाटते.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## सरपंच संतोष देशमुख हत्याकांड...

# राजकारण तापले!

**भावाची उच्च न्यायालयात धाव ▪ मंत्री धनंजय मुंडे मुख्यमंत्र्यांच्या भेटीला ▪ आमदार धस आक्रमक**

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. ३०:**
बीडच्या मस्साजोग येथील संतोष देशमुख हत्या प्रकरण तापलं आहे. या प्रकरणी न्याय मिळण्याकरता त्यांच्या कुटुंबीयातील सर्वच सदस्य रस्त्यावर उतरले आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी अद्यापही मोकाट असून त्याला लवकरात लवकर अटक करून त्याच्यावर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

दरम्यान, प्रकरणातील संशयीत आरोपी वाल्मिकी कराड फरार असून, भाजपा आमदार सुरेश धस यांच्यासह विरोधकांनी मंत्री धनंजय मुंडे यांना घेरले आहे . तिकडे, मृत सरपंच संतोष देशमुख यांच्या धाकट्या भावाने न्यायालयात क्रिमीनल रीट याचिका दाखल केली आहे.

या सर्व पार्श्वभूमिवर मंत्री धनंजय मुंडे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. बीडच्या मस्साजोग प्रकरणामुळे अडचणीत सापडलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे हे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या भेटीसाठी पोहोचले. या दोन्ही नेत्यांत काही वेळ चर्चा झाल्याची माहिती आहे. या चर्चेचा तपशील अद्याप बाहेर आला नाही, पण दोन्ही नेत्यांत संतोष देशमुख हत्याकांड व त्यासंबंधी होणाऱ्या कारवाईवर चर्चा झाल्याचा दावा केला जात आहे.

बीडच्या मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांची गत ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेमुळे अवघा महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणात उपमुख्यमंत्री मंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू वाल्मीक कराड यांचे नाव आल्यामुळे या प्रकरणाची संवेदनशीलता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला पोहोचलेत.

दुसरीकडे, सत्ताधारी राष्ट्रवादीचे नेते प्रकाश सोळंके यांनी खंडणी व हत्येतील आरोपी अद्याप मोकाट कसे? त्यांना अजून अटक का झाली नाही? असा सवाल उपस्थित केला आहे.

राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनीही नुकतीच या प्रकरणी धनंजय मुंडे व या प्रकरणातील कथित मास्टरमाईंड वाल्मीक कराडवर टीका केली आहे. वाल्मीक कराडचा मुद्दा अधिवेशनात मांडण्याची ग्वाही दिली.

दुसरीकडे, भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतल्यानंतर या प्रकरणी भाष्य केले . मोठ्या प्रमाणात देण्यात आलेले शस्त्र परवाने रद्द करण्याची व कसून तपास करण्याची मागणी त्यांनी केली आहे.



### क्रिमिनल रेट याचिका दाखल

संतोष देशमुख यांचे धाकटे बंधू धनंजय देशमुख यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली असून क्रिमिनल रेट याचिकेत चार मागण्या करण्यात आल्या आहेत. सरपंच यांचे अपहरण करून हत्या झाल्यानंतर देखील आजपर्यंत सर्व गुन्हेगारांना अटक झालेली नाही, ही गंभीर बाब आहे. याची कोर्टाने दखल घेत योग्य तो आदेश पारित करावा, या घटनेचा मास्टरमाइंड वाल्मिक कराड याच्या अटकेसंदर्भात योग्य ती पावले उचलून वाल्मिक कराडवर मोक्का कायदा, हत्येच्या कलमानुसार एफ.आय.आर. दाखल करावी व पुढील तपास करावा, कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांना मंत्रीपदावरून तत्काळ हटवत वरील संपूर्ण तपास हा निष्पक्ष व्हावा, धनंजय मुंडे व त्यांचे निकटवर्ती वाल्मिक कराड यांचे भूतकाळातील निकटवर्तीपणा, सहचर्य व लागेबांधे यांचा सखोल तपास करून याप्रकरणी तपास यंत्रणेने योग्य तो अहवाल सादर करावा, अशा मागण्या न्यायालयात दाखल याचिकेतून करण्यात आल्या आहेत.

### परवाने रद्द करणार....

शस्त्र परवान्यांची तपासणी सुरू असून गरज नसलेले शस्त्र रद्द करण्याचे आदेश देण्यात आले असल्याची माहिती बीड जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली आहे. कॉवत यांनी बीड येथील गुन्हेगारीवर भाष्य करत कुठले पाऊले उचलले जात आहेत याबद्दल माहिती दिली आहे. शास्त्राच्या बाबतीत जेवढे शास्त्राचे लायसन्स आहेत त्या सर्वांचे अवलोकन सुरू आहे. कलेक्टर साहेबांची पण माझी भेट झाली होती. कायद्यानुसारच ज्या लोकांना शस्त्राची खरंच गरज आहे का आणि ज्यांना शस्त्राची गरज नाही त्यांचे लायसन्स रद्द करण्यात येईल. जे काही युवक सोशल मीडियावर फोटो व व्हिडिओ व्हायरल करतात ते केले तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करू, जिल्ह्यातील गुन्हेगारी मोडून काढण्यात येईल, असा विश्वास कॉवत यांनी व्यक्त केला.

## सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळेच

### रामदास आठवलेंचा स्पष्ट आरोप

■ **वृत्तसंस्था**
**परभणी, दि. ३०:**



केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी आज परभणी येथे सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले.

परभणी हिंसाचार प्रकरणी पोलिसांनी सोमनाथ सूर्यवंशी यांना ताब्यात घेतले होते. त्यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला होता. रामदास आठवले यांनी कुटुंबीयांची भेट घेत नेमके काय घडले होते, याबाबत माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळे झाला, असा आरोप केला. तसेच रिपाइं पक्षाकडून सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना 5 लाख रुपयांची मदत देणार असल्याचेही आठवले यांनी सांगितले.

आठवले म्हणाले, सोमनाथ सूर्यवंशी लातूर जिल्ह्याचा रहिवासी होता. तो परभणीत लॉचा विद्यार्थी होता. त्याचा आंदोलनाशी काही संबंध नव्हता. तो तिथे फोटो काढत होता. पोलिसांनी सांगितले हार्ट अटॅकने मृत्यू झाला. परंतु, त्यांची बॉडी पाहिल्यानंतर अंगावर जखमा असल्याची माहिती आहे. त्यामुळे पोलिसांच्या लॉकअपमध्ये झालेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाला असावा, असा आमचा अंदाज आहे. त्यामुळे सोमनाथ सूर्यवंशी यांना मारहाण करणाऱ्या दोषी पोलिसांवर कारवाई झाली पाहिजे, अशी आमची मागणी आहे, असे ते म्हणाले.

संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाली होती. त्यानंतर युवकांमध्ये संताप होता. परंतु, पकडून मारहाण करणे चुकीचे आहे. लॉकअपमध्ये मारहाण झाली. त्यामुळे सोमनाथचा मृत्यू झाला, असे आमचे म्हणणे आहे. सोमनाथ सूर्यवंशी आणि विजय वाकोडे कुटुंबीयांना मदत मिळावी यासाठी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार असल्याचे आठवले म्हणाले.

संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणारा हा मनोरुग्ण नाही, असा दावा रामदास आठवले यांनी केला आहे. याबाबत मी राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याशी बोलणार असून याप्रकरणी आम्ही नक्की पाठपुरावा करू, असेही आठवले म्हणाले.

## नितेश राणेंची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३०:**
भाजपच्या नितेश राणेंनी केरळची तुलना पाकिस्तानशी करुन तिथल्या लोकांना दहशतवाद्यांशी जोडण्याचे केलेले विखारी विधान हा संविधानातील सिद्धांतांवर थेट हल्ला आहे. मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर त्या पदाच्या तत्वांशी केलेला हा विश्वासघात आहे.

भाजप नितेश राणेंच्या विखारी आणि विभाजनकारी वक्तव्यांचे समर्थन करते का? असा संतप्त सवाल करत, असंवैधानिक वक्तव्य करणाऱ्या नितेश राणेंची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा, अशी मागणी मुंबई काँग्रेस अध्यक्षा आणि खासदार वर्षा गायकवाड यांनी सोमवारी केली.

नितेश राणे हे सातत्याने हिंदू मुस्लीम, पाकिस्तान अशी भाषा वापरून एका समाजाला लक्ष्य करत आहेत. केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार असल्याने त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. नितेश राणेंचा ह्यबॉसह्न ह्यसागरह्न बंगल्यावरून ह्यवर्षाह्नवर गेल्यामुळे त्यांची हिम्मत जास्तच वाढलेली दिसते. परंतु मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी नितेश राणे यांच्या विधानावर खुलासा करावा आणि त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी गायकवाड यांनी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात अशी विभाजनकारी भाषा खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

**नीतेश राणेंनी मर्यादा ओलांडल्या**

मंत्री पदावर बसलेल्या व्यक्तीने सार्वजनिकरित्या बोलताना, वागताना भान बाळगले पाहिजे पण नीतेश राणे यांनी मर्यादा ओलांडल्या असल्याची टीका बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

थोरात म्हणाले, केरळ सारख्या राज्याला मिनी पाकिस्तान म्हणणे, राहुल आणि प्रियांका गांधी यांना मतदान करणारे दहशतवादी असे हिणवणे हे उद्योग फक्त भाजपचे मंत्री करू शकतात! काही सकारात्मक करू शकत नसले की भाजप नेते हिंदू मुस्लिम, भारत पाकिस्तान हाच अजेंडा राबवतात. पण मंत्री पदावर बसलेल्या व्यक्तीने सार्वजनिक रित्या बोलताना, वागताना भान बाळगले पाहिजे पण नितेश राणे यांनी सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत.

## राज्य महिला आयोग ॲक्शन मोडवर

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३०:**
भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात राज्याचे कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांना लक्ष्य करत असताना अभिनेत्री प्राजक्ता माळी यांचा नामोल्लेख केला होता.

परळीत इव्हेंट मॅनेजमेंट पॉलिटिक्सचा वेगळाच परळी पॅटर्न आहे. याठिकाणी मोठ्या सेलिब्रिटी येत असल्याचे सांगून धस यांनी काही महिला कलाकारांची नावे घेतली होती. यानंतर अभिनेत्री प्राजक्ता माळी यांनी महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. या प्रकरणात आता महिला आयोगाने मोठे पाऊल उचलले असून मुंबई पोलिसांना निर्देश दिले आहेत.



अभिनेत्री प्राजक्ता माळी यांची तक्रार आयोग कार्यालयास प्राप्त झाली आहे. त्याचा अभ्यास करून, कायदेशीर बाबी तपासून आवश्यक ती कार्यवाही नियमानुसार आयोग करेल, असे विधान आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी काल केले होते. याबाबत त्यांनी एक्सवर एक पोस्टही केली होती.

## देवाभाऊच्या काठीलाही आवाज नाही : खोत

■ **वृत्तसंस्था**
**बीड, दि. ३०:**




संतोष देशमुख हत्या प्रकरण तापलं आहे. यातच, रयत क्रांती संस्थेचे अध्यक्ष आणि आमदार सदाभाऊ खोत यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास दाखवला आहे.

बीडमध्ये अमानुष पद्धतीने सरपंचाचा खून करण्यात आला. यामुळे महाराष्ट्रातील जनतेची मने सुन्न झाली आहेत. देवाच्या काठीला आवाज नसतो. त्याप्रमाणेच राज्यात देवाभाऊंचं सरकार आहे. त्यांच्याही काठीला आवाज नाही. पण न्याय निवाडा निश्चित होणार आहे. ज्या दिवशी आरोपी पकडले जातील त्यांना या मांडवाखालून जावंच लागेल. ही केस फास्ट टॅग कोर्टात चालवावीह्न, असं सदाभाऊ खोत म्हणाले.

राज्य शांततामय चालवायचं असेल, जनतेला शांततामय व्यवस्था देऊ शकेल तर जनता आपल्यावर विश्वास ठेवेल. सरकारच्या तपासात जे जे येतील, त्यावर कारवाई होईल. तपास आता योग्य दिशेने चालला आहे. सामाजिक क्षेत्रात विविध लोक आणि संघटना काम करत असतात. समाजात गुन्हेगारी वाढू नये म्हणून ते काम करत असतात. देवेंद्र फडणवीस यांनी ही गोष्ट गंभीरपणे घेतली आहे. आपल्याला संवेदनशील मुख्यमंत्री लाभले आहेत, असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## हिमाचलमध्ये अडीच फूट बर्फ

### ३४० रस्ते बंद : २ हजार पर्यटक अडकले



■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ३०:**
जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये सतत बर्फवृष्टी होत आहे. हिमाचलमधील 340 रस्त्यांवरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. चित्कुलमध्ये अडीच फुटापेक्षा जास्त बर्फ साचला असून त्यामुळे अनेक पर्यटक अडकले आहेत.

काश्मीरमध्ये बर्फवृष्टीमुळे श्रीनगर-लेह रस्ता बंद आहे. काश्मीर विद्यापीठाच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. सुमारे 1800 वाहने अडकली आहेत. गंदरबल, सोनमर्ग, पहलगाम, गुंड, बारामुल्लासह अनेक ठिकाणी तापमान उणे 10 ते 22 अंशांवर पोहोचले.

याठिकाणी एक फुटापर्यंत बर्फवृष्टी झाली होती, त्यामुळे सुमारे २ हजार पर्यटक वेगवेगळ्या ठिकाणी अडकले होते. स्थानिक काश्मिरींनी घरे आणि मशिदींचे दरवाजे उघडले. त्यांना राहण्यासाठी जागा, ब्लँकेट, रजाई आणि गरम अन्नपदार्थ देण्यात आले.

उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यात येत्या 24 तासांत 3 हजार मीटरपेक्षा जास्त उंचीवर हिमस्खलन (बर्फ कोसळण्याचा) ऑरेंज अलर्ट आहे. बर्फवृष्टीमुळे बद्रीनाथ राष्ट्रीय महामार्ग पांडुकेश्वर-बद्रीनाथ दरम्यान बंद आहे. अडकलेल्या पर्यटकांचे मात्र हाल सुरू आहेत.

## हत्येचा कट : ५ जणांवर कर्नाटकात गुन्हा

■ **वृत्तसंस्था, कलबुर्गी, दि. ३० :**
भाजप आमदार बसवराज मट्टीमाडू आणि इतर नेत्यांच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी कर्नाटकातील कलबुर्गी पोलिसांनी रविवारी काँग्रेस नेते आणि माजी नगरसेवक राजू कपनूर आणि इतर 5 जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

राजू हे कर्नाटकचे मंत्री प्रियांक खरगे यांचे निकटवर्तीय मानले जातात. मट्टीमाडू, आंदोला मठ येथील सिद्धलिंग स्वामी, भाजप नेते मणिकांत राठोड आणि चंदू पाटील यांच्या हत्येचा कट काँग्रेस नेत्यांनी रचल्याचा दावा करणाऱ्या सचिन पांचाळ नावाच्या ठेकेदाराच्या सुसाइड नोटच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

बिदर येथील सचिन पांचाळ यांनी गुरुवारी रेल्वेसमोर उडी मारून आत्महत्या केली. पोलिसांनी त्यांच्याकडून 7 पानी सुसाइड नोट जप्त केली असून त्यात त्यांनी कपनूर आणि त्याच्या साथीदारांवर जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला होता.

## स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या...

**आ. रईस शेख यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३०:**
बृहन्मुंबई महानगरपालिकेसह राज्यात मुदत संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 7 मार्च 2025 पूर्वी घ्या, अशी मागणी समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी केली आहे.
या मागणीबाबत रईस शेख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एक पत्र लिहिले आहे. देशाच्या आर्थिक राजधानीचा कारभार लोकप्रतिनिधींशिवाय प्रदीर्घ काळ चालणे, हे लोकशाहीसाठी मारक असल्याचे शेख म्हणाले.

## मेलबर्न कसोटीत भारताचा १८४ धावांनी पराभव

■ **वृत्तसंस्था, मेलबर्न, दि. ३० :**
भारतीय संघ सध्या सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या चौथ्या कसोटीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध 184 धावांनी पराभूत झाला आहे.

मेलबर्नमधील या पराभवाचे सर्वात मोठे कारण म्हणजे तिसऱ्या पंचाचा वादग्रस्त निर्णय, ज्यामध्ये यशस्वी जैस्वाल 84 धावा करून बाद झाला. भारताला 22 ओव्हर्स खेळायच्या होत्या आणि मॅच ड्रॉ व्हायला 3 विकेट्स बाकी होत्या. इथून भारताला सामना ड्रॉ करता आला असता. मात्र यशस्वी बाद झाल्यानंतर भारताची खालची फळी विस्कळीत झाली.



आघाडीच्या फळीतील फलंदाजांच्या खराब कामगिरीमुळे टीम इंडियाला सोमवारी या परिस्थितीचा सामना करावा लागला. यशस्वीशिवाय पहिले तीन फलंदाज रोहित शर्मा (9), केएल राहुल (0) आणि विराट कोहली (5) दुहेरी आकडाही गाठू शकले नाहीत.

यशस्वीने ऋषभ पंतसोबत 88 धावांची भागीदारी करून संघाला सुरुवातीच्या धक्क्यातून सोडवले, मात्र पंतने खराब शॉट खेळून आपली विकेट गमावली. यानंतर जडेजा आणि रेड्डी यांच्या विकेटही एकापाठोपाठ पडल्या. यशस्वी जैस्वाल (84 धावा) वादग्रस्त निर्णयामुळे बाद झाला. त्याला मैदानी पंचांनी नाबाद घोषित केले, परंतु तिसऱ्या पंचाने त्याला आऊट दिले. यशस्वीनंतर आकाश दीपलाही (7 धावा) वादग्रस्त आऊट देण्यात आले.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार कमिन्सने एकाच षटकात 2 बळी घेतले. त्याने 3 विकेट घेतल्या. मिचेल स्टार्क, स्कॉट बोलँड, नॅथन लायन आणि ट्रॅव्हिस हेड यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

## संक्षिप्त

# वीजचोरी प्रकरणी दोघांवर गुन्हा

**भिवंडी, दि. ३० : प्रतिनिधी**

भिवंडी शहर आणि ग्रामीण भागात वीज पुरवठा करणाऱ्या आणि बिले वसूल करणाऱ्या टोरंट पॉवर कंपनीकडून वीजचोरांवर कारवाई करण्यात येत आहे.असे असतानाही वीजचोरी आटोक्यात येत नाही. त्यानुषंगाने पुन्हा एकदा टोरंट पॉवर कंपनीच्या एकझ्युक्युटीव्ह कर्मचारी निकिता अशोक मोरे यांच्या पथकाने तालुक्यातील वेहळे गावातील घर क्रमांक ९०२ वर छापा टाकून विजग्राहक मनिषा भालचंद्र म्हात्रे आणि विज वापरणारे भालचंद्र म्हात्रे यांना वीजचोरी करताना पकडले. याप्रकरणी निकिता मोरे यांनी शांतीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोघांनी स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी विजमिटर नं. ४२२५७५४९५ च्या इनकमिंग टर्मिनलमध्ये अवैधरित्या २ कोर काळया रंगाची केबल अनाधिकारे जोडुन विजमिटर बायपास करुन अनधिकृतरित्या विजपुरवठा घेवून २३ नोव्हेंबर २०२३ ते २२ डिसेंबर २०२४ पर्यंत ६ हजार ६७८ युनिट वीज वापरून १ लाख ४९ हजार ६६३ रुपयांची वीजचोरी केली आहे.पोलिसांनी दोघांविरुद्ध वीज चोरीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सपोनि अरुण घोलप करीत आहेत.

# 19 लाखांचा गांजा जप्त

**इंदापूर, दि. ३० : प्रतिनिधी**

इंदापूर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने केलेल्या धडाकेबाज कारवाईत १९ लाख ९२ हजार ६१५ रुपये किमतीचा १३२ किलो ८४१ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत २ आरोपींना अटक करण्यात आली असून, २३ लाख २२ हजार ६१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही माहिती बारामतीचे विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

इंदापूर गुन्हे शोध पथकाला शेटफळ हवेली गावच्या हद्दीत एका मालवाहतूक टेम्पोमधून गांजाची तस्करी होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीनुसार, इंदापूरचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक शंकर राऊत आणि त्यांच्या पथकाने ही धाडसी कारवाई केली. अटक आरोपींमध्ये नवनाथ राजेंद्र चव्हाण (३०, रा. शेटफळ हवेली, ता. इंदापूर) आणि शिवाजी जालिंदर सरवदे (३०, रा. निरा नरसिंहपूर, ता. इंदापूर) यांचा समावेश आहे.

गुन्हे शोध पथकात सहाय्यक पोलिस निरीक्षक जीवन मोहिते, फौजदार पुंडलिक गावडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक स्मिता पाटील, फौजदार दत्तात्रय लेंडवे, हवालदार सलमान खान, अंमलदार गणेश डेरे, तुषार चव्हाण, अंकुश माने, विशाल चौधर, गजानन वानोळे यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.

# कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

**पुणे, दि. ३० : प्रतिनिधी**

येथील प्रकाश (पप्पू) दत्तात्रेय सस्ते (वय ३३, रा. उदापूर, ता. जुन्नर, जि. पुणे) या तरुण शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून घराजवळच असणाऱ्या चिक्कूच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्यामुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

या घटनेबाबत ओतूर पोलिस ठाण्यात प्रकाशचे वडील दत्तात्रय महादू सस्ते यांनी खबर दिली. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, पुढील तपास साहाय्यक पोलिस निरीक्षक लहू थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ओतूर पोलिस करीत आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी, प्रकाश सस्ते हा आपल्या शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय करीत होता. गायी खरेदीसाठी त्याने जमिनीवर व पतसंस्थांकडून कर्ज तसेच काही जणांकडून हातउसने पैसेदेखील घेतले होते. परंतु, सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे तसेच दुध दरामध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झाल्यामुळे त्याचे आर्थिक गणित बिघडत चालले होते. त्याच्याकडे असणाऱ्या १८ गायींपैकी १० गाई एका दिवसात विकल्या होत्या. तरीदेखील कर्जाचा डोंगर काही कमी होत नव्हता. आई, वडील, भाऊ, बायको व दोन लहान मुले यांचे भविष्य कसे होणार याची चिंता त्याला सतावत होती. त्यामुळे प्रचंड तणावात त्याने आत्महत्या करण्याचे हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा अंदाज त्याच्या नातेवाइकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# हंगामाच्या सुरुवातीला आंबेमोहोर महाग

## किरकोळ बाजारात प्रतिकिलोमागे 10 ते 15 रुपयांनी वाढ

**पुणे, दि. ३० : प्रतिनिधी**



सुवासिक आंबेमोहोर तांदळाचा हंगाम सुरू झाला आहे. यंदा हंगामाच्या सुरुवातीला आंबेमोहोर तांदळाच्या दरात १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. सप्टेंबर महिन्यात केंद्र शासनाने बिगर बासमती तांदळावरील निर्यात बंदी मागे घेतली, तसेच २० टक्के निर्यात कर कमी केला. परदेशातून आंबेमोहोर तांदळाला मागणी वाढल्याने हंगामाच्या सुरुवातीला आंबेमोहोर महाग झाल्याची माहिती तांदूळ व्यापाऱ्यांनी दिली.

घाऊक बाजारात प्रतिक्विंटल आंबेमोहोर तांदळाचे आठ ते नऊ हजार रुपये दर मिळाले आहेत. गेल्या वर्षी हंगामाच्या सुरुवातीला सात ते साडेसात हजार रुपये दर मिळाले होते. आंबेमोहोरची सर्वाधिक लागवड मध्य प्रदेशात केली जाते. आंबेमोहोरची ८० टक्के लागवड मध्य प्रदेशात केली जाते. आंध्र प्रदेशात आंबेमोहोरची लागवड केली जाते. यंदा मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेशात लागवड कमी झाली आहे. बिगर बासमती तांदळावरील निर्यात बंदी मागे घेतल्याने व्यापाऱ्यांनी जागेवरच आंबेमोहोरची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. त्यामुळे यंदा हंगामाच्या सुरुवातीला आंबेमोहोरच्या दरात मोठी वाढ झाली आहे, अशी माहिती मार्केट यार्डातील जयराज आणि कंपनीचे संचालक तांदूळ व्यापारी धवल शहा यांनी दिली. डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात नवीन आंबेमोहोर तांदळाची आवक होण्यास सुरवात होते. आंबेमोहोर तांदळाच्या दरात १० ते १५ रुपयांनी वाढ झाली आहे. वर्षभर वापरल्या जाणाऱ्या बासमती, आंबेमोहोर, इंद्रायणी, सुरती कोलम या तांदळापैकीआंबेमोहोरला चांगली मागणी आहे.

### महाराष्ट्रात आंबेमोहोरच्या लागवडीत घट

आंबेमोहोर तांदळाचे सर्वाधिक उत्पादन मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेश या दोन राज्यांमध्ये होते. पुणे जिल्ह्यातील कामशेत, भोर या भागात काही प्रमाणात त्याचे उत्पादन घेतले जाते. काही वर्षांपूर्वी आंबेमोहोरचे सर्वाधिक उत्पादन महाराष्ट्रात घेतले जात होते. तांदूळ लागवड करणाऱ्या पुणे, मावळ, भोर, कामशेत या भागात झपाट्याने शहरीकरण वाढले. जमिनींना चांगला भाव मिळाल्याने शेतकऱ्यांनी जमिनी विकल्या. आंबेमोहोरची लागवड वर्षातून एकदाच घेतली जाते. लागवडीस वेळ लागत असल्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांनी लागवडीकडे पाठ फिरवली. आंबेमोहोर तांदळाची लागवड महाराष्ट्रातून कमी होत चालली आहे.

### आंबेमोहोरला उच्चांकी दर ?

सुगंधी आंबेमोहोर तांदळाचा राजा म्हणून ओळखला जातो. हा तांदूळ महाराष्ट्रात बारा महिने वापरला जातो. विशेषतः पुणे, मुंबई, ठाणे या शहरातून आंबेमोहोर तांदळाला खूप मोठी मागणी आहे. यावर्षी बासमती तांदळाच्या दरांपर्यंत आंबेमोहोर तांदळाचे दर पोहोचतील अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. तसे झाल्यास हा एक विक्रम होईल. त्याचबरोबर आंबेमोहोर तांदळाचे दर यावर्षी कमी होण्याची शक्यता खूप कमी आहे, असे तांदूळ व्यापारी धवल शहा यांनी नमूद केले.

# अखेर स्वप्नील पाटीलसह 8 जणावर उल्हासनगरमध्ये खंडणीचा गुन्हा दाखल

**उल्हासनगर, दि. ३० : प्रतिनिधी**

शहरातील बांधकाम व्यवसायिक व भाजप पदाधिकारी राजा गेमनानी यांच्याकडे एक कोटीची खंडणी मागणाऱ्या स्वप्निल दिलीप पाटील यांच्यावर एकूण ८ जणावर हिललाईन पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकाराने शहरात खळबळ उडाली असून, पाटील व शैलेश तिवारी यांना पोलिसांनी हिललाईन पोलीस ठाण्यात बोलावून चार तास चौकशी केली. उल्हासनगर कॅम्प नं- ५, परिसरात राहणारे राजा गेमनानी हे बांधकाम व्यवसायिक व भाजपचे स्थानिक पदाधिकारी आहेत. त्यांनी गेल्या आठवड्यात काही जण १ कोटीची खंडणी मागत असल्याची तक्रार मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रीसह पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त यांना केली होती. अखेर शनिवारी हिललाईन पोलीस ठाण्यात स्वप्नील पाटील, शैलेश तिवारी यांच्यासह एकूण आठ जणावर खंडणीचा गुन्हा दाखल केला. गेमनानी यांनी तक्रारीत म्हटले की, त्यांचे गायकवाड पाडा व समतानगर कुर्ला कॅंप येथे बाधकामे सुरु आहेत. या बांधकामाबाबत प्रहार जनशक्ती पक्षाचे ॲड स्वप्निल पाटील यांनी राजेश गेमनानी यांना महापालिकेतील नगररचना विभागाच्या दालनात भेटून तुम्ही शंभर कोटीचा टीडीआर घोटाळा केला. आम्ही हिलटाऊन, झलक व कलानी सोसायटी या इमारतीच्या तक्रारी केल्या आहेत. तेव्हा तुमच्या बांधकामाच्या तक्रारी करायच्या नसतील तर तुम्ही मला एक कोटी रुपये द्या. अशी मागणी केली. गेमनानी यांनी पाटील यांना पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला. तेंव्हा पाटील व त्याच्या साथीदारांनी नगरविकास विभागचे प्राधान सचिव आणि संचालक नगररचना विभाग यांना तक्रारी केल्या आहेत. दरम्यान काही दिवसांनी नेताजी चौकात ॲड .स्वप्निल पाटील यांनी माझ्याकडे एक कोटी ऐवजी २५ लाखाची मागणी केली. त्याने सांगितले की मला ही माणसे सांभाळावी लागतात. त्यांनाही पैसे द्यावेत लागतात. असे बोलून वाद मिटवण्यासाठी दबाव टाकला. त्यानंतर ठरल्याप्रमाणे त्यांचा एक माणूस माझ्या बंगल्यावर आला. त्या माणसाला मी एका सोनेरी रंगाच्या पिशवीत पाच लाख रुपये दिल्याचे तक्रारीत नमूद केले असून, उर्वरित २० लाख दुसऱ्या दिवशी देतो असे सांगितले. त्याचे सीसीटीव्ही फुटेज सुद्धा उपलब्ध असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. हिललाईन पोलिसानी भारतीय दंड संहिता कलम ३०८ (३ ) ३०८ (५) ३०८ (४) ३५१ (२) ३५२ ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल जगताप करीत आहेत.

# भिवंडीत घराला आग लावून पती-पत्नीला जिवंत जाळण्याचा प्रयत्न

**भिवंडी, दि. ३० : प्रतिनिधी**

शहरातील निजामपुर पोलिस ठाणे हद्दीत कुरेशी नगर परिसरत पती पत्नी झोपले असताना त्या घराला आग लावून जळून मारण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार शनिवारी मध्यरात्री उघडकीस आला आहे.ज्यामध्ये पती पत्नी भाजल्याने जखमी झाले आहेत. फरिन आसिफ कुरेशी व पती आसिफ कुरेशी अशी जखमी पती-पत्नींची नावे आहेत. दोघेही घरात झोपले असताना मध्यरात्री सुमारे तीन-साडे तीन वाजताच्या दरम्यान हा धक्कादायक प्रकार घडला. मिळालेल्या माहितीनुसार, पती-पत्नी घरात असताना अज्ञात व्यक्तीने घराच्या दरवाज्यावर पेट्रोल टाकून आग लावून दिली. आरोपी फरार झाले. यावेळी हल्लेखोराने घराच्या मागील दरवाजाचीही बाहेरून कडी लावली होती. आगीने पेट घेताच घरात धूर जमा झाल्याने झोपेत असलेले दोघे पती-पत्नी जागे झाले. त्यांनी आरडाओरड करत दुसऱ्या दरवाजाने बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. तो दरवाजाही बाहेरून बंद असल्याने दोघांनी आरडाओरड केल्याने शेजारी जागे होऊन घटनास्थळी धाव घेऊन आग विझवली. या दरम्यान पती-पत्नी हे आग विझविण्याचा प्रयत्न करत असताना भाजल्याने जखमी झाले आहेत. स्थानिकांनी या दोघांना उपचारासाठी भिवंडीतील शासकीय रुग्णालयात दाखल केले असून घटनास्थळी स्थानिक निजामपूर पोलिस व फॉरेन्सिक पथक दाखल होत घटनेचा तपास करत आहेत.



**घाटकोपर वृत्तपत्र विक्रेता सेना/संघाच्या वतीने विक्रेत्यांना मोफत दिनदर्शिका वाटप करण्यात आले. यावेळी प्रकाश वाणी, रवींद्र कोठावदे, दीपक गवळी, प्रकाश गिलबिले, नितीन रेणुसे, दीपक पवार, सचिन भांगे, विपुल गायकवाड, किशोर येवले, धरम जनपांगे, गोपाळ जोशी, चंद्रकांत हळदणकर व मोठ्या संख्येने वृत्तपत्र विक्रेते उपस्थित होते. ऊन, वारा, पाऊस कशाची देखील तमा न बाळगता लोकांच्या घरी वृत्तपत्र, मासिक, केलेंडर लोकांपर्यंत घेऊन जाणाऱ्या विक्रेत्यांना आपण देखील त्यांच्या घरासाठी दिनदर्शिका द्यावी, या प्रामाणिक हेतूने केलेंडर वाटप केल्याची माहिती अध्यक्ष प्रकाश वाणी व उपाध्यक्ष सचिन भांगे यांनी दिली.**

# भिवंडीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी बैठक

## आ.महेश चौघुले यांनी दिला आंदोलनाचा इशारा

**भिवंडी, दि. ३० : प्रतिनिधी**



गेल्या काही महिन्यांपासून शहरातील विविध भागात होणाऱ्या वाहतूक कोंडीवर मार्ग काढण्यासाठी महानगरपालिकेचे आयुक्त आणि वाहतूक पोलीस विभाग यांना वारंवार सूचना करूनही उपायोजना होत नाही. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी वाढत आहेत.या निमित्ताने नुकतीच वाहतूक विभागाच्या कार्यालयात अधिकाऱ्यांसोबत मिटिंग झाली. याबाबत पत्रकारांशी बोलताना आमदार महेश चौघुले यांनी येत्या १५ जानेवारीपर्यंत सुधारणा न झाल्यास भिवंडीकर नागरिकांना सोबत घेऊन आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.भिवंडी शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्याच्या निमित्ताने उपाययोजना करण्यासाठी शहरातील वाहतूक विभागाच्या कार्यालयात आमदार महेश चौघुले यांच्या अध्यक्षतेखाली मिटिंग घेण्यात आली.याप्रसंगी ठाणे वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ, भिवंडी वाहतूक विभागाचे सहा.पोलीस आयुक्त शरद ओहोळ, पोलीस निरीक्षक सुधाकर खोत, भिवंडी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, समाजसेवक अशोक जैन आणि माजी नगरसेवक श्याम अग्रवाल यांच्यासह भिवंडीकर नागरिक उपस्थित होते.भिवंडी शहरात येण्यासाठी व शहराबाहेर जाण्यासाठी अंजूरफाटा ते नदीनाका आणि कल्याणरोड ते साईबाबा बायपास हे दोन रहदारीचे प्रमुख मार्ग असून या मार्गावर नेहमी वाहतूक कोंडी होत असते.यासाठी या मार्गावरील अतिक्रमणे हटवून त्या ठिकाणी रस्ता रुंदीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शहरातील नागरिकांनी पुढाकार घेतला पाहिजे.वाहतूक विभागाला त्यांनी विविध सूचना करून कामात सुधारणा करून निर्णय घेण्यास सांगितले. तसेच उपायुक्त पंकज शिरसाठ यांनी बेशिस्त वाहनचालकांवर नियंत्रण आणण्यासाठी सकाळी आणि सायंकाळी वाहतुकीच्या ठिकाणी अधिकचे कर्मचारी ठेवण्याच्या सूचना स्थानिक वाहतूक अधिकाऱ्यांना केल्या.वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक पोलिसांनी पुढाकार घ्यावा तसेच स्थानिक नागरिकांनी देखील त्यांना सहकार्य करावे. याचा आढावा १५ जानेवारीपर्यंत घेण्यात येणार असून त्यानंतर सुधारणा न झाल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आमदार महेश चौघुले यांनी दिला.

# दिव्यातील वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर बाह्यवळण रस्ते तात्काळ बनवण्याची मागणी



**ठाणे, दि. ३० : प्रतिनिधी**

ठाणे महानगर पालिका हद्दीतील वाढत्या लोकसंख्येचे शहर असलेल्या दिवा शहरात वाहतूक कोंडीचा पूर्णतःहा बोजवारा उडाला आहे. दिवा शहरात स्टेशन परिसर व दिवा चौकात प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याने दिवेकर मेटाकुटीला आले आहेत. परिणामी अनेक वाहन चालकांसह पादचारी, अबाल वृद्धाना ये-जा करण्यास अनेक अडचणीना सामना करावा लागत आहे. तसेच दिवा चौकात मुख्य बस थांबा असल्याने वाहतूक कोंडीत भर पडते तसेच अनेक वेळा रुग्णवाहिका देखील अडकून राहतात परिणामी दिवेकरांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. दिवा शहरात वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर जिव्हाळा हॉल ते टाटा पॉवर मार्गे ग्लोबल शाळेच्या दिशेने जाणारा रस्ता व जिव्हाळा हॉल ते साळवी नगर मार्गे साबेगाव जाणारा रस्त्याचे काम तातडीने करण्याची मागणी होत आहे. सदर रस्ता झाल्यास वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल व दिवेकरांना वाहतूक कोंडीतून मोकळा श्वास घेता येईल या दृष्टीने भाजप युवा मोर्चाचे सतिश केळशिकर यांनी निवेदनाद्वारे सदर रस्ता तात्काळ बनविण्याची मागणी दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त भालचंद्र घुगे यांना केली आहे.

# आर्थिक फसवणूक रोखण्यासाठी ग्राहक जागरूकता अभियानात प्रत्येकाने सहभागी व्हावे- मुख्य महाप्रबंधक, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

**नाशिक, दि. ३० : प्रतिनिधी**




आजच्या डिजीटल युगात आर्थिक फसवणूकीच्या घटना दिवसेंदिवस वाढत असून त्या रोखण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पाऊले उचलली आहेत. जोपर्यंत आपली स्वतःची वैयक्तिक फसवणूक होत नाही तोपर्यंत व्यक्तीला घटनेचे गांभीर्य लक्षात येत नाही. म्हणूनच प्रत्येकाने सजगपणे, जाणीवपूर्वक ऑनलाईन, डिजीटल व्यवहार करण्याची गरज आहे. त्यासाठी आपल्या आजूबाजूच्या व्यक्तींनाही जागरूक करणे, सतर्क करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आर्थिक मोह, प्रलोभने ही आर्थिक गुन्हेगारीची मुख्य कारणे आहेत त्याचा वेळीच प्रतिबंध करा, असे प्रतिपादन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मुख्य महाप्रबंधक संजय कुमार यांनी केले.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि., नाशिक, विश्वास को-ऑप बँक लि., नाशिक व जनसेवा को-ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'एकात्मिक लोकपाल योजना-2021' 'ग्राहक जागरूकता अभियान' या योजने अंतर्गत एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा गोखले एज्युकेशन सोसायटीच्या शरमन हॉल (गुरूदक्षिणा हॉल), कॉलेज रोड, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. या कार्यशाळेला नाशिक जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे संचालक, अधिकारी, कर्मचारी तसेच ग्राहक असे 250 हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते.मा. संजय कुमार पुढे म्हणाले की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायमच जनतेच्या आर्थिक सुरक्षतेसाठी, ग्राहक हितासाठी, आर्थिक कल्याणासाठी कटीबद्ध आहे. त्याच जाणिवेतून ग्राहक जागरूकता अभियान चळवळ आरबीआयने सुरू केली आहे, त्यात सर्वांनी सहभागी व्हावे व डिजिटल युगाला सामोरे जाण्यासाठी आपल्या ज्ञानात भर टाकावी. नाशिक तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था संदीप जाधव म्हणाले की, नागरी सहकारी बँकांचे गुणवत्तापूर्ण ध्येय म्हणजे ग्राहकांचे परमोच्च समाधान करणे, ग्राहकांना न्याय मिळवून देणे हे आहे. परंतु आजकाल ठेवीदार, गुंतवणूकदार संस्थेच्या सक्षमतेकडे बघत नाहीत. त्यामुळे आर्थिक संकट ओढवते, त्यासाठी आर्थिक साक्षरता, सुरक्षितता ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

नाशिकच्या गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके म्हणाले की, आजच्या काळात आर्थिक गुन्हे, सायबर गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. त्याचा प्रतिबंध करण्यासाठी सतर्कता ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आर्थिक सुबत्ता असलेल्या वर्गाची आर्थिक फसवणूक मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यासाठी सर्व सामान्यांपर्यंत ग्राहक जागरूकतेची चळवळ पोहोचवावी व काही संशयित लिंक, कॉल्स आढळल्यास त्वरीत पोलीसांशी संपर्क साधावा. दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक्स् असोसिएशन लि., मुंबईचे अध्यक्ष विश्वास ठाकूर म्हणाले की, आर्थिक फसवणूकीच्या गुन्ह्यांची व्याप्ती वाढत आहे. आपल्या बँक व्यवहारांवर नियमितपणे लक्ष ठेवावे तसेच अधिकचे खाते बंद करणे कधीही चांगले. कुठल्याही अनोळखी लिंकला, मेसेजला लगेच प्रतिसाद देणे कटाक्षाने टाळावे. डिजीटल व्यवहारांबाबत कोणतीही माहिती, शंका समाधान मिळविण्यासाठी बँकांशी संपर्क साधावा, जाणकारांशी चर्चा करावी. आर्थिक समुपदेशक म्हणून प्रत्येकाने भूमिका बजवावी. येणारा काळ हा आर्टीफिशिअल इंटेलिजन्स (एआय) चा असून एआय वापराचे अनेक धोकेही आपल्याला माहिती असतील. एआय तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक हॅकर्स आपल्याच कुटुंबियांचा आवाज, त्यांचा मोबाईल क्रमांकावरून आपल्याशी संपर्क साधतात व आपली आर्थिक फसवणूक करतात. अशा धोक्यांना वेळीच ओळखून आपल्याला डिजीटल युगात वाटचाल सुरू ठेवायची आहे. दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप बँक्स फेडरेशन लि., मुंबईचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा म्हणाले की, सुरक्षित आर्थिक व्यवहार करण्यासाठी डिजीटल सुविधेचा जबाबदारीने वापर करावा. सुरक्षितता, संयम यांची सांगड घालून व्यवहार करणे काळाची गरज आहे. आर्थिक व्यवहार व सावधानता ह्या दोन बाजू आहेत त्याचा अंगीकार करावा. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सुचनांचा वेळोवेळी अभ्यास करावा.

बँक ऑफ महाराष्ट्राचे एलडीएम भीमा लवटे म्हणाले की, आर्थिक फसवणूक झाल्यानंतर तात्काळ पोलीसांकडे तक्रार नोंदविणे गरजेचे असते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सायबर सिक्युरीटी धोरणांची अंबलबजावणी करणे आवश्यक आहे. असोसिएशनचे व्यवस्थापक रामलाल सानप यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ते म्हणाले की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या 'एकात्मिक लोकपाल-2021' योजनेअंतर्गत कार्यक्षम, प्रभावी आणि जलद तक्रार निवारण यंत्रणेच्या उपलब्धतेबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनचे कार्याध्यक्ष वसंतराव खैरनार यांनी सुत्रसंचालन केले. याप्रसंगी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे उपमहाप्रबंधक अनिरूद्ध मलिक, सहाय्यक व्यवस्थापक आकाश काबरा, सहाय्यक विजय जाधव तसेच जनसेवा सहकारी बँकेचे अध्यक्ष व माजी उपमहापौर गुरमित बग्गा उपस्थित होते. यानंतर अनिरूद्ध मलिक व आकाश काबरा यांनी लोकपाल योजने संदर्भात पीपीटीच्या माध्यमातून सादरीकरण केले. तसेच उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांच्या शंकेचे समाधान केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जनसेवा सहकारी बँकेचे व्यवस्थापक अनिल गायकवाड यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानात

## सात बाबींसाठी मोठे अनुदान

### अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. ३० :** सन २०२४-२५ करीता एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानात शीतगृह, शीतखोली, प्राथमिक प्रक्रिया केंद्र, एकात्मिक पॅक हाऊस, रेफ्फर व्हॅन, रायपनिंग चेंबर, पूर्व शीतकरण गृह अशा सात बाबींसाठी मोठे अनुदान दिले जाते. जिल्ह्यातून अधिकाधिक शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी केले आहे.

बाब व अनुदान पुढीलप्रमाणे : शीतगृह-प्रकल्प खर्च ८ ते १० हजार प्रति मे.टन (५ हजार मे.टन क्षमतेसाठी) जास्तीत जास्त देय अनुदान १ कोटी ७५ लक्ष रू. आहे. अर्थसहाय्य स्वरूप किंमतीच्या ३५ टक्के (बँक कर्जाशी निगडित), शीतखोली-प्रकल्प खर्च १५ लक्ष प्रति युनिट (३० मे. टन क्षमतेसाठी) अनुदान जास्तीत जास्त ५ लक्ष २५ हजार रूपये, अर्थसहाय्य स्वरूप किंमतीच्या ३५ टक्के (बँक कर्जाशी निगडीत).

प्राथमिक प्रक्रिया केंद्र-प्रकल्प खर्च २५ लक्ष प्रति युनिट, जास्तीत जास्त देय अनुदान १० लक्ष रू., अर्थसहाय्य स्वरूप किंमतीच्या ४० टक्के (बँक कर्जाशी निगडीत), एकात्मिक पॅक हाऊस-प्रकल्प खर्च ५० लक्ष प्रति युनिट, जास्तीत जास्त देय अनुदान १७.५० लक्ष रू., अर्थसहाय्य स्वरूप किंमतीच्या ३५ टक्के (बँक कर्जाशी निगडीत).

शीतवाहन/रेफर व्हॅन- २६ लक्ष प्रति युनिट (९ मे.टन क्षमतेसाठी), जास्तीत जास्त देय अनुदान ९ लक्ष १० हजार रू., अर्थसहाय्य स्वरूप किंमतीच्या ३५ टक्के (बँक कर्जाशी निगडीत), रायपनिंग चेंबर-प्रकल्प खर्च १ लक्ष प्रति मे.टन (३०० मे.टन क्षमतेसाठी), जास्तीत जास्त देय अनुदान १०५ लक्ष, अर्थसहाय्य स्वरूप किंमतीच्या ३५ टक्के (बँक कर्जाशी निगडीत). पूर्व शीतकरण गृह-प्रकल्प खर्च २५ लक्ष रूपये (६ मे.टन क्षमतेसाठी), जास्तीत जास्त देय अनुदान ८.७५ लक्ष रू., अर्थसहाय्य स्वरूप किंमतीच्या ३५ टक्के (बँक कर्जाशी निगडीत) इतके आहे. योजनेत लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकरी, उद्योजक यांनी http://mahadbt.maharashtra.gov.in या कृषी विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी करणे बंधनकारक आहे. या योजनेत वैयक्तिक शेतकरी, उद्योजक यांना लाभ घेता येईल.

संकेतस्थळावर पूर्वसंमतीसाठी घटकांर्गत लक्षांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास अर्जाची निवड ऑनलाईन लॉटरी पध्दतीने करण्यात येईल. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत प्रकल्पाधारित योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस.एस. किरवे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

# डॉ. मनमोहन सिंग यांना अकोला येथे श्रद्धांजली

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि.३० :** अकोला गुरुद्वारा प्रबंधक कमिटीतर्फे गुरुसिंग सभा येथे रविवारी दिवंगत डॉ. मनमोहन सिंह यांना श्रद्धांजली वाहताना सर्वपक्षीय सदस्य व विविध संस्था, समाजाचे प्रतिनिधी Divya Marathiअकोला गुरुद्वारा प्रबंधक कमिटीतर्फे गुरुसिंग सभा येथे रविवारी दिवंगत डॉ. मनमोहन सिंह यांना श्रद्धांजली वाहताना सर्वपक्षीय सदस्य व विविध संस्था, समाजाचे प्रतिनिधी देशाचे माजी पंतप्रधान स्व. डॉ. मनमोहन सिंग यांना रविवारी २९ डिसेंबरला गुरुद्वारा गुरु सिंग सभा येथे गुरुद्वारा प्रबंधक कमिटी आणि सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. शीख परंपरेनुसार, कार्यक्रमाची सुरुवात कीर्तनाद्वारे हजूरी रागी भाई रवींद्र सिंग यांच्या जत्थ्याने केली. प्रास्ताविकात सरदार गुरमीत सिंग गोसल यांनी स्व मनमोहन सिंग यांच्या देशाप्रती आणि सामान्य जनतेच्या हितासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. आपली साधी राहणी आणि देशाचे हित आणि जन सामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी केलेले कार्य ऐतिहासिक असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी सर्वपक्षीय शोकसभेच्या आयोजनाची जबाबदारी प्रभजीत सिंग बछेर, संदीप पुंडकर, रिची कोहली, अनमोल सिंग बछेर यांनी पार पाडली. सभेला माजी मंत्री अजहर हुसेन, शिवसेनेचे नेते माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया, काँग्रेसचे आमदार साजिद खान पठाण, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बालमुकुंद भिरड, माजी महापौर सुरेश पाटील, माजी महापौर मदन भरगड, माजी आमदार बबनराव चौधरी, काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते डॉ. अभय पाटील, महेश गणगणे, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक अमानकर, शहराध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे, माजी नगराध्यक्ष हरिश अलिमचंदानी, माजी उपमहापौर निखिलेश दिवेकर, कपिल रावदेव बीजीई सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंह मोहता, 'आयएमए'चे अध्यक्ष डॉ. राजेंद्र सोनवणे, रेड क्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. किशोर मालोकार आदींनी श्रद्धांजली अर्पण केली, अशी माहिती पत्रकाद्वारे कळवण्यात आली आहे.





# संत श्री गजानन महाराजांनी धर्माचरणाचा मार्ग दाखवला :आ. सुलभा खोडके यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ३१:** उठा उठा सकळ जन । करा गजाननाला वंदन । गा त्याच्यापुढे गा ऱ्हाणं । वाट दावील तो तुम्हा... संत गजानन महाराज विजयग्रंथ पारायण सोहळा म्हणजे 'सेवा हीच साधना' या व्रताचा अंगीकार करत भाविक भक्तांच्या माध्यमातून सर्वधर्म, धार्मिक, लोकोपयोगी कार्य विलक्षण श्रद्धा भावनेने पार पाडले जात आहे. हे सेवा कार्य करत असताना या पिढीला नैतिकतेच्या बळावर सेवाभावनेतून व तळमळीतून सर्वतोपरी सहयोगाने केले जाणारे हे कार्य अतुलनीय व अनुकरणीय असे आहे, असे प्रतिपादन आ. सुलभा खोडके यांनी केले. अंबागेटच्या आतील नीळकंठ व्यायाम मंडळाद्वारे आयोजित संत गजानन महाराज विजयग्रंथ पारायण सोहळा कार्यक्रमात भेटीप्रसंगी त्या बोलत होत्या. या वर्षी नीळकंठ व्यायाम मंडळाच्या वतीने संत गजानन महाराजांच्या काचुर्णा येथील चांदीच्या मूळ चरण पादुकांचा व निमोणगाव, शिर्डी येथील श्री साईबाबांच्या मूळ चरण पादुकांच्या दर्शन सोहळ्याचे आयोजन केले आहे. नीळकंठ चौकाच्या प्रांगणात आयोजित या पारायण सोहळ्याला सुमारे ५०० भाविकांनी हजेरी लावली आहे.

सर्वप्रथम आ. सुलभा खोडके यांच्या हस्ते पुणे-चिंचवडस्थित सुरभी सुनील ढगे या चिमुकलीचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तर बहुविध सेवा कार्याच्या माध्यमातून जनहित व जनजागृती लोककल्याण व आदर्शतेचा पायंडा घालणाऱ्या नीळकंठ व्यायाम मंडळ व नीळकंठ महिला मंडळाच्या वतीने आ. सुलभा खोडके यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. धर्म व विज्ञानाची यथायोग्य सांगड, नैतिक मूल्य जोपासण्यास अनुकूल वातावरण निर्माण करणे, प्राचीन व प्रगल्भ अशा संस्कृतीचे महत्व जाणून घेत त्यांची अर्वाचीन चालीरितीशी सांगड घालणे, राष्ट्रीय हित जोपासण्याचा संकल्प करतानाच मानवतेतून धर्म व अध्यात्माला आलेली मरगळ झटकणे या बहुउद्देशीय व्यापक प्रयत्नांची पूर्ती करत नीळकंठ व्यायाम मंडळ वाटचाल करत असल्याचेही या वेळी सांगण्यात आले. संत गजानन महाराज विजयग्रंथ पारायण सोहळ्यासाठी निळकंठ व्यायाम मंडळाच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

**परंपरागत वेशभूषा**

सोहळ्यात परंपरागत वेशभूषा धारण करून महिला व पुरुषांनी या सामूहिक पारायण पारायण केले. प्रत्येक अध्याय समाप्तीनंतर श्री अनंत कोटी ब्रह्मांड नायक महाराजाधिराज योगिराज परब्रम्ह सच्चिदानंद शेगाव निवासी भक्त प्रतिपालक समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय असा जयघोष करत श्रींचे स्मरण केल्याचे दृश्य यावेळी दिसून आले.

**सुरभी ढगे या चिमुकलीस २१ अध्याय मुखोद्गत**

पुणे-पिंपरीचिंचवडस्थित सुरभी सुनील ढगे या चिमुकलीने २१ अध्याय मुखोद्गत पठण करत सर्वांचे लक्ष वेधले. आपल्या सुमधुर वाणीतून या चिमुकलीने श्री गजानन विजयग्रंथात असलेले एकूण २१ अध्याय, २ हजार ओव्या तसेच प्रत्येक ओवीची रचना स्वतंत्र असून सुसंबद्ध अशा पद्धतीने सादर केली.

# नववर्षासाठी चिखलदरा सज्ज

## वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ३६ तास 'वन वे'

## हॉटेल्समध्ये दरवाढीची शक्यता



■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ३१:** सरत्या वर्षाला निरोप देऊन नवीन वर्षाच्या स्वागताची प्रत्येकालाच उत्सुकता लागलेली आहे. दरम्यान हजारो पर्यटक थर्टी फर्स्टचा आनंद घेण्यासाठी विदर्भाचे नंदनवन अर्थात मेळघाट, चिखलदरा येथेही जात असतात. यंदाही चिखलदऱ्यात थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी जाणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षणीय राहणार असल्याचा अंदाज आहे. दरम्यान दोन दिवसांपूर्वीच (दि. २९) चिखलदऱ्यातील मोठ्या हॉटेल्समधील ६० टक्के खोल्यांचे बुकिंग झाले आहेत. तर मध्यम हॉटेल्स, 'होम स्टे'मध्येसुद्धा पर्यटकांनी काही प्रमाणात बुकिंग केले आहेत. चिखलदरा हे थंड हवेचे ठिकाण आहे. मागील चार ते पाच दिवसांपासून ढगाळ वातावरण असल्यामुळे चिखलदऱ्यातही तापमान वाढले होते. मात्र रविवारपासून चिखलदऱ्यात पारा घसरला असून, दिवसाही गुलाबी थंडी जाणवत आहे. विशेष म्हणजे ३१ डिसेंबरला थंडी आणखी वाढणार आहे. मात्र थंडी असली तरीही पर्यटकांना वातावरणाचा आनंद घेता येणार आहे. अनेक पर्यटक ३१ डिसेंबरला सायंकाळी चिखलदरा येथे दाखल होतात. रात्रभर त्याच ठिकाणी मुक्काम करून १ जानेवारीला परतीचा प्रवास करतात. त्यामुळे ३१ डिसेंबरला रात्री चिखलदऱ्यात चिक्कार गर्दी राहते. अनेकदा तर ऐनवेळी पोहोचलेल्या पर्यटकांना राहण्यासाठी व्यवस्था करण्याचे आव्हान उभे होते. त्यामुळेच अनेक पर्यटक आगाऊ बुकिंग करून ठेवतात. चिखलदऱ्यात सद्य:स्थितीत सात ते आठ मोठ्या स्वरुपाचे, ३० ते ३५ मध्यमि सातशे पर्यटक थांबू शकतात भचिखलदऱ्यात मध्यम व मोठ्या स्वरूपाचे जवळपास ५० ते ६० हॉटेल्स आहेत. या सर्व हॉटेल्ससह इतर काही शासकीय विभागांचे विश्रामगृह या सर्व ठिकाणांवर मिळून सुमारे सातशे ते एक हजार पर्यटक मुक्काम करू शकतील, इतकी व्यवस्था सध्या चिखलदरा येथे आहे. काही हॉटेल्स वगळता अनेक हॉटेलमध्ये ऑनलाइन बुकिंगच्या तुलनेत ऐनवेळीच हॉटेल बुक करण्यावर पर्यटकांचा भर असतो. - मनोज शर्मा, सचिव, चिखलदरा हॉटेल ओनर असोसिएशन. चिखलदऱ्यात ३१ डिसेंबरला जवळपास ५ ते ७ हजार पर्यटक दाखल होण्याचा अंदाज आहे. गर्दी वाढल्यामुळे कोणतीही अप्रिय घटना घडू नये म्हणून चिखलदरा पोलिसांनी ३५ पोलिसांची अतिरिक्त कुमक बोलावली आहे. तसेच स्थानिक पोलिस असा सुमारे ५० ते ५५ पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त राहणार आहे. याचवेळी चिखलदऱ्यातील सर्व गर्दी होणाऱ्या सात ते आठ ठिकाणी आम्ही फिक्स पॉइंट लावणार आहोत, अशी माहिती चिखलदराचे ठाणेदार पीआय आनंद पिदुरकर यांनी दिली आहे.

**'थर्टीफर्स्ट'पर्यंत १०० % बुकिंग होणार**

चिखलदऱ्यात असलेल्या बहुतांश हॉटेलमध्ये थर्टी फर्स्टसाठी सद्य:स्थितीत सरासरी ५० ते ६० टक्के बुकिंग झालेले आहे. सोमवार आणि मंगळवारी सायंकाळपर्यंत १०० टक्के बुकिंग होईल. सध्या चिखलदऱ्यात थंडीसुद्धा चांगली आहे. त्यामुळे पर्यटक थर्टी फर्स्टच्या आनंदासोबतच वातावरणाचाही आनंद घेऊ शकतात. तसेच नववर्ष साजरे करू शकतील.

**श्रीवर्धन करंडे, अध्यक्ष, चिखलदरा हॉटेल ओनर असोसिएशन.**

# वसंतनगर परिसरात नाली तुंबल्याने दूषित पाणी रस्त्यावर



■ महासागर प्रतिनिधी,

**पुसद, दि. ३० :** वसंतनगर ते खडसे मैदानपर्यंतच्या रस्त्या लगत असलेल्या नाल्या सध्या कचऱ्याने तुडुंब भरलेल्या आहेत. या नाल्यातील दूषित पाणी रस्त्यावर वाहत आहे. यामुळे पायी चालणाऱ्यांसह वाहनधारकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. नगरपालिकेच्या घनकचरा व आरोग्य विभागाकडून त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होताना दिसून येत आहे.

वसंतनगर परिसरातील मुख्य रस्ता असल्याने रस्त्यावरून अनेक शाळा, महाविद्यालये सुद्धा आहेत. सोबतच दवाखाने सुद्धा आहे. त्याशिवाय मोठ्या प्रमाणात रहिवासी देखील राहतात. अशा परिस्थितीत रस्त्याच्या दोन्ही कडेला असलेल्या नाल्या सध्या कचऱ्याने तुडुंब भरलेल्या आहेत. नाल्यांमध्ये दूषित सांडपाणी वाहत नसल्यामुळे डासांचे प्रमाण देखील वाढले आहे. दूषित पाणी रस्त्यावर येत असल्यामुळे रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. लहान मुले आजारी पडत आहेत. त्यामुळे नगरपालिकेच्या घनकचरा व आरोग्य विभागाने नाली सफाईची मोहीम हाती घ्यावी. तसेच या भागात औषध फवारणी करावी, अशी मागणी वाहनधारकासह रहिवाशांकडून सध्या केली जात आहे.

# ओला, सुका कचरा वर्गीकरण करण्यास माजी सदस्यांचा विरोध

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ, दि.३१:** शहरातून दररोज संकलीत करण्यात येणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी ओला आणि सुका अशा दोन प्रकारांमध्ये कचरा वर्गीकरण करणे गरजेचे आहे. त्यामुळे पालिकेच्या वतीने त्यासंदर्भात नियोजन करण्यात आले आहे. तसेच यासाठी कारवाई करण्याची देखील तयारी प्रशासनाने केली आहे.

मात्र, आता पालिकेच्या माजी सदस्यांनी एकत्र येत यास विरोध करत पालिकेने तूर्तास कारवाई थांबवावी, अशी गळ घातल्याने पालिका प्रशासनही कारवाईसंदर्भात विचारात पडलेले दिसत आहे. यवतमाळ शहरातून प्रतिदिन संकलीत करण्यात येणारा कचरा टाकण्यासाठी सावरगड येथील कचरा डेपोचा वापर करण्यात येत होता. मात्र, काही वर्षांपूर्वी या डेपोमुळे दुर्गंधी आणि रोगराई पसरत असल्याचा आरोप करत गावकऱ्यांनी हा कचरा डेपो बंद केला. तेव्हापासून शहरातून संकलीत करण्यात येणारा कचरा पालिकेच्या वतीने शहराभोवती किरायाने घेतलेल्या जंगलातील शेतांमध्ये नेत टाकण्यात येतो.

त्यामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. त्यावर उपाययोजना म्हणून पालिका प्रशासनाने संकलीत केलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी घरा-घरातू संकलित करण्यात येणारा कचरा ओला आणि सुका अशा दोन प्रकारांमध्ये विभागून संकलीत करण्यात यावा, यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. तशा सूचना घनकचरा संकलित करणाऱ्या वाहनांवरील कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. नव्या वर्षात सुरूवातीपासूनच यासंदर्भात सक्तीने कारवाई करण्याची तयारी पालिका प्रशासनाने केली होती. मात्र, कचरा विलगीकरण करण्यामुळे घंटागाडी चालकाला कचरा संकलित करण्यासाठी वेळ लागून वाहन चार-चारदिवसांनी येत असल्याने नवा कंत्राट निघेपर्यंत नागरिकांकडून पूर्वीप्रमाणेच कचरा संकलित करण्यात यावा, अशी मागणी पालिकेच्या माजी सदस्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

आता या पत्रामुळे सुरू केलेल्या या मोहिमेला पालिका प्रशासन आता कशा पद्धतीने सुरू ठेवते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तोडगा काढण्यासाठी प्रशासन लवकरच घेणार बैठक पालिकेच्या वतीने करण्यात येत असलेल्या घनकचरा संकलनासाठी सध्या कमी वाहनांचा वापर करण्यात येत आहे. अशा स्थितीत पालिकेकडून ओला व सुका कचरा वेगवेगळा करुन संकलित करताना विलंब होत आहे.

त्यातच पालिकेच्या माजी सदस्यांनी निवेदन दिल्याने आता या संदर्भात काय उपाययोजना करावी, हे ठरवण्यासाठी लवकरच बैठक घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

**गुलाम नबी आझाद महाविद्यालय मुख्यद्वारालगत कचऱ्याचे ढिगारे**

**पुसद :** नगरपालिकेच्या हद्दीतील गुलाम नबी आझाद महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारालगतच घाणीचे साम्राज्य पसरले आहे. परिसरात राहणाऱ्यांकडून महाविद्यालयाच्या सुरक्षा भिंतीजवळ कचरा आणून टाकला जात आहे. यामुळे येथे कचऱ्याचेढीग साचले असून सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. वसंतनगरातून दुधे ले -आऊटकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यालगत असलेल्या गुलाम नबी आझाद महाविद्यालयामध्ये दररोज हजारो विद्यार्थी ये-जा करतात. अशा परिस्थितीत महाविद्यालयाच्या सुरक्षा भिंतीजवळच रहिवाशी कचरा आणून टाकत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे तसेच या भागातील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

साचून राहत असलेल्या कचऱ्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरत असून मोकाट जनावर येथे टाकलेला कचरा इतरत्र पसरवत आहे.

# सात महिन्यांपूर्वीच काम केलेल्या रस्त्यावर खड्डे, अपघाताचा धोका



■ महासागर प्रतिनिधी,

**पुसद दि. ३१:** नगरपालिकेच्या हद्दीतील वसंतनगरमधील मुख्य रस्त्यात सध्या खड्डे पडण्यास सुरुवात झाली आहे. सहा ते सात महिन्यांपूर्वीच या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे. असे असतानाही रस्त्यावर खड्डे पडू लागल्याने या रस्त्याच्या कामाच्या दर्जावर शंका उपस्थित केली जात आहे. तसेच नागरिकाकडून संताप देखील व्यक्त केला जात आहे. वसंतनगरमधून बसस्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्याचे सहा महिन्यांपूर्वीच डांबरीकरणाचे काम करण्यात आले आहे. या रस्त्याचे डांबरीकरण होताना अनेकवेळा कामावर शंका उपस्थित करत या भागातील काही नागरिकांनी नगरपालिकेकडे तक्रारी देखील केल्या होत्या. निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण होत असल्याचा आरोप रहिवाशांनी करत ठेकेदाराकडून काम थांबवून इतर ठेकेदाराला देण्याची मागणी त्यावेळी केली होती. परंतु, नगरपालिकेच्या बांधकाम विभागाने त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. असे असताना रस्त्यालगत वाहणाऱ्या नालीचे पाणी रस्त्यावर येत असल्यामुळे सध्या त्या रस्त्यात खड्डे पडू लागले आहे. यामुळे वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. लाखो रुपये खर्च करून डांबरीकरणाचे काम ठेकेदाराने नियमानुसार केले नसल्याचा आरोप रहिवाशांकडून केला जात आहे. रस्त्याच्या बाजूलाच नाली असल्यामुळे त्या नालीचे सांडपाणी इतर नालीत काढून देण्याची मागणी देखील रहिवाशांकडून होत आहे.

**बांधकाम विभागाकडून प्रतिसाद मिळेना**

ठेकेदारामार्फत झालेल्या कामाची चौकशी करून त्या ठेकेदाराकडून पुन्हा डांबरीकरण करून घ्यावे, अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे. याविषयी नगरपालिकेच्या बांधकाम विभागातील संबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांकडून प्रतिसाद मिळाला नाही.

# अविष्कार स्पर्धेमधील ४७ विद्यार्थी राज्यस्तरसाठी पात्र



■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ३१:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये नुकत्याच पार पडलेल्या विद्यापीठस्तरीय अविष्कार स्पर्धेत विविध गटातून ४७ विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना समारोप समारंभात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य संचालक डॉ. अजय लाड, अविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. वैशाली धनविजय, आयोजन सचिव डॉ. गजानन मुळे उपस्थित होते.

अविष्कार स्पर्धेत ह्युमॅनिटीज, लँग्वेज अँड फाइन आर्ट वर्गवारीमध्ये आयशा शेख, वेदांत भेंडकर, नेहा मापारी, रोहिणी राठोड, शेख उमराशुमयम अन्सार अहेमद, कुंजन जवंजाळ, पंढरी गोरे व संगीता गुडधे, कॉमर्स, मॅनेजमेंट अँड लॉ वर्गवारीत प्रशांत भोयर, प्रभव कलांगे, प्रवीण चोरखोड, गायत्री देशमुख, रोहण बुंदेले, अक्षय देशमुख व सौरभ वगारे, प्युअर सायन्स वर्गवारीत पीयूष चौधरी, रेणुका नळे, यश लवणकर, प्रणव झोरे, श्रावणी बागवे, अर्पिता जिसकार, वैभव ढवळे व हर्षा देशमुख, ॲग्रीकल्चर अँड ॲनिमल हजबंडरी गटात ऋषिकेश देवीकर, सिद्धी ठाकूर, साहिल गावंडे, साक्षी चावट, गायत्री टेकाडे, स्नेहल हेटे, कल्पेश देशमुख व हेमंत मळेकर, इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी वर्गवारीत राम रोडे, तेजस काळे, संगम पारधी, मानसी करनाडे, सुमेर तिवारी, श्रेयस रुल्हे, विवेक टोंगे व रुपाली काळे, मेडिसिन अँड फार्मसी वर्गवारीत शुभम राठोड, लक्ष्मी मुळ्ये, आयुषी झोपे, साक्षी केचे, निकिता तेलरांधे, भाग्यश्री आउटी, सचिन बोरीकर व समिता रक्षित हे विजयी ठरले. समारंभात कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते तसेच मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थी, विद्यार्थिनींना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. सर्व पात्र विद्यार्थी, विद्यार्थीनी कोकण येथे होणाऱ्या राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नेतृत्व करणार आहेत.


**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**

**Tender Notice**

Commissioner NMC invites Offline tenders for the following works. These tenders can be submitted by the registered contractors of NMC. The Terms and conditions of tenders are available on tender form. The sale and purchase of Tender form at E.E.(Slum) Office, 5th Floor, B-Wing NMC, Nagpur.

| Tender No. | Name of Work | BOQ Cost (Rs.) |
|---|---|---|
| 1 | Repairs & Maintainance of Toilets Blocks at Various Places in Pr. No. 04. | 417816 |
| 2 | Repairs Maintainance of Toilet Blocks at Padole Nagar, Panther Nagar in Pr. No. 23. | 417619 |
| 3 | Repairing, Maintainance of Toilet blocks at Various Places in Pr. No. 25. | 417977 |
| 4 | Const. of Single Seated Latrine at Bharatwada Village in Pr. No. 04. | 419181 |

**Note –** **1)** EMD (Rs.) 4200/-. **2)** Tender sale & submission start date : 31/12/2024. **3)** Tender submission end date/sales end date : 14/1/2025 up to 5.00 pm . **4)** Date of opening of Tender (if possible) date : 15/1/2025 up to 5.00 pm . **5)** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in uploaded tender document.

**Advt No. 822 PR Date 30.12.2024**

**Executive Engineer (SLUM)**
**N.M.C.,Nagpur**

P/N/24/822

**Change Of Name**


MY OLD NAME WAS **RAJJAK WADSARIYA.** NOW MY NEW NAME IS **RAZZAK MANDANBHAI WADSARIYA.**
**ADD :** PATEL NAGAR FAWARA CHOUK BRAMHAPURI CHANDRAPUR 441206

MY OLD NAME WAS **SHILPA WADHWANI.** NOW MY NEW NAME IS **SHILPA WADHWANI.**
**ADD :** FLAT NO. B 704, ANNEXE SOCIETY HADAPSAR ROAD PUNE

MY OLD NAME WAS **RASIDABEGAM ABBDUL GANI.** NOW MY NEW NAME IS **RASHIDA BABBU PATHAN.**
**ADD :** VAIBHAV NAGAR WARD NO.3 WANADONGRI NAGPUR

MY OLD NAME WAS **FIROJ JAMSHERKHAN PATHAN.** NOW MY NEW NAME IS **FIROZ KHAN JUMSHIR KHAN PATHAN .**
**ADD :** PLOT NO 155 BHARATWADA ROAD GOURI NAGAR NAGPUR MAHARASHTRA - 440035

MY OLD NAME WAS **BIRJEES AALYA SHAIKH.** NOW MY NEW NAME IS **BIRJEES AALIYA WAQUAR SHAIKH.**
**ADD :** METRO ELEGANCE P NO 170 F NO 202 JAFAR NAGAR KATOLROAD NAGPUR MAHARASHTRA - 440013




# चला संकल्प करूया..!

नवीन वर्ष सुरू होण्यासाठी काही दिवस उरले आहेत. नवे वर्ष सर्वांसाठी नवीन स्वप्ने, उमंग घेऊन येते. आपल्यामध्ये असलेल्या काही सवयी मागे टाकून नवीन वर्षात नव्या सवयी आत्मसात करण्यासाठी लोक नववर्षात नवे संकल्प करतात. एक जानेवारीला नवीन वर्षाची सुरुवात होणार आहे. नवीन वर्षात अनेक जण नवी संकल्पना करतात.

---------------

सौ. चैताली संगोपाल वरघट
मूर्तिजापूर, जि अकोला.
9834583685

संकल्प करून हे संकल्प पूर्ण झाले तर त्याचा आनंद वेगळाच असतो. हे संकल्प सहसा आपले जीवन सुधारण्यासाठी वाईट सवयी बदलणे होय. जसे नवीन वर्षात आपले वाढलेले वजन कमी करणे, अधिक अभ्यास करणे, अधिक पैसे वाचविणे किंवा निरोगी जीवनशैलीचा अवलंब करणे होय. संकल्प हे यासारखे ध्येय साध्य करण्याबद्दल असतात. नवीन वर्ष आणि नवीन वर्षा सोबत नवीन आपणही होऊन जाणे होय. आपल्या वागण्यात, स्वभावात, सवयी यामध्ये बदल करणे होय. याचमुळे नवीन वर्षाचे संकल्प करणे हा नवीन वर्ष सुरू करण्याचा एक उत्तम मार्ग आहे.

जवळ जवळ नवीन वर्ष हे बदल करण्यासारखे आहे. आपण आपले नवीन संकल्प तयार करू शकतो आणि ती कशी पूर्ण करायची याचा मार्ग सेट करू शकतो. नवीन वर्ष आपल्याला स्वतःची प्रगती करण्यास, त्यावर काम करण्यास मदत करतात. आपण कधी असे काही साध्य केले आहे. जे पूर्वी अशक्य वाटत होते. तेव्हा आपण स्वतःला वचन देता. आणि ते पाडतांना तेव्हा एक वेगळीच फिलिंग येते. ती फिलिंग म्हणजे जीवन सुधारण्याचे स्वतःकडून प्रॉमिस घेणे आणि ते टार्गेट साध्य करणे ही एक उत्तम भावना आहे. ही फीलिंग्स ही भावना आपल्याला पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित करते. ते कस काहीही असो, आपण आपल्या मनात ठरवून काहीही करू शकतो. हे स्वतःला सिद्ध करण्यापेक्षा अजून काही उत्तम काय असू शकतो.

आपल्या सर्वांना माहित आहे की आपण आपले संकल्प पूर्ण करण्याच्या चांगल्या हेतूने सुरुवात केली होती. परंतु काही लोक वर्षाच्या पहिल्या दिवशी किंवा मग काही कालावधीतच आपले लक्ष बदलतात. पुन्हा एकदा आपण आपल्या जुन्या सवयी मध्ये अडकतो. नवीन संकल्प करणे चांगली गोष्ट आहे. कारण ते आपल्याला भविष्याकडे अधिक आशावादी पाहण्यास मदत करते. ज्यामुळे आपण एखादी चांगली कृती करण्यास प्रवृत्त होता.

नवीन वर्षात कोणते टार्गेट आपल्याला पूर्ण करायचे आहे. याची लिस्ट बनवली तर आपल्याला त्या दृष्टिकोनातून काम करायला एक दिशा मिळते. त्यामुळे भविष्यासाठी लागणाऱ्या तरतुदी कराव्या व करायलाही परवानगी मिळते. याशिवाय आपण आपला वेळ, पैसा आणि शक्ती वाया घालवू शकणार नाही. या गोष्टी योग्य त्या ठिकाणी सत्कारणी लागतील.

नवीन वर्षात आपल्या आयुष्यात काहीतरी चांगलं घडावं असं प्रत्येकालाच वाटते. प्रत्येक जण आशा करतो की नवीन वर्ष आपल्यासाठी चांगले जाईल. पण प्रयत्न केल्या शिवाय हे शक्य नाही. त्यामुळे काहीतरी नवीन करण्यासाठी त्याची अंमलबजावणी करावी लागणार आहे. आपण या नवीन वर्षात महत्त्वाचे संकल्प करायला हवेत. त्यामुळे आपल्याला कधीही जास्त समस्येचा सामना करावा लागणार नाही.

नवीन वर्षाच्या सुरुवातीला स्वतःला वचन द्या की तुम्ही दररोज सकारात्मकतेने पुढे चालत रहाणार. मनात सकारात्मक भावं रहाणार. सकारात्मक विचार माणसाला पुढे घेऊन जातात. यामुळे मनाला आनंद होतो. त्यामुळे प्रत्येक समस्या आणि आव्हानाकडे संधी म्हणून पाहिले पाहिजे. प्रत्येक समस्येवर उपाय शोधण्यावर भर दिला पाहिजे.

नवीन वर्षाच्या सुरुवातीपासून दररोज किमान 30 मिनिटे व्यायाम करावा. नियमित व्यायाम शरीरासाठीच नाही तर आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. हे आपले मन तणावमुक्त आणि सकारात्मक बनवते. यावर्षी मी माझ्या सर्व कामांना आणि जबाबदाऱ्यांना अधिक प्राधान्य देणारं असा संकल्प करा.

आपल्या वेळेचा दुरुपयोग न होता, सदुपयोग करून काहीतरी अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्न करा. दर आठवड्याला किमान एक नवीन गोष्ट शिका. यामुळे जिज्ञासा आणि ज्ञान वाढेल. जगाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलेल. मानवी मन नेहमी नवीन गोष्टीबद्दल उत्सुक असते आणि आपल्यात आत्मविश्वास वाढवत असते. बऱ्याच वेळा व्यस्त जीवनशैलीमुळे आपण

आपल्या प्रियजनांपासून दूर जाऊ लागतो. अशा परिस्थितीत या वर्षात स्वतःला संकल्प करा की तुम्ही तुमच्या कुटुंबाला वेळ दयाल. त्याचबरोबर त्यांच्या बरोबर चांगले क्षण घालवाल. जर तुमचे तुमच्या कुटुंबासोबतचे नाते चांगले नसेल तर तुम्ही नेहमी त्यांची आठवणं काढत रहाणार. त्यामुळे तुमच्या कुटुंबाशी चांगले संबंध असणे महत्त्वाचे आहे. नवीन वर्षाचे संकल्प पूर्ण करण्यासाठी मोठ्या बदलास सुरुवात करणे कठीण आहे. त्यामुळे रोज एक तास अभ्यास करायचा असेल तर पहिल्या आठवड्यात 20 ते 30 मिनिटे अभ्यासाची सुरुवात करा आणि हळूहळू वेळ वाढवा. अशा छोट्या छोट्या टप्प्यात त्याचे तुकडे करा. अशी छोटे छोटे पावले उचलून आपण आपला संकल्प पूर्ण करू शकतो.

आजकाल प्रत्येकाची लाईफस्टाईल खूप बिझी झालेली आहे. म्हणूनच आपण आपल्या ध्येयाला प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. बरेच लोक व्यायाम किंवा ध्यान करण्याचा संकल्प करतात पण सुरुवातीला त्यासाठी वेळ काढणे अवघड असते. त्यामुळे वेळेचे योग्य व्यवस्थापन करा. नवीन वर्षाच्या संकल्प पूर्ण करण्यासाठी रोज किंवा आठवड्यातून थोडा वेळ काढा. अनेक वेळा संकल्पाच्या पूर्ततेत अनेक अडथळे, अपयश येऊ शकते.

जर आपण रोज आपल्या ध्येयावर काम करू शकत नसाल तर ते अपयश म्हणून निराश होऊ नका. लवचिक व्हा. आणि समजून घ्या, की लहान अपयश देखील आपल्या संकल्पाचा भाग आहे. अपयशातून शिका, पुन्हा काम करा. आपले संकल्प पूर्ण करताना आपण स्वतःवर दबाव आणू नये. हे महत्त्वाचे आहे.

कधीकधी आपण आपल्या इच्छामुळे स्वतःवर खूप दबाव टाकतो. त्यामुळे आपण थकतो. निराश होतो. वेळोवेळी स्वतःला विश्रांती देऊन आपण आपल्या कर्तुत्वाचे कौतुक करून आपण आपला संकल्प पूर्ण करण्यासाठी पुढे जात रहा. अनेकदा आपण नववर्षाच्या उत्साहात असतो. त्यामुळे या वर्षात आपण जे काही करू त्या सर्वांमध्ये आपण यशस्वी होऊ असा आपला संकल्प किंवा अपेक्षा असू शकते. या संकल्पामुळे आपण स्वतःवर अनावश्यक दबाव टाकतो असं होता कामा नये. कारण भविष्यात आपल्यासाठी हानिकारक ठरू शकते.

नेहमी फार मोठे टारगेट ठेवले जाते. उदाहरणार्थ, मी परीक्षेत पहिला नंबर मिळवीन त्यापेक्षा मी अभ्यास नियमित करून माझे मार्क्स वाढवण्याचा मनापासून प्रयत्न करीन हा संकल्प निश्चितच जास्त योग्य आहे. असे केल्यामुळेच आपण आपल्या लक्षाकडे पोहचू शकतो. त्यामुळे नवीन वर्षात प्रत्येक कार्यात यश मिळवण्याचा संकल्प करण्याची चूक करू नका. स्वतःच्या मनाशी जो संकल्प करतो तोच सफल होतो. ही गोष्ट जवळपास सगळ्या निर्णयाला लागू होते.

या सर्वांमध्ये अजून एक महत्वाची गोष्टी म्हणजे आपण वापरत असलेला आपला मोबाईल. सतत मोबाईल बघणे बंद करा. महत्त्वाच्या कामाच्या वेळीच मोबाईलची स्क्रीन ऑन करा. मोबाईल बघण्याचाही एक वेळ निश्चित करून ठेवा. मोबाईल जास्त करून आलेले कॉल घेण्यासाठी आणि कॉल करण्यासाठीच वापरा. रात्री दहा ते सकाळी सात वाजेपर्यंत मोबाईल हातात घेऊ नका. रात्री पूर्ण आठ तासाची झोप घ्या. यामुळे आपली झोप पूर्ण होणार आणि आपले आरोग्य ही चांगले राहणार. घरात सतत मोबाईल बघू नका तर खाली वेळेला एखादे चांगले पुस्तक वाचा. यामुळे घरातील मुलांनाही पुस्तक वाचण्याची आवड निर्माण होईल. तसेही मोठ्यांच अनुकरण ही लहान मुलं करत असतात. मोबाईलचे फायदे आणि तोटे सतत मुलांना सांगत रहा आणि जास्तीत जास्त मुलांना त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष द्यावे हे सांगा.

नवीन वर्षाला नवा संकल्प करावा असे आपल्या मुलांनाही आवर्जून सांगा. यामुळे मुलांनाही चांगल्या सवयी लागतील. चला तर मग नवं वर्षाला संकल्प करूया आपले स्वप्नं पूर्ण करूया..!

*चला संकल्प करूया*
*स्वप्नांना बळ देऊया*
*आकांक्षांची नवी शिखरे*
*नव्या नजरेने नव्याने पाहूया ..*

●●●●

## नववर्ष
# नव्या सुरुवातीची सोनेरी संधी


संत राजिंदरसिंहजी महाराज

आपण सर्वजण हे चांगल्या प्रकारे जाणून आहोत की, संपूर्ण जगभरात नवीन वर्षाचा उत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला जातो. ही एक अशी ही वेळ असते जेव्हा आपण आपल्या जीवनातील सामान्य कामकाजाला काही काळ थांबवून, आपले लक्ष त्या कार्यांकडे करतो, ज्यामुळे आपणांस आनंद मिळतो. ही अशी वेळ असते जेव्हा आपण गतवर्षाला मागे सोडतो आणि येणा ?या नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या आनंदाने करतो.

जर आपण आपल्या मागील वर्षावर एक नजर टाकली असता, आपणांस असे दिसून येईल की, व्यतीत केलेल्या वर्षांमध्ये अशा अनेक वेळा आपल्या जीवनात ईश्वरीय कृपेचा आपण अनुभव केला असेल. ठीक याच्या विपरीत आपल्या जीवनात अनेक वेळा असे सुद्धा प्रसंग येतात की, जेव्हा आपण कठीण आणि दुःखी-कष्टी परिस्थितीतून सुद्धा जातो.

अशावेळी आपल्याला या गोष्टींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे की, प्रत्येक गुलाबाला काटे सुद्धा असतात, त्यांची ही भूमिका आहे आणि त्यांचेही स्वतःचे असे महत्त्व आहे. ठीक अशाच प्रकारे आपल्याही जीवनात सुख आणि दुःख दोन्हीही येतात, जर आपण या बाबींवर विचार केला तर आपणांस असे दिसून येईल की, आपण प्रत्येक परिस्थितीत शांत व सुखी राहू शकतो.

नववर्ष फक्त भौतिक आनंदच साजरा करण्याची वेळ नसून, ही आपल्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याची सोनेरी संधी सुद्धा आहे. आपण असे पाहतो की नवीन वर्षारंभी बरेचसे लोक चुकीच्या सवयी सोडून चांगल्या सवयी धारण करण्याचा सुद्धा संकल्प करतात. हा एक असा प्रसंग आहे जेव्हा ते स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. काही लोक धूम्रपान न करण्याचा प्रण घेतात, जेव्हा की बरेचसे लोक असेही असतात की जे मांसाहार सोडून शाकाहारी जीवन जगण्याचा संकल्प करतात, काही लोक असेही असतात जे क्रोध न करण्याचा, सर्वांशी प्रेमपूर्वक व्यवहार करण्याचा आणि इतरांची मदत करण्याची प्रतिज्ञा घेतात.

बरेच विद्यार्थी असे असतात की जे इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत आपला अभ्यास अधिकाधिक करण्याचा संकल्प करतात. लक्षपूर्वक पाहिले असता, प्रत्येक जण आपापल्या स्तरावर आपल्या जीवनात काही चांगले करण्याचा प्रयत्न करतात.

नववर्षाच्या याप्रसंगी खूप कमी लोक असे असतात की जे अशी प्रार्थना करतात की, नववर्षात आपण अधिक अधिक अध्यात्मिक विकास करूया.

जर आपण सुद्धा नववर्षी आध्यात्मिक रूपाने प्रगती करू इच्छित असु तर, यासाठी आपल्या दिनचर्येला लक्षपूर्वक पहावे लागेल. अशा मध्ये आपला हाच प्रयत्न असावा की आपण असे कोणतेच कार्य करू नये जे आपणांस या उद्देशापासून दूर करेल. अध्यात्मिक रूपाने प्रगती करण्याकरिता आपणांस ध्यानाभ्यासाला धारण करावे लागेल. याकरिता आपणास वर्तमान काळातील एखाद्या पूर्ण संतांकडून ध्यानाभ्यास करण्याची पद्धती शिकावी लागेल. आपण आपल्या दिनचर्येमध्ये ध्यानाभ्यास शामिल करतो, तेव्हां आपणांस आपल्या अंतरी प्रभुच्या ज्योति आणि श्रुति चा अनुभव होतो. या शिवाय आपल्याला असाही अनुभव येतो की, प्रभुची जी ज्योत मला प्राणशक्ती देत आहे, तीच इतरांमध्ये सुद्धा आहे. त्यानंतर आपणास या बाबीवर पक्का विश्वास होतो की, आपण सर्वजण एकाच पिता-परमेश्वराची संतान आहोत.

येणाऱ्या या नवीन वर्षी आपण हे समजून घेतले पाहिजे की, आपण जो प्रयत्न करू तो कितीही थोडा जरी असेल, आपण जे पाऊल उचलू ते जरी कितीही छोटे का असेना ते आपल्याला आपल्या ध्येयाजवळ घेऊन जाईल. नववर्षी आपला असा प्रयत्न असावा की, आपला भूतकाळ जरी कसाही असेल, परंतु आपले भविष्य कलंक रहित राहील. आपण आपले विचार सदैव सकारात्मक ठेवूया याकरिता अध्यात्मिक मार्गच आपल्याला मदतगार होऊ शकतो.

चला तर! आपण सुद्धा नववर्षी अध्यात्मिक प्रगती करण्याचा संकल्प करूया, कारण की आपल्या अंध्यात्मिक प्रकृती वरच आपली शारीरिक व मानसिक प्रकृती निर्भर आहे. जर आपण अध्यात्मिक मार्गावर चालण्याचा प्रण केला तर, आपण असे पाहू की याने केवळ आपले अध्यात्मिकच नाही तर शारीरिक व मानसिक प्रकृती सुद्धा ठीक होईल. नववर्षाच्या प्रसंगी आपण आपल्या चुकांकडे लक्ष न देता, एका आशावादी अंतःकरणाने एका नवीन वर्षाची सुरुवात करूया. आपणा सर्वांना जीवनातील सफलतेकरिता खूप खूप शुभेच्छा!

●●●●

# ब्रह्मांड किती मोठे प्रचंड?

हबल एडविन पॉवेल हे अमेरिकन ज्योतिर्विद व खगोल भौतिकीविद होते. आकाशगंगेबाहेरील - गांगेय बाह्य ज्योतिषशास्त्राचे ते संस्थापक मानले जातात. त्यांनी दीर्घिकांचे - तारामंडलांचे शोध लावले व त्यांचे वर्गीकरण केले. तसेच ते प्रसरणशील विश्व या विश्वाविषयीच्या प्रतिकृतीचा पहिला पुरावा देणारे ज्योतिर्विद आहेत.

हबल यांचा जन्म २० नोव्हेंबर १८८९ रोजी मार्शफील्ड, मिसूरी, अमेरिका येथे झाला. शालेय विद्यार्थी असताना ते हुशार होतेच, शिवाय त्यांना खेळांतही रस होता. मात्र त्यांना शिकागो विद्यापीठातील ज्योतिर्विद जॉर्ज एलरी हेल यांच्या प्रेरणेने ज्योतिषशास्त्र विषयाची आवड निर्माण झाली. याच विद्यापीठात त्यांनी गणित व ज्योतिषशास्त्र या विषयांतील पदवीपूर्व पदवी मिळविली. तसेच तेथे ते उत्कृष्ट मुष्टियोद्धा म्हणूनही प्रसिद्ध होते.

मात्र पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी ज्योतिषशास्त्र व कसरतीचे खेळ यांतील लक्ष काढून घेतले आणि ऑक्सफर्ड विद्यापीठात ऱ्होड्स स्कॉलर म्हणून कायद्याचे अध्ययन सुरू केले. कायद्याची बीए पदवी सन १९१२ मध्ये मिळविल्यावर ते केंचुकी येथे वकिली करू लागले. तथापि वर्षभरातच ते वकिली व्यवसायाला कंटाळले.

अनेक विषयांत गती असलेल्या हबल यांनी अखेरीस ज्योतिषशास्त्रात काम करण्यावर लक्ष केंद्रित करावयाचे ठरविले. ते शिकागो विद्यापीठ व त्याची विस्कॉन्सिन येथील यर्कीझ वेधशाळा येथे परत आले. तेथे त्यांनी एडविन ब्रांट यांच्या मार्गदर्शनाखाली आकाशगंगेतील नवतारे आणि तेजस्वितेत बदल होणारे चल तारे- नवतारा व अतिदीप्त नवतारा यांचा अभ्यास केला.

हबल यांनी ज्योतिषशास्त्रातील पीएचडी पदवी सन १९१७ मध्ये मिळविली. पहिल्या महायुद्धात भाग घेतल्यानंतर ते कॅलिफोर्नियातील पॅसाडीनालगत असलेल्या मौंट विल्सन वेधशाळेत दाखल झाले. तेथे त्यांनी आकाशगंगेबाहेरच्या ज्योतिषशास्त्रीय आविष्कारांशी निगडित संशोधन करण्यास सुरुवात केली. त्यांनी ३० डिसें.१९२४ रोजी आकाशगंगे खेरीज इतर दीर्घिकाही अस्तित्त्वात असल्याचे जाहीर केले.

आपल्या सुर्यकुलात असणारा सूर्य हा एक मध्यम आकाराचा तारा आहे. अशा आपल्या सूर्याएवढ्या अंदाजे सुमारे १०० अब्ज ताऱ्यांच्या समुहास आकाशगंगा असे म्हणतात. याचा आकार प्रचंड मोठा असतो. अशा अंदाजे सुमारे १०० अब्ज आकाशगंगांच्या समुहास दिर्घिका असे म्हणतात. अशा १०० अब्ज दिर्घिका या ब्रम्हांडात असण्याची शक्यता आहे. यावरुन ब्रम्हांड किती प्रचंड मोठे आहे, याची आपल्याला कल्पना येईल.

आकाशगंगा या कोट्यवधी तारे असलेल्या दीर्घिकेत सूर्यही आहे. मात्र आकाशात दिसणाऱ्या सर्व अभ्रिका आकाशगंगेचा भाग नाहीत, हा शोध हबल यांनी सन १९२२-२४ या काळात मौंट विल्सन वेधशाळेतील निरीक्षणांद्वारे लावला. त्यांनी १,३०० खगोलीय क्षेत्रे निवडून शेकडो छायाचित्रे घेतली. विशिष्ट अभ्रिकांमध्ये १२ सेफीड चल तारे असल्याचे त्यांना आढळले. सेफीड हा आवर्ती चल ताऱ्यांचा उपगट असून त्यांचा तेजस्वीपणा काळानुसार स्थिर राहत नाही आणि त्यांच्या तेजस्वीपणातील बदलाचा आवर्तकाल त्यांचा अंगभूत माध्यम- सरासरी तेजस्वीपणाशी निगडित असतो.

हबल यांनी मौंट विल्सन वेधशाळेतील २५४ सेंमी दूरदर्शकाद्वारे घेतलेल्या वेधांवरून व आढळलेल्या ताम्रच्युतींवरून पर्यायाने दूर जाण्याच्या गतीवरून अंतर, भासमान प्रत व निरपेक्ष प्रत यांच्यातील परस्परसंबंधाचा उपयोग केला. सेफीड तारे लाखो प्रकाशवर्षे अंतरावर म्हणजे आकाशगंगेच्या पलीकडचे असल्याचे निश्चित झाले.

ज्या अभ्रिकांमध्ये हे सेफीड तारे आहेत त्या प्रत्यक्षात आकाशगंगेहून भिन्न अशा दीर्घिकाच असल्याचे त्यांनी दाखवून दिले. उदा.देवयानी अभ्रिकेतील एम-३१ ही दीर्घिका आकाशगंगेच्या फारच बाहेर म्हणजे साडेसात लक्ष प्रकाशवर्षे इतकी दूर आहे. उलट आकाशगंगेचा व्याप फक्त एक लक्ष प्रकाशवर्षे एवढा आहे. हा शोध त्यांनी १९२४मध्ये घोषित केला व त्यामुळे ज्योतिर्विदांना विश्वाविषयीच्या त्यांच्या कल्पना तपासून पाहणे भाग पडले.


आकाशगंगेबाहेरच्या या दीर्घिका शोधून काढल्यावर लवकरच हबल यांनी सन १९२६मध्ये या दीर्घिकांचे त्यांच्या आकारानुसार वर्गीकरण करण्याचे आणि त्यांचे तारकीय घटक व त्यांच्या तेजस्वीपणाचे आकृतिबंध यांच्या समन्वेषणाचे कामही सुरू केले. त्यांनी दीर्घिकांचे १) विवृत्ताकार, २) साध्या चक्रभुजीय, ३) दंडयुक्त चक्रभुजीय आणि ४) रचनारहित हे चार प्रमुख वर्ग केले- संदर्भ ज्योतिषशास्त्र. दीर्घिकांचा अभ्यास करताना त्यांनी पुढील दुसरा लक्षणीय शोध १९२७ मध्ये लावला. या दीर्घिका उघडपणे आकाशगंगेपासून दूर जात आहेत आणि त्या जितक्या अधिक दूर असतात तितक्या अधिक वेगाने दूर जात आहेत.

या शोधाचे असंख्य मतितार्थ- अटकळी वा अन्वय होते. दीर्घकाळ विश्व स्थिर अवस्थेत असल्याचे मानले जात होते. या शोधामुळे विश्व प्रसरण पावत असल्याचे दिसून आले. त्यांनी दीर्घिकांची गती व त्यांचे अंतर यांचे गुणोत्तर हा स्थिरांक असेल अशा प्रकारे विश्व प्रसरण पावत असल्याचे शोधून काढले. या स्थिरांकाला त्यांच्या नावावरून हबल स्थिरांक हे नाव पडले.

विश्व प्रसरण पावत असल्याचे हबल यांचे मत बरोबर होते. मात्र त्यांनी गणिताने काढलेले हबल स्थिरांकाचे मूल्य बरोबर नव्हते. कारण त्यावरून आकाशगंगेची प्रणाली इतर सर्व दीर्घिकांपेक्षा अधिक मोठी आहे आणि पृथ्वीच्या अंदाजाने काढलेल्या वयापेक्षा संपूर्ण विश्व लहान आहे, असा चुकीचा अर्थ निघत होता. तथापि नंतर ज्योतिर्विदांनी त्यांचे निष्कर्ष पुन्हा तपासून पाहिले व त्यामुळे हबल यांच्या सिद्धांतांचा बचाव झाला. यामुळे विश्व १०-२० अब्ज वर्षे स्थिर त्वरेने प्रसरण पावत असल्याचे चित्र निर्माण झाले.

हबल यांनी दिलेली हॅली व्याख्याने- ऑक्सफर्ड विद्यापीठ, सन १९३४; सिलिमन व्याख्याने- येल विद्यापीठ, सन १९३५ आणि ऱ्होड्स मेमोरियल व्याख्याने प्रसिद्ध आहेत. रेड शिफ्टस् इन दि स्पेक्ट्रा ऑफ नेब्युली- सन १९३४ आणि दि हबल ॲटलास- संपा.ॲलन रेक्स सँडेज, सन १९६१ ही त्यांची प्रसिद्ध पुस्तके आहेत. ज्योतिषशास्त्रात त्यांनी केलेल्या कामगिरीमुळे त्यांना अनेक मानसन्मान व पुरस्कार मिळाले होते.

उदा. अमेरिकेतील बर्नार्ड, ब्रूस व फ्रँक्लिन ही सुवर्ण पदके तसेच रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे सुवर्ण पदक- सन १९४० आणि ऑक्सफर्डच्या क्वीन्स कॉलेजचे फेलो, शिवाय पृथ्वीभोवतीच्या कक्षेत स्थापित केलेल्या दूरदर्शकाला त्यांच्या सन्मानार्थ हबल अवकाश दूरदर्शक- हबल स्पेस टेलिस्कोप हे नाव देण्यात आले. हबल यांचे दि. २८ सप्टेंबर १९५३ रोजी सान मारीनो, कॅलिफोर्निया, अमेरिका येथे निधन झाले. त्यांची कामगिरी जगाला वेडावणारी ठरली, हे येथे उल्लेखनीयच!



एन. कृष्णकुमार जी.
गडचिरोली.
७७७५०४१०८६.

●●●●

# अचानक,भयानक.. महिला वर्गाविषयी पुळका..



बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी धस यांनी अन्न व नागरीपुरवठा मंत्री धनंजय मुंडे आणि त्यांचा निकडचा सहकारी वाल्मिक कराड यांच्यावर गेल्या काही दिवसांत सातत्याने आरोप केले. त्यात त्यांनी अभिनेत्री प्राजक्ता माळीचाही उल्लेख केला.

राजकीय वादात आपल्याला ओढून चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न धस यांनी केला असून त्यांनी माफी मागावी, अशी प्राजक्ताने मागणी केली. यासंदर्भात तिने पत्रकार परिषद घेतली होती. नंतर मराठी कलाविश्वातील अनेक कलाकारांनी तिला जाहीर पाठिंबा दिला. कुशल बद्रिके, सचिन गोस्वामी यांसारख्या सेलिब्रिटींनी सोशल मीडियावर पोस्ट लिहित या प्रकाराचा निषेध व्यक्त केला.

आता अभिनेते किरण माने यांनी याप्रकरणी लिहिलेली पोस्ट चर्चेत आली आहे. प्राजक्ताबाबतचं विधान निंदनीय असल्याचं म्हणत त्यांनी मराठी कलाकारांचीही कानउघडणी केली.

**किरण माने यांची पोस्ट**

प्राजक्ताबाबतचे विधान निंदनीयच आहे, त्याचा निषेध. पण सोनियाजींचे बिकीनीवरचे फोटोज व्हायरल झाले होते, कुस्तीगीर महिला लैंगिक शोषणाविषयी दाद मागत होत्या, मणिपूरला भगिनींची विटंबना झाली, तेव्हा जे महाभाग मुग गिळून वगैरे गप्प बसले, त्यांना अचानक-भयानक समस्त महिलावर्गाविषयी पुळका वगैरे यावा हे फार विनोदी वगैरे आहे, असं त्यांनी लिहिलं आहे.

या पोस्टमध्ये त्यांनी सुमारांचा थयथयाट असा हॅशटॅगसुद्धा नमूद केला आहे. किरण माने यांच्या या पोस्टवर नेटकऱ्यांनी विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत. हे मात्र बरोबर आहे दादा, असं एकाने लिहिलंय. तर ह्याबीड, परभणी प्रकरणावर गप्प बसणारे आता समोर आले आहेत, असं दुसऱ्याने म्हटले आहे.

# हिवाळ्यातील सुपरफूड : आश्चर्यकारक फायदे



हिवाळा आला की शक्यतो आपले आजार बळावतात. त्यासाठी हिवाळा आला की तब्येत सांभाळा असं म्हटलं जात. म्हणून आपल्या शरीराला ऊर्जा देण्यासाठी काही आवश्यक पदार्थांचे सेवन करणे खूप महत्वाचे असते. त्यासाठी हिवाळ्यात बाजारात येणारे एक कंदमुळे खूप फायदेशीर ठरू शकते. ते म्हणजे पौष्टीक रताळे.

रताळ्यामध्ये व्हिटॅमिन ए, सी आणि मँगनीज मुबलक प्रमाणात असते. रताळे कर्करोगाच्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर असते. रताळ्याचे अनेक प्रकार बाजारात उपलब्ध असतात. म्हणून रताळ्याला हिवाळ्यातील सुपरफूड मानलं जातं. रताळे खाल्ल्याने अनेक आरोग्यदायी फायदेही होतात. त्यामुळेच या सुपरफूडचा आहारात समावेश करण्याचा सल्ला आरोग्य तज्ज्ञ देतात.

पण काहीजण रताळे हे साल काढून खातात तर काहीजण रताळे सालीसकट खाणे पसंत करतात. यापैकी कोणती पद्धत आपल्या आरोग्यासाठी चांगली असते. साली सकट रताळे खाणे की साल काढून. जास्त फायदा कशाने होईल. पाहुयात तज्ज्ञांनी याबद्दल काय सांगितले आहेत.

प्रसिद्ध न्यूट्रिशनिस्ट दीपशिखा जैन यांनी नुकताच तिच्या इन्स्टाग्राम हँडलवर या प्रकरणाचा व्हिडिओ शेअर केला आहे. हा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये, पोषणतज्ज्ञांच्या मते बहुतेक लोक रताळ्याची साल काढून खातात. पण असे न करता ते सालीसह खाणे अधिक फायदेशीर आहे.

**रताळे सालीसह का खावेत?**

फायबर दीपशिखा जैन सांगतात, बरेच लोक वजन कमी करण्यासाठी रताळे खातात कारण त्यात फायबरचे प्रमाण चांगले असते. फायबर-समृद्ध गोष्टींमुळे तुम्हाला दीर्घकाळ पोट भरल्याचा अनुभव येतो. त्यामुळे तुम्हाला भूक लागत नाही आणि तुमचे वजन कमी होण्यास मदत होते.

त्याचप्रमाणे रताळ्याच्या सालीमध्ये रताळ्यापेक्षा जास्त फायबर असते. जेव्हा तुम्ही रताळे सोलून खातात तेव्हा ते फायबरचे प्रमाण सुमारे 50 ते 60 टक्क्यांनी कमी करते. अशा स्थितीत रताळ्याची साल काढून खाण्यापेक्षा ते नीट धुवून स्वच्छ करून आणि सालासह सेवन केलं तर त्याचे जास्त फायदे होतील.

फायबरप्रमाणेच रताळ्यात त्वचेसाठी लागणारे आवश्यक पोषक घटक जास्त प्रमाणात असतात. यामध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, पोटॅशियम इत्यादी पोषक घटक मुबलक प्रमाणात असतात. रताळे सोलल्यानंतर हे पोषक तत्व मिळत नाहीत.

न्यूट्रिशनिस्टच्या मते, रताळ्याची साल आतड्यात फायदेशीर बॅक्टेरिया वाढवण्यास मदत करते. पोटातील चांगल्या सूक्ष्मजंतूंची संख्या वाढते आणि पचनक्रिया व्यवस्थित राहते.

हिवाळ्यात त्वचा आणि केसांशी संबंधित समस्या वाढतात. त्यामुळे रताळे खाल्ल्याने यापासूनही आराम मिळतो. मधुमेह असणाऱ्यांनी तर रताळे आवर्जून खावे नक्कीच आराम मिळतो. रताळ्यामध्ये मधुमेह विरोधी गुणधर्म देखील असतात. त्यामुळे मधुमेहींसाठी ते चांगले मानले जाते. रताळ्यात कॉम्प्लेक्स कार्बोहायड्रेट्स असतात. रिफाइन्ड कार्ब्सपेक्षा ते पचायला जास्त वेळ लागतो, त्यामुळे रक्तातील साखर झपाट्याने वाढत नाही आणि ऊर्जाही मिळते. ●●●●

## अशोकायन
### स्वागत करा, पण..!

दारु पिऊन कराल
नव वर्षाचे स्वागत
तर नववर्ष ही तुम्हा
तथास्तू म्हणुन ठेवेल
वर्षभर भाऊ झिंगत..!

नो दारु ,नो बियर
म्हणाल हॅपी न्यु ईयर
तर तुमच्या कुटुंबात
येईल आनंदाची लहर ..!

भारतीय संस्कृतीची
तुम्ही कास धरा
दारु नव्हे दुध पिऊन
नववर्षाचे स्वागत करा..!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# मॅक्सच्या डॉक्टरांनी वाचविला ३८ वर्षांच्या तरुणाचा जीव

**नागपूर, ३० डिसेंबर :** मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूरने हृदयविकाराची गंभीर प्रक्रिया करून हृदयविकाराचा तीव्र झटका आलेल्या ३८ वर्षीय तरुणाचे प्राण वाचविण्यात यश मिळवले. हृदयात खोलवर झालेली गुठळी, श्वासोच्छवासाचा त्रास आणि कमी ऑक्सिजन पातळीचा इतिहास असलेल्या या रुग्णाला एकेक श्वास घेण्याच्या गंभीर स्थितीत आपत्कालीन विभागात आणण्यात आले होते.

त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करून घेत अत्यंत जलदरित्या रुग्णाची काळजी घेण्यात आली. रुग्णाची लगेचच सीटीस्कॅन आणि फुफ्फुसीय अँजिओग्राफी करीत अतिदक्षता विभागात स्थलांतरित करण्यात आले. ज्यामुळे रुग्णाच्या फुफ्फुसातील धमन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गुठळ्या दिसून येत होत्या.

फुफ्फुसीय धमनीमध्ये अवरोधाची पुष्टि होत असतानाच आपत्कालीन कक्षात असतानाच रुग्णाला फुफ्फुसीय एम्बोलिझममुळे हृदयविकाराचा झटका आला. त्याची ही गरज ओळखून आपत्कालीन टीमने तातडीने उच्च-गुणवत्तेचे कार्डिओपल्मोनरी रिसुसिटेशन सुरू केले आणि प्रगत कार्डियाक लाईफ सपोर्ट देण्यात आला. धमण्यांमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या गुठळ्या विरघळण्यासाठी आणि भविष्यातील फुफ्फुसातील अडथळ्यांना प्रतिबंध करण्यासाठी नसांच्या माध्यमातून एक अल्टिप्लेस शॉटचा वापर करण्यात आला.

इमर्जन्सी रूमचे प्रमुख डॉ. व्ही. निरंजनी यांच्या नेतृत्वाखालील डॉक्टरांच्या तज्ज्ञ टीमने रुग्णाला प्रगत कार्डियाक लाईफ सपोर्ट नियमांचे काटेकोर पालन केले. याव्यतिरिक्त, ऑन-कॉल कार्डिऑलॉजिस्ट डॉ.शोएब नदीम यांनी रीअलटाइम निदान आणि उपचार करीत आणीबाणी व्यवस्थापनातील पुढील टप्प्यांचे मार्गदर्शन केले.

मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर येथील आपत्कालीन औषध विशेषज्ञ डॉ. निरंजनी म्हणाले, रुग्ण वेळेवर हॉस्पिटलमध्ये आल्याने आणि आमच्या टीमने वेळीच प्रतिसाद देत निदान आणि पुढील प्रक्रिया पार पाडली. आमच्या टीमने हृदयाचे संचालन पून्हा स्थापित करण्यासाठी केलेले प्रयत्न महत्वाचे होते. पल्मोनरी एम्बोलिझम सारख्या धोकादायक आणीबाणीच्या स्थितीत कौशल्याने हृदयाचे यशस्वी पुनरुत्थानच नव्हे तर रुग्णाचा जीव वाचविण्यासाठी प्रत्येक तज्ञाच्या भागीदारीने योगदान मोलाचे दिले. रुग्ण सुरक्षा समाहारुग्णाला रुग्णाचा जीव वाचविण्यात मिळालेल्या या यशामुळे आपत्कालीन औषधामध्ये योग्य कार्यासाठी टीमवर्कची महत्त्वपूर्ण भूमिका प्रतिबिंबित होते. योग्य वेळी योग्य निदानातून रुग्णाची काळजी घेत त्याचा जीव वाचविता येतो हे देखील यातून सिद्ध होते.

या प्रक्रियेनंतर रुग्णामध्ये हळूहळू सुधारणा दिसून आली. दुसऱ्या दिवशी त्याला व्हेंटिलेटरवरुन काढण्यात आले आणि रुग्णालयात दाखल केल्याच्या चौथ्या दिवशी सुटी देऊन घरी सोडण्यात आले. त्याच्या हृदय आणि फुफ्फुसांना पुन्हा गुठळ्या होऊ नये याचे व्यवस्थापन करण्यासाठी त्याला ओरल ब्लड थिनर्स (ओरल अँटीकोआगुलेंट्स) लिहून देण्यात आले. हे प्रकरण आपत्कालीन औषध विभाग आणि बहु-विषय काळजी सेटअपमधील इतर विशेष आणि गंभीर काळजी टीम यांच्यातील मजबूत सहकार्याचे महत्त्व अधोरेखित करते.

# जीएनजी इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडने सेबीकडे डीआरएचपी सादर

**नागपूर, ३० डिसेंबर :** जीएनजी इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड, लॅपटॉप्स आणि डेस्कटॉप्सची भारतातील सर्वात मोठी रिफर्बीशर, जगभरातील आणि भारतातील सर्वात मोठ्या आयसीटी डिव्हायसेसच्या रिफर्बीशरपैकी एक, ३१ मार्च २०२४ रोज मूल्यानुसार, भारत, यूएसए, आफ्रिका आणि युएईमध्ये मजबूत स्थान असलेल्या या कंपनीने बाजारपेठ नियामक सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाकडे आपले ड्राफ्ट रेड हेरिंग प्रोस्पेक्टस सादर केले आहे.

या आयपीओमध्ये ८२५ कोटी रुपयांपर्यंतचे, प्रत्येकी २ रुपये दर्शनी मूल्य असलेले इक्विटी समभाग नव्याने जारी करण्यात आले आहेत आणि प्रत्येकी २ रुपये दर्शनी मूल्य असलेले ९७,००,००० इक्विटी समभाग विक्रीसाठी प्रस्तुत करण्यात आले आहेत. विक्रीसाठीच्या प्रस्तावामध्ये शरद खंडेलवाल यांच्याकडून ३५,००० पर्यंत, विधी शरद खंडेलवाल यांच्याकडून ३५,००० पर्यंत आणि अमीएबल इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून ९६,३०,००० पर्यंत इक्विटी समभाग यांचा समावेश आहे.

इलेक्ट्रॉनिक्स बझार या ब्रँड नावाने कार्यरत असलेली जीएनजी इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड रिफर्बीशमेंटच्या संपूर्ण मूल्य शृंखलेमध्ये कार्यरत आहे, सोर्सिंगपासून रिफर्बीशमेंट ते विक्रीपर्यंत, विक्रीपश्चात सेवा आणि वॉरंटी देण्यापर्यंत सर्व सेवासुविधा ही कंपनी पुरवते. या कंपनीच्या आयसीटी डिव्हायसेसच्या रिफर्बीशमेंटच्या सर्वसमावेशक प्रक्रियेमध्ये लॅपटॉप्स, डेस्कटॉप्स, टॅबलेट्स, सर्व्हर्स, प्रीमियम स्मार्टफोन, मोबाईल वर्कस्टेशन, ॲक्सेसरीज यांचा समावेश आहे, कामगिरी आणि दिसण्याच्या बाबतीत ही डिव्हायसेस अगदी नव्यासारखी दिसली पाहिजेत याची पुरेपूर काळजी यामध्ये घेतली जाते. नवीन लॅपटॉप्सच्या तुलनेत हे लॅपटॉप एक-तृतीयांश किमतींमध्ये मिळतात, डेस्कटॉप, टॅबलेट, सर्व्हर, प्रीमियम स्मार्टफोन, मोबाईल वर्कस्टेशन्स आणि ॲक्सेसरीज नवीन डिव्हायसेसच्या तुलनेत ३५ ते ५०% किमतींमध्ये मिळतात. ही कंपनी रिपेयर-ओव्हर-रिप्लेसमेंट दृष्टिकोनाचे पालन करते, यामध्ये कमी किमतीचा फायदा मिळतो, कार्बन फूटप्रिंट कमी करून खऱ्या अर्थाने सस्टेनेबिलिटी साध्य करता येते.

ग्राहकांना सुविधा आणि विश्वास मिळावा यासाठी रिफर्बीश केलेल्या आयसीटी डिव्हायसेसवर वॉरंटी देण्याची संकल्पना सर्वात पहिल्यांदा आणणाऱ्या काही कंपन्यांपैकी एकही कंपनी आहे. अजूनही ही कंपनी या उद्योगक्षेत्रातील चांगल्या वॉरंटी टर्म्स देते. आर्थिक वर्ष २०२४ च्या आकडेवारीनुसार, रिफर्बीशिंग क्षमता लक्षात घेता, ही भारतातील सर्वात मोठी मायक्रोसॉफ्ट अथॉराईज्ड रिफर्बीशर आहे. २०२४ कॅलेंडर वर्षातील मार्केट कॅपिटलायजेशनच्या संदर्भात ही कंपनी भारतातील दुसऱ्या सर्वात मोठ्या सॉफ्टवेयर कंपनीची आयटी ॲसेट डिस्पोजल पार्टनर देखील आहे, जी त्यांच्या वापरलेल्या आयटी ॲसेट्सना प्रोक्युअर करते. कॅलेंडर वर्ष २०२३ मधील बाजारपेठ हिस्सेदारी अनुक्रमे २४% आणि २१% असलेले, आघाडीचे ग्लोबल ब्रँड्स, लेनोवो आणि एचपी यांची ही सर्टिफाईड रिफर्बीशमेंट पार्टनर आहे.

या कंपनीकडे स्टॉक कीपिंग युनिट्सची विशाल श्रेणी आहे, ३० सप्टेंबर २०२४ रोजी त्यांच्या पोर्टफोलिओमध्ये ४९९६ एसकेयू होते. त्यांनी विक्री नेटवर्क स्थापित केले असून, ३० सप्टेंबर २०२४ रोजीच्या माहितीनुसार त्यांची रिफर्बीश केलेली आयसीटी डिव्हायसेस ३५ देशांमध्ये विकली जात होती. ४४७ सप्लायर्सचे मल्टी-चॅनेल ग्लोबल प्रोक्युअरमेंट नेटवर्क, भारत आणि संपूर्ण जगभरात त्यांनी विशाल प्रोक्युअरमेंट नेटवर्क निर्माण केले आहे. ३० सप्टेंबर २०२४ च्या माहितीनुसार, त्यांच्या प्रोक्युअरमेंट नेटवर्कमध्ये कॉर्पोरेट्स, कन्सल्टिंग कंपन्या, मध्यस्थ, रिसायकलर्स, रिफर्बीशमेंट पार्टनर्स, शिक्षण संस्था, लीजिंग कंपन्या, एनबीएफसी, मोठमोठी रिटेल स्टोर्स, ओईएम ब्रँड स्टोर्स यांचा समावेश आहे. त्यांच्या काही प्रमुख प्रोक्युअरमेंट पार्टनर्समध्ये यूएसएमधील आयरन माउंटन अँड अप्टो सोल्युशन्स आयएनसी; ऑस्ट्रेलियामधील ग्रीन बॉक्स ग्रुप पीटीवाय लिमिटेड आणि रीन्यु आयटी पीटीवाय लिमिटेड; एचपी, लेनोवो, मायक्रोसॉफ्ट, टाटा कॅपिटल लिमिटेड आणि स्टेलर इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड यांचा समावेश आहे. ३० सप्टेंबर २०२४ रोजीच्या आकडेवारीनुसार, त्यांचे ३२६५ ग्राहक आहेत.

३० सप्टेंबर, २०२४ च्या माहितीनुसार, ही कंपनी ३५ देशांमध्ये कार्यरत आहे, यामध्ये उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, आशिया, आशिया पॅसिफिक, युरोप, आफ्रिका आणि मध्य पूर्व यांचा समावेश आहे. भारत, यूएसए आणि युएईमध्ये त्यांच्या पाच रिफर्बीशिंग फॅसिलिटीज आहेत, एक फॅसिलिटी भारत, महाराष्ट्रात, नवी मुंबईमध्ये, एक फॅसिलिटी यूएसए, टेक्सस, डल्लासमध्ये आणि तीन फॅसिलिटीज शारजा, युएईमध्ये आहेत. यांची एकूण जागा ५८१२७.८२ चौरस फीट आहे. भारत, मध्य पूर्व, युरोप, आफ्रिका आणि यूएसएमध्ये पोहोच वाढवता यावी, त्याबरोबरीनेच क्षेत्रीय बाजारपेठांमध्ये सेवा सुविधा पुरवता याव्यात यासाठी त्यांच्या फॅसिलिटीज मोक्याच्या ठिकाणी तयार करण्यात आल्या आहेत. त्यामुळे मालवाहतुकीचा खर्च कमी होण्यात, डिलिव्हरी लवकरात लवकर देण्यात आणि संचालन कार्यक्षमता वाढवण्यात मदत मिळते.

या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स मोतीलाल ओसवाल इन्व्हेस्टमेंट अड्वायजर्स लिमिटेड, आयआयएफएल कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड (आधीची आयआयएफएल सिक्युरिटीज लिमिटेड) आणि जेएम फायनान्शियल लिमिटेड हे आहेत.

# कलाकारांनी त्यांच्या हृदयस्पर्शी नववर्ष परंपरांबाबत सांगितले!

**मुंबई, ३० डिसेंबर :** आपण नववर्ष २०२५ चे स्वागत करण्यासाठी सज्ज असताना एण्ड टीव्हीवरील कलाकार अर्थपूर्ण परंपरांना उजाळा देत आहेत, जे सकारात्मकता, नातेसंबंध आणि वैयक्तिक विकासाला चालना देतात. नातेसंबंध दृढ करण्यापासून निसर्गाचा सन्मान आणि संकल्प स्थापित करण्यापर्यंत या परंपरांमधून कलाकार नववर्षाचा पहिला दिवस संस्मरणीय करण्यासाठी करणारे नियोजन दिसून येते. हे कलाकार आहेत रवी महाशब्दे (मालिका 'अटल'मधील क्रिष्णन बिहारी वाजपेयी), अमित भरद्वाज (मालिका 'भीमा'मधील मेवा), हिमानी शिवपुरी (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील कटोरी अम्मा) आणि विदिशा श्रीवास्तव (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील अनिता भाबी).



मालिका 'अटल'मध्ये क्रिष्णन बिहारी वाजपेयीची भूमिका साकारणारे रवी महाशब्दे म्हणाले, ''माझ्यासाठी वर्षातील पहिला दिवस ब्लँक कॅन्व्हाससारखा असतो. मी चिंतनासह नववर्षाचे स्वागत करते आणि आगामी वर्षामधील माझ्या ध्येयांबाबत विचार करतो. त्यानंतर मी गणेश मंदिरामध्ये जातो, ही परंपरा माझ्यामध्ये परिपूर्णता व सकारात्मकतेची भावना जागृत करते. तसेच, ही परंपरा शांतमय व उद्देशपूर्ण वर्षासाठी सज्ज करते.'' मालिका 'भीमा'मध्ये मेवाची भूमिका साकारणारे अमित भारद्वाज म्हणाले, ''वर्षातील पहिला दिवस नेहमी उत्साहवर्धक असतो. माझी मुलगी जन्मल्यापासून मी हा दिवस तिच्यासोबत व्यतित करतो. पार्कमध्ये धमाल करायची असो किंवा मॉलमध्ये प्लेटाइमचा आनंद घ्यायचा असो, आम्ही एकत्र खूप धमाल करतो. यंदा, माझी पत्नी आणि मी तिला समुद्रकिनारी घेऊन जाणार आहोत. असे लहान क्षण आमच्यामधील नाते अधिक दृढ करतात आणि माझ्यामध्ये नवीन उत्साह निर्माण करतात.''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये कटोरी अम्माची भूमिका साकारणाऱ्या हिमानी शिवपुरी म्हणाल्या, ''मला झाडे खूप आवडतात, ज्यामुळे मी वर्षातील पहिल्या दिवशी एका रोपाची लागवड करते, जी माझी वार्षिक परंपरा बनली आहे. वर्षभर रोपाची वाढ होताना पाहण्यामधून मला खूप आनंद व समाधान मिळते. यंदा, मी माझ्या मुलाला या परंपरेमध्ये सामील करणार आहे आणि आम्ही एकत्र रोपटे लावणार आहोत. वाढ व सकारात्मकता अंगिकारण्यासोबत हरित भविष्याला चालना देण्याची ही माझी पद्धत आहे.'' मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये अनिता भाबीची भूमिका साकारणाऱ्या विदिशा श्रीवास्तव म्हणाल्या, ''माझी नववर्ष परंपरा साधी, पण हृदयस्पर्शी आहे. मी माझ्या कुटुंबियाना व मित्रमैत्रिणींना कॉल करते आणि त्यांना नववर्षच्या शुभेच्छा देते. यामधून मला आठवण होते की माझ्या जीवनात अशा अद्भुत व्यक्ती आहेत. ते कुठेही असले तरी या दिवशी मी त्यांच्याशी संपर्क साधते. यंदा देखील यामध्ये काहीच बदल नसणार.''

# मिका सिंग सा रे ग म प स्पर्धक उज्वलला म्हणाला : जेव्हा मी माझ्या वर्ल्ड टूरवर जाईन, तेव्हा मी तुला माझ्यासोबत गायला नक्कीच सांगेन

**मुंबई, ३० डिसेंबर :** झी टीव्हीचा सा रे ग म प भारतातील एक आवडता सिंगिंग रिॲलिटी शो, त्याच्या प्रतिभा, मनोरंजन आणि प्रेरणा यांच्या परिपूर्ण मिलाफाने प्रेक्षकांना मोहित करत आहे. अंतिम फेरीसाठी फक्त एक महिना बाकी असताना, स्पर्धा आता अधिक कडवी झाली आहे आणि अख्खा देश त्यांच्या आवडत्या स्पर्धकांसाठी चीअर करत आपल्या स्क्रीन्सला खिळून राहिले आहेत. सचिन-जिगर, सचेत-परंपरा आणि गुरु रंधावा यांच्या मार्गदर्शनाखाली, ह्या प्रतिभावंत कलाकारांचे कसलेल्या परफॉर्मर्समध्ये रूपांतर केले जात आहे.

या वीकेंडला प्रेक्षकांना नावाजलेला गायक मिका सिंग या शोमध्ये खास अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे. आपल्या दमदार उर्जेसाठी आणि संगीतातील अद्वितीय योगदानासाठी ओळखल्या जाणाऱ्या मिकाने स्पर्धकांचे मनापासून कौतुक केले आणि त्याच्या संगीत प्रवासातील काही आकर्षक कथा शेअर केल्या. हा एपिसोड भावनिक आणि प्रेरणादायी क्षणांनी भरलेला असेल, कारण मिकाने स्पर्धक उज्वल गभरला भविष्यातील त्याच्या वर्ल्ड टूरमध्ये त्याच्यासोबत परफॉर्म करण्याची संधी देण्याचे वचन दिले आहे. उज्वलच्या विलक्षण कामगिरीने प्रभावित झालेल्या मिकाने केवळ त्याच्या प्रतिभेचे कौतुक केले नाही तर उज्वलने त्याचे 'सावन में लग गई आग' हे गाणे त्याच्यापेक्षा चांगले गायल्याचेही सांगितले. उत्कंठा वाढवत मिकाने हे उघड केले की त्याला मुळात गायकाऐवजी संगीत दिग्दर्शक बनायचे होते.

मिका म्हणाला, हा सर्वोत्कृष्ट कार्यक्रमांपैकी एक आहे आणि त्याच्याशी संबंधित सगळेच पुढे जातात. सलमान अलीकडे बघा, तो किती प्रगती करतोय. सगळ्यांनी स्टँडिंग ओव्हेशन का दिले हे तुम्हाला माहिती आहे का? कारण उज्वलने मिकापेक्षा चांगले गायले आहे. तू हीच हेअरस्टाईल पुढे ठेव. पण खरंच तू हे गाणे खूप छान गायले आहेस.

तो पुढे म्हणाला, मी तुम्हाला १९९८ ची एक गोष्ट सांगतो – जेव्हा मी हे गाणे गायले तेव्हा मला गायक व्हायचे नव्हते, मला संगीत दिग्दर्शक व्हायचे होते. मी माझ्या भावाला म्हणालो, 'मला गाणे गाऊ दे आणि दिग्दर्शनही करू दे. आणि मग त्याने मला त्या गाण्याची प्रॅक्टिस करायला सांगितले. कुठलाही संगीत दिग्दर्शक मला द्यायला तयार नव्हता त्यामुळे हे गाणे माझे मलाच प्रदर्शित करावे लागले. मला वाटलं की मी ते एक संगीत दिग्दर्शक म्हणून जर प्रदर्शित केले मला निदान संगीत दिग्दर्शक म्हणून तरी काही काम मिळेल पण ते गाणे सुपरहिट झाले आणि गायक म्हणून माझ्याकडे काम येऊ लागले. मला शोध मिळू लागले आणि मग हळूहळू पैसेही. आज तू मला माझ्या दिवसांची आठवण करून दिली आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मी हे गाणे लिहिले गायले आणि यातील वाद्येही स्वतःच वाजवली. आज माझे गाणे एका नवीन उंचीवर गेले. मी जेव्हा वर्ल्ड टूर वर जाईन उज्वल, तेव्हा तुला माझ्यासोबत नक्कीच गायला सांगेन.

स्टँडिंग ओवेशन आणि प्रेरणादायी गोष्टींसह मिकाच्या उपस्थितीने या एपिसोडमध्ये एक जादुई स्पर्श आणला आणि प्रेक्षक व स्पर्धकांना रोमांचित केले. या वीकेंडचा एपिसोड पाहायला विसरू नका कारण यात तुमचे पुरेपूर मनोरंजन होईल आणि स्पर्धक आपल्या लक्ष्यापर्यंत पोचण्यासाठी आपले सर्वोत्तम पाऊल पुढे टाकतील.

# सा रे ग म प स्पर्धक श्रद्धा मिश्राने मिळवले तिचे पहिले ओजी गाणे, धोकेबाजी

## हे ओजी गाणे झी म्युझिक कंपनीद्वारे रिलीज केले जाणार आहे

**मुंबई, ३० डिसेंबर :** झी टीव्हीचा सा रे ग म प भारतातील एक आवडता सिंगिंग रिॲलिटी शो, त्याच्या प्रतिभा, मनोरंजन आणि प्रेरणा यांच्या परिपूर्ण मिलाफाने प्रेक्षकांना मोहित करत आहे. अंतिम फेरीसाठी फक्त एक महिना बाकी असताना, स्पर्धा आता अधिक कडवी झाली आहे आणि अख्खा देश त्यांच्या आवडत्या स्पर्धकांसाठी चीअर करत आपल्या स्क्रीन्सला खिळून राहिले आहेत. सचिन-जिगर, सचेत-परंपरा आणि गुरु रंधावा यांच्या मार्गदर्शनाखाली, ह्या प्रतिभावंत कलाकारांचे कसलेल्या परफॉर्मर्समध्ये रूपांतर केले जात आहे.

या वीकेंडला प्रसिद्ध गायक मिका सिंग या शोमध्ये खास पाहुणे म्हणून पाहण्याची संधी प्रेक्षकांना प्रेक्षकांना मिळणार आहे. सर्वात खास गोष्ट म्हणजे या रविवारी स्पर्धक श्रद्धा मिश्राचा सचिन-जिगर यांनी संगीतबद्ध केलेल्या 'धोकेबाजी' या तिच्या पहिल्या ओजी गाण्यावरील दमदार परफॉर्मन्स पाहण्याची अप्रतिम संधी प्रेक्षकांना मिळणार आहे. श्रद्धासाठी हा अभिमानाचा क्षण होता कारण प्रतिष्ठित गायक मिका सिंगने तिला पहिला क्लॅपबोर्ड क्लिक देऊन सन्मानित केले. तिच्या मंत्रमुग्ध आवाजाने प्रभावित होऊन, मेंटॉर्सदेखील या नृत्य आयटम नंबरसाठी तिच्या टोनल गुणवत्तेचे कौतुक करण्यापासून स्वतःला थांबवू शकले नाहीत.

मिका सिंग म्हणाला, हे नक्कीच सुपरहिट गाणे असेल कारण मला विश्वास आहे की जे गाणे पहिल्यांदा ऐकल्यानंतर तुमच्या मनात घर करून राहते, ते तुमच्या हृदयात कायमचे राहते. ही अतिशय अप्रतिम रचना आहे आणि जिगर भाईची पत्नी प्रिया हिने ते खूप सुंदर लिहिलंय. श्रद्धा तुला खूप शुभेच्छा आणि तुझ्या आई-वडिलांचेही अभिनंदन.

सचिन-जिगर म्हणाले, प्रामाणिकपणे सांगायचे तर, हा सा रे ग म प च्या अनोख्या उपक्रमांपैकी एक आहे, कारण स्पर्धक नेहमी तीच गाणी गातात जी आधीच रिलीज झाली आहेत आणि आपण ती एका विशिष्ट गायकाच्या आवाजात ऐकली आहेत. पण आम्हाला वाटतं की खरी परीक्षा ती असते जेव्हा तुम्हाला एखादे गाणे गायचे असते जे तुम्हाला ठाऊक नाही आणि त्याचा आत्मा आणि त्यातील भावना तुम्हाला समजून घ्याव्या लागतात. मला हे सांगताना इतका अभिमान वाटत आहे की केवळ दोन रात्रींमध्ये तिने हे गाणे शिकले आणि अगदी उत्तम पद्धतीने सादर केले. आम्ही श्रद्धासाठी अशा प्रकारच्या गाण्याची रचना केली कारण आम्हाला वाटतं की बॉलीवूडमध्ये अशा प्रकारच्या टोनल क्वालिटीचा अभाव आहे आणि जर अशा गाण्याला न्याय देऊ शकेल अशी एखादी तरुण प्रतिभा असेल तर ती श्रद्धाच आहे बाकी कोणीही नाही.



श्रद्धाचे पहिले ओजी गाणे सर्वांनाच आवडले असताना, या वीकेंडला इतर उत्कृष्ट परफॉर्मन्स पाहणेही प्रेक्षकांसाठी मनोरंजक असेल!



झी टीव्हीचा सा रे ग म प भारतातील एक आवडता सिंगिंग रिॲलिटी शो, त्याच्या प्रतिभा, मनोरंजन आणि प्रेरणा यांच्या परिपूर्ण मिलाफाने प्रेक्षकांना मोहित करत आहे. अंतिम फेरीसाठी फक्त एक महिना बाकी असताना, स्पर्धा आता अधिक कडवी झाली आहे आणि अख्खा देश त्यांच्या आवडत्या स्पर्धकांसाठी चीअर करत आपल्या स्क्रीन्सला खिळून राहिले आहेत. सचिन-जिगर, सचेत-परंपरा आणि गुरु रंधावा यांच्या मार्गदर्शनाखाली, ह्या प्रतिभावंत कलाकारांचे कसलेल्या परफॉर्मर्समध्ये रूपांतर केले जात आहे.
या वीकेंडला प्रसिद्ध गायक मिका सिंग या शोमध्ये खास पाहुणे म्हणून पाहण्याची संधी प्रेक्षकांना प्रेक्षकांना मिळणार आहे. सर्वात खास गोष्ट म्हणजे या रविवारी स्पर्धक श्रद्धा मिश्राचा सचिन-जिगर यांनी संगीतबद्ध केलेल्या 'धोकेबाजी' या तिच्या पहिल्या ओजी गाण्यावरील दमदार परफॉर्मन्स पाहण्याची अप्रतिम संधी प्रेक्षकांना मिळणार आहे. श्रद्धासाठी हा अभिमानाचा क्षण होता कारण प्रतिष्ठित गायक मिका सिंगने तिला पहिला क्लॅपबोर्ड क्लिक देऊन सन्मानित केले. तिच्या मंत्रमुग्ध आवाजाने प्रभावित होऊन, मेंटॉर्सदेखील या नृत्य आयटम नंबरसाठी तिच्या टोनल गुणवत्तेचे कौतुक करण्यापासून स्वतःला थांबवू शकले नाहीत. मिका सिंग म्हणाला, हे नक्कीच सुपरहिट गाणे असेल कारण मला विश्वास आहे की जे गाणे पहिल्यांदा ऐकल्यानंतर तुमच्या मनात घर करून राहते, ते तुमच्या हृदयात कायमचे राहते. ही अतिशय अप्रतिम रचना आहे आणि जिगर भाईची पत्नी प्रिया हिने ते खूप सुंदर लिहिलंय. श्रद्धा तुला खूप शुभेच्छा आणि तुझ्या आई-वडिलांचेही अभिनंदन.

# बस इतना सा ख्वाबच्या सेटवर क्रिकेटचा फीव्हर: योगेंद्र विक्रमसिंगने दाखवली आपली फलंदाजीची कौशल्ये!

**मुंबई, ३० डिसेंबर :** कथाकथनाची जादू अनेकदा स्क्रीनच्या पलीकडे जाते आणि झी टीव्हीवरील नवीन मालिका बस इतना सा ख्वाब हीसुद्धा या गोष्टीला अपवाद नाही. स्वप्ने आणि कौटुंबिक नातेसंबंधांवरील आपलीशी वाटणारी ही मालिका प्रेक्षकांच्या हृदयाच्या तारा छेडत आहे। नुकताच या मालिकेच्या सेटवर चित्रीकरणामधून उसंत घेऊन अचानकच या मालिकेत शिखर त्रिवेदीची भूमिका साकारणाऱ्या योगेंद्र विक्रम सिंह याने एका क्रिकेट सामन्याचे आयोजन केले.

मालिकेच्या खच्चून भरलेल्या चित्रीकरणाच्या वेळापत्रकामधून क्रिकेटची आवड असलेल्या योगेंद्रने या खेळाबद्दलचे आपले प्रेम सेटवर आणले आणि अन्य कलाकार व तंत्रज्ञासोबत खेळाचा आनंद घेतला. योगेंद्रने अतिशय छान गोलंदाज तर केलीच पण त्याचसोबत आपल्या शक्तिशाली फलंदाजी कौशल्यानेही सर्वांना प्रभावित केले. त्याने अनेक चौकार मारले आणि सेटवर उपस्थित सर्वांच्या चैतन्यामध्ये भर टाकली. या सगळ्या मस्तीमध्ये भर टाकत राजश्री ठाकुर (अवनी) आपल्या टीमसाठी चीयर केले.

योगेंद्र विक्रम सिंग म्हणाला, दैनंदिन मालिकांसाठी चित्रीकरण करणे अतिशय गहन असा अनुभव आहे त्यातच असे हे जे आम्ही क्षण एकत्र घालवतो तेच आम्हाला टीमसोबत बॉन्डिंगचा आनंद मिळवून देतात. क्रिकेट या खेळावर माझे पहिल्यापासून प्रेम आहे आणि आमच्या कलाकार आणि तंत्रज्ञांसोबत हा खेळताना खूपच मजा आली. आमच्या दिग्दर्शकापासून अगदी स्पॉटबॉयपर्यंत सर्वांना या खेळाचा आनंद घेताना पाहाणे हा अनुभव खरंच छान होता. अशा क्षणांमुळे स्टार एक टीम म्हणून आमच्यातील नाते अधिक दृढ होते आणि ते आमच्या कामातून स्क्रीनवर दिसून येते.

पहा अवनी आणि शिखर यांना त्यांच्या प्रवासातून मार्ग काढताना...


## आज का अंदाज

मंगळवार ३१ डिसेंबर २०२४
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 2 | 5 | 6 | 9 |
|---|---|---|---|
| 246 | 780 | 234 | 199 |
| 390 | 690 | 268 | 289 |
| 480 | 500 | 367 | 379 |
| 24 | 54 | 68 | 98 |
| 27 | 50 | 63 | 91 |
| 20 | 57 | 61 | 93 |

मुंबई बाजार

| 3 | 4 | 5 | 8 |
|---|---|---|---|
| 166 | 158 | 799 | 224 |
| 229 | 257 | 366 | 459 |
| 300 | 356 | 122 | 378 |
| 30 | 40 | 56 | 86 |
| 31 | 41 | 57 | 87 |
| 32 | 42 | 59 | 89 |

३१ डिसेंबर २०२४
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 02 | 12 | 46 | 76 |
| 05 | 15 | 49 | 79 |
| 08 | 18 | 43 | 73 |

कल्याण व मुंबईकरिता आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


# टीव्ही कलाकार सांगत आहेत २०२४ च्या चांगल्या आठवणी आणि वर्ष २०२५ कडून त्यांच्या अपेक्षा!



**मुंबई, ३० डिसेंबर :** २०२५ चे स्वागत करताना, प्रत्येकजण आनंदी आणि निरोगी सुरुवातीची आशा करत आहे. जुने दुःख विसरण्याची, नवी सुरुवात करण्याची आणि नव्या स्वप्नांसाठी स्वतःला तयार करण्याची ही नवीन वर्षाची वेळ आहे. नवीन वर्ष एक नवीन प्रकाश घेऊन येत आहे, आणि ते साजरे करण्यासाठी झी टीव्हीवरील सितारे आयुषी खुराणा (जाने अनजाने हम मिले), रोहित सुचांती (भाग्यलक्ष्मी), अभिषेक मलिक (जमाई नं. १), आर्य बब्बर (जागृति - एक नई सुबह), राजश्री ठाकूर (बस इतना सा ख्वाब), नौशीन अली सरदार (वसुधा) आणि अर्जित तनेजा (कैसे मुझे तुम मिल गये) यांनी आपल्या २०२५ च्या योजना आणि आकांक्षा शेअर केल्या आणि ह्या नवीन वर्षात पूर्ण करण्याची इच्छा असलेल्या आपल्या उद्दिष्ट्यांबद्दलही सांगितले.

झी टीव्हीवरील जाने अनजाने हम मिलेमध्ये रीतच्या भूमिकेतील आयुषी खुराणा म्हणाली, हे वर्ष माझ्या वैयक्तिक आणि व्यावसायिक दोन्ही दृष्टीने खरोखरच जादुई ठरले आहे. माझ्या आयुष्यात माझ्या प्रेमासोबत लग्न करण्यापासून ते 'जाने अनजाने हम मिले'मधील रीत म्हणून माझा प्रवास सुरू करण्यापर्यंत मी कृतज्ञतेने भरले आहे. या प्रवासात सहभागी झालेल्या प्रत्येकाचे मनापासून आभार - तुमचे प्रेम आणि समर्थन माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. तुम्हांला प्रेम, हास्य आणि आनंदाने भरलेल्या वर्षाच्या शुभेच्छा.

झी टीव्हीच्या भाग्यलक्ष्मीमध्ये ऋषीची भूमिका साकारणारा रोहित सुचांती म्हणाला, आपण नवीन वर्षात पाऊल ठेवत असताना, माझ्या आयुष्यातल्या बिनशर्त प्रेम आणि पाठिंब्याबद्दल मी तुम्हा सर्वांचे आभार मानू इच्छितो. मला या वर्षात भेटलेल्या लोकांकडून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या आणि मी आयुष्यभर त्या जपत राहीन. कामाच्या बाबतीत, भाग्यलक्ष्मीला प्रेक्षकांकडून खूप प्रेम मिळत आहे आणि या शोसह पुढच्या वर्षात प्रवेश करताना मला खूप आनंद होत आहे. मी २०२५ ची आतुरतेने वाट पाहत असताना, माझे संकल्प तंदुरुस्त राहणे, माझ्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करणे, माझ्या कुटुंबासोबत अधिक वेळ घालवणे आणि मी जे काही करतो त्यामध्ये १००% देणे हे आहेत. माझ्या प्रवासाचा एक भाग असल्याबद्दल माझ्या सर्व चाहत्यांचे आणि भाग्यलक्ष्मीच्या दर्शकांचे आभार. हे वर्ष नवीन सुरुवात, अर्थपूर्ण संबंध आणि स्वप्नांचा पाठलाग यांबद्दल आहे. तुम्हाला आणि तुमच्या प्रियजनांना हे वर्ष आनंद, प्रेम आणि प्रकाशाने भरलेले जावो. नवीन वर्षाच्या शुभेच्छा!

झी टीव्हीच्या जमाई नं. १ मध्ये नीलची भूमिका साकारणारा अभिषेक मलिक म्हणाला, हे वर्ष संपत असताना, हे वर्ष माझ्यासाठी किती महत्त्वाचे आहे याचा विचार करण्यापासून मी स्वतःला रोखू शकत नाही. हा प्रवास चढ-उतारांनी भरलेला, थोडा कडू-गोड, पण शेवटी परिवर्तन करणारा आहे. माझ्या आयुष्यातील सर्वात मोठे स्वप्न सत्यात उतरले जेव्हा मी माझे स्वतःचे घर विकत घेतले - ज्या जागेला मी शेवटी माझे स्वतःचे घर म्हणू शकतो. झी टीव्हीवरील जमाई नं. १ या मालिकेतही मला मुख्य भूमिका मिळाली. त्यामुळे एकंदरीत हे वर्ष आशीर्वादाचे ठरले आहे. मागे वळून पाहताना, असे काही क्षण होते जेव्हा मार्ग अनिश्चित वाटत होता, परंतु या वर्षाने मला चिवटपणा आणि एकूणच प्रक्रियेवर विश्वास ठेवण्याचे महत्त्व शिकवले. सेटवर अथक परिश्रम करणे असो किंवा माझ्या वैयक्तिक आयुष्यात बदल स्वीकारण्याचे धैर्य शोधणे असो, प्रत्येक पावलाने मला अधिक मजबूत आणि विनम्र केले. २०२५ मध्ये, माझ्या कामाप्रति, माझ्या सर्वात महत्त्वाच्या लोकांप्रति आणि माझ्यासाठी - शिकत राहणे, प्रगल्भ होत राहणे आणि माझे सर्वोत्तम देणे हा माझा संकल्प आहे. स्वप्नांचा पाठलाग करण्याचे, विजय साजरा करण्याचे आणि छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद मिळवण्याचे हे वर्ष आहे. तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

झी टीव्हीच्या जागृति - एक नई सुबहमध्ये कलिकांत ठाकूरची भूमिका साकारणारा आर्य बब्बर म्हणाला, मी जेव्हा मागच्या वर्षाकडे वळून पाहतो तेव्हा मला आकार दिलेल्या ऑनस्क्रीन आणि ऑफस्क्रीन असे दोन्ही अनुभव दिल्याबद्दल मी कृतज्ञतेने भरून जातो. आव्हाने होती पण त्यांनी मला अधिक मजबूत केले आहे आणि त्या आठवणी नेहमीच माझ्यासोबत राहतील. जवळपास ८ वर्षांनंतर एका टेलिव्हिजन शोसाठी काम करणे आतापर्यंत खूप छान राहिले आहे आणि मला आशा आहे की आमचे दर्शक आमचा शो आणि माझ्या पात्रावर प्रेम करतील आणि समर्थन देत राहतील. नवीन वर्षासाठी, माझा संकल्प सोपा आहे- एक अभिनेता आणि एक व्यक्ती म्हणून प्रगल्भ होत राहणे. मला संतुलन साधण्यावर, खरोखर महत्त्वाच्या गोष्टींसाठी वेळ काढण्यावर आणि मला आव्हान देतील अशा भूमिका शोधण्यावर अधिक लक्ष केंद्रित करायचे आहे. नवीन संधींचा स्वीकार करणे आणि मागील वर्षातील धडे जपण्याबद्दल हे नवीन वर्ष असेल.

झी टीव्हीच्या बस इतना सा ख्वाबमध्ये अवनीची भूमिका साकारणारी राजश्री ठाकूर म्हणाली, २०२४ सालच्या आठवणींवर तर मला हसूच येत आहे या क्षणांनी मला कल्पनेपेक्षा जास्त शिकवले. सेटवर हृदय धडधडायला लावणारी दृश्ये ते क्रूसोबत शेअर केलेले हास्य, प्रत्येक अनुभवाने या प्रवासात भर टाकली. नवीन वर्षात पाऊल ठेवताना प्रगल्भ होत राहणे, जोखीम घेणे आणि माझ्या मार्गात येणारे प्रत्येक आव्हान स्वीकारणे हा माझा संकल्प आहे. मी एक अभिनेत्री म्हणून किती पुढे आले आहे आणि प्रगल्भ होत राहणे किती महत्त्वाचे आहे याची आठवण मला मागच्या वर्षाने करून दिली. नवीन वर्षाची सुरुवात, वैयक्तिक वाढ आणि हे वर्ष मागच्या वर्षापेक्षाही चांगले बनवणे यासाठी शुभेच्छा!

झी टीव्हीच्या वसुधामध्ये चंद्रिकेची भूमिका करणारी नौशीन अली सरदार म्हणाली, २०२५ हे माझ्यासाठी एक समाधानकारक वर्ष ठरले आहे कारण चंद्रिकासोबत मला एक मजबूत आणि प्रभावी भूमिका मिळाली आहे. प्रेक्षकांकडून मला मिळालेल्या अफाट प्रेम आणि कौतुकाबद्दल मी खरोखरच कृतज्ञ आहे. २०२५ चे स्वागत करत असताना आपल्या मर्यादांच्या पलीकडे जाणे, माझ्या सर्जनशील प्रवृत्तींशी जोडलेले राहणे आणि प्रत्येक संधीचा कृतज्ञतेने स्वीकार करणे हा माझा संकल्प आहे. या नवीन वर्षाच्या संध्येला, मी माझे कुटुंब आणि जवळच्या मित्रमंडळींसोबत एक छान संध्याकाळ घालवण्याची आणि माझ्यासाठी सर्वात महत्त्वाच्या नात्यांची कदर करण्याची योजना आखत आहे. हे वर्ष सर्वांसाठी प्रगती, आनंद आणि सकारात्मकतेने भरलेले जावो. सर्वांना २०२५ च्या चांगल्या सुरुवातीच्या शुभेच्छा!

झी टीव्हीच्या कैसे मुझे तुम मिल गए या मालिकेत विराटची भूमिका करणारा अर्जित तनेजा म्हणाला, २०२४ कडे वळून बघताना मला वैयक्तिक आणि व्यावसायिक दोन्ही प्रकारे प्रगती केल्याबद्दल धन्य वाटत आहे. विराटची भूमिका साकारणे हा एक रोमांचक प्रवास राहिला आहे आणि प्रेक्षकांचे प्रेम मला प्रेरित करते. मी २०२५ साठी मी स्वत: मध्ये सुधारणा करणे, अधिक प्रवास करणे आणि नवीन आव्हानांसह प्रयोग करणे हे माझे ध्येय आहे. मी माझ्या कुटुंबासोबत नवीन वर्षाची संध्याकाळ घालवण्यास आणि गेल्या वर्षावर विचार करण्यासाठी व नवीन वर्षासाठी ध्येये निश्चित करण्यासाठी उत्सुक आहे. २०२५ हे वर्ष सर्वांसाठी आनंद, यश आणि चांगले आरोग्य घेऊन येणारे असो. सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा!

# भर उन्हाळ्यात बुलडाणेकरांना मिळेल २४ तास पाणी

■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. ३०:** नवीन वर्षात बुलडाणा शहरातील पाच पैकी चार झोन मध्ये पाणी टेस्टिंग केले जाणार आहे. त्यामुळे पुढील दोन महिन्यात भर उन्हाळ्यात बुलडाणेकरांना २४ तास पाणीपुरवठा केला जाणार असल्याचा दावा बुलडाणा विधानसभा मतदार संघाचे आमदार संजय गायकवाड यांनी केला आहे.




हा दावा शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेत केला. ही पत्रकार परिषद २८ रोजी शनिवारी दुपारी १ वाजता मातोश्री संपर्क कार्यालय येथे पार पडली. या वेळी माहिती देताना आमदार गायकवाड म्हणाले की, बुलडाणा शहराने पूर्वीच्या काळात पाण्यासाठी अनेक झळा सोसल्या आहेत. शहरात २५ दिवसाआड पाणी येत होते, त्यामुळे बुलडाणेकरांना पाणी टंचाईचा झळा सोसल्या आहेत. आता जुने दिवस संपले आहे, नवीन दिवस येणार आहे. बुलडाणेकरांना २४ तास पाणीपुरवठा व्हावा यासाठी युध्द पातळीवर काम सुरु आहे. बुलडाण्यात पाणी पुरवठ्यासाठी एकूण पाच झोन तयार करण्यात आले आहे. त्यापैकी चार झोनचे काम पूर्णत्वास गेले असून पाचव्या झोन मध्ये अतिक्रमणाचा खोडा येत असल्याने हे काम मंद गतीने सुरु आहे. उर्वरित चार झोन मध्ये नव्या वर्षात टेस्टिंग केली जाणार असल्याचा दावा त्यांनी केला. यावेळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी गणेश पांडे, युवा सेनेचे मृत्युंजय गायकवाड, नगरसेवक गजेंद्र दांदडे व अन्य कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. खडकपूर्णा द्वारे येळगाव पर्यंत पाणी लवकरच मागील अनेक वर्षांपासून खडकपूर्णा धरणातून बुलडाणा येळगाव धरणात पाणीपुरवठ्यासाठी प्रयत्न सुरु आहे. मागील काही दिवसात या पाइपलाइनच्या कामाला चांगलाच वेग आला आहे. त्यामुळे लवकरच हे काम पूर्णत्वास जावून खडकपूर्णा द्वारे येळेगावात पाणीपुरवठा केला जाणार आहे. या सोबतच डोंगर खंडाळा येथे उभारण्यात येत असलेल्या डॅमही पर्यायी व्यवस्था देणार आहे.

# भंगार बस गाड्यांमुळे एसटीचे वर्षभरामध्ये तब्बल ४७ अपघात

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. ३० :** अकोल्यात सरते वर्ष एसटीच्या अपघाताने गाजले. महिनाभरात चार अपघात घडले. सुदैवाने यात जीवीतहानी झाली नाही. पण एसटीची सेवा सुरक्षित आहे का? असा प्रश्न मात्र प्रवाशांना पडला. अकोला परिवहन विभागात एसटीच्या ताफ्यात ७५ टक्के गाड्यांना १० वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. यापैकी १५५ गाड्यांचे नूतनीकरण केले आहे. वर्षभरात अशा भंगार गाड्यांमुळे एसटीचे ४७ अपघात झाल्याचे वास्तव आहे.




मध्यमवर्गीय प्रवासी अजूनही एसटीशी जोडलेले आहे. मात्र, एसटी महामंडळाची सेवा मोडकळीस आल्याचे चित्र आहे. १५ वर्षांनंतर बस भंगारात काढावी, असा एसटीचा नियम आहे. विभागात उपलब्ध ३२५ पैकी तब्बल २४५ बसचा १० ते १२ वर्षाचा प्रवास झाला आहे. या गाड्यांची रया गेली आहे. वारंवार गाड्यांचे स्टेअरिंग जाम, गाडी बंद झाल्याचे प्रकार घडत आहेत.

अकोला विभागात निमआराम, हिरकणी अशी वेगवेगळी नावे देऊन प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्या आता भंगार झाल्या आहेत. नियमाप्रमाणे ८ वर्ष प्रवास केलेल्या गाड्यांची फ्रेरबांधणी करून त्यांना वापरले जाते. प्रत्यक्षात सध्या वापरात असलेल्यांपैकी बहुतांश बसचा प्रवास ८ वर्षांपेक्षा जास्त झाला आहे. एसटीच्या वाहन चालकांना ड्युटी नाकारण्याचा अधिकार नाही. त्यांना मिळेल ती गाडी चालवावी लागते. गाडी रस्त्यात बिघडते आणि त्यामुळे प्रवाशांच्या संतापाला चालक, वाहकांना सामोरे जावे लागते. मेकॅनिकने कितीही जीव ओतून

काम केले तरी जुन्या गाड्या या नवीन बसप्रमाणे सेवा देऊ शकत नाहीत. परिणामी प्रवासी सेवा ढासळत चालली आहे. या भंगार गाड्यांमधून प्रवास का करावा, असा प्रश्न प्रवाशांनी विचारला तर त्याचे उत्तर एसटी महामंडळाकडे नाही. 'प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीदवाक्य घेऊन सर्वसामान्यांच्या सेवेत असलेली एसटी आता किती सुरक्षित राहिली आहे? असा गंभीर प्रश्न आहे. एकूण वयोमान बस ० -५० ५-१० ७० १०-१५२४५ प्रती किलोमीटर ३ लाख १७ हजार वाढ प्रवासी संख्या ६ लाख ३ हजाराने कमी प्रती प्रवासी उत्पन्न ३ कोटी ३७ लाख वाढ नफा-तोटा १ कोटी ९० हजार नफा फेऱ्या ११० फेऱ्या झाल्या कमी अकोला विभागातील ९ आगारात जानेवारी ते डिसेंबर दरम्यान एकूण ४७ अपघात झाले. यातील अनेक अपघात एसटीच्या खराब स्थितीमुळे झाले आहे. पण ९० टक्के अपघाताचा दोष चालकाच्या माथी मारून महामंडळाची प्रतिमा वाचवण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे वर्षभरातील ९० टक्के अपघातामध्ये चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. चालक वर्ग नोकरी गमावण्याच्या भीतीमुळे तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करतो, असे एका चालकाने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. अकोलेकरांना सुसज्ज बस सेवेची प्रतीक्षाच अकोला विभागाला २०१६-१७नंतर प्रथमच एप्रिल २०२३ मध्ये १०० साध्या गाड्यांच्या मागणीपैकी केवळ १० गाड्या मिळाल्या. सध्या विभागाकडे उपलब्ध गाड्यांपैकी १५५ गाड्यांचे आठ वर्षाच्या वापरानंतर नूतनीकरण करण्यात आले आहे. या गाड्या सतत मार्गावर बंद पडतात. विभागात २८ शिवशाही, ३५ मानवविकास आणि २६२ साध्या गाड्या आहेत. वर्षभरात १०० गाड्या निकामी झाल्या आहेत. यामुळे ग्रामीण भागातील अनेक फेऱ्या कायमस्वरूपी बंद आहेत. २५० इ-बससाठीप्रस्ताव प्रलंबित आहे.

दुसऱ्या टप्प्यात इ-गाड्यांसाठी अकोल्याचे नाव होते. पण विदर्भात फक्त नागपूर मंडळाला गाड्या मिळाल्या. पुढे अमरावती व नंतर अकोल्याचा नंबर लागू शकतो. तोपर्यंत तरी अकोलेकरांना सुसज्ज बस सेवेची प्रतीक्षाच करावी लागेल. १५ वर्षांनंतर बस भंगारात काढावी, असा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा नियम आहे. मात्र या नियमाकडे दुर्लक्ष केले जात आहे.

# मंदिर समितीतर्फे महाप्रसादाचे भाविकांना वितरण

■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. ३०:** बुलडाण्यातील एकता नगर भागात मागील सात दिवसापासून सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप २७ डिसेंबर रोजी काल्याच्या कीर्तनाने करण्यात आला. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. या महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला.



बुलडाण्यातील एकता नगर येथील विठ्ठल रुक्मिणी व हनुमान मंदिरात मार्गशीर्ष पंचमी कृष्ण पंचमी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाचे आयोजन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले होते. या सप्ताहासाठी प्रभाकर महाराज, अभिजीत महाराज देशमुख, निवृत्ती महाराज कोळंबे, विनायक महाराज सातव, गणेश सपकाळ महाराज, शिवराज झाल्टे महाराज, सुश्री तेजस्वीनी पाठक, डॉ. रमेश कोलते महाराज, गणेश केंदळे महाराज, नीलेश गव्हाळे महाराज, सांगळे महाराज, रामनाथ कायंदे महाराज आदींनी योगदान दिले. दरम्यान या ठिकाणी दररोज सकाळी ५ वाजता काकडा आरती, दुपारी १२ ते ३ पर्यंत भागवत कथा, सायंकाळी ५ ते ६ वाजता हरिपाठ व रात्री ८ ते १० दरम्यान हरिकिर्तनाचे घेण्यात आले. तर २६ डिसेंबर रोजी सायंकाळी मंदिर समितच्यावतीने शहरातील विविध भागात दिंडी काढण्यात आली या दिंडीचे परिसरातील हजारो भाविकांनी दर्शन घेतले. पश्चात २७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता डॉ. रमेश कोलते यांच्या नेतृत्वात काल्याचे कीर्तन पार पडले. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. दुपारी १ ते सायंकाळी ५ वाजे पर्यंत हजारो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. महाप्रसाद वितरणासाठी रामेश्वर भोके पाटील, शंकरराव जाधव, बराटे, शिवाजीराव धूड, सुरेश लोखंडे, कोळसे साहेब, नरहरी खाचणे, नारायण सावळे, दिगंबर किनगे, गाडेकर साहेब, गोपाळ उगले, नवदुर्गा महिला मंडळांनी परिश्रम घेतले.

# बार्शीटाकळीत मंजूर घरकुलांच्या बांधकामांना कार्यारंभ आदेश द्या!

## मुख्याधिकाऱ्यांना राकाँच्या वतीने निवेदन?

■ महासागर प्रतिनिधी,

**बार्शीटाकळी, दि.३० :** शहरातील मंजूर घरकुलांच्या कामांना कार्यारंभ आदेश द्या, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने (अजित पवार गट) बार्शीटाकळी नगरपंचायतच्या मुख्याधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनातून केली. एखाद्या गरीबाकडे स्वत:च्या हक्काचे राहते घर नसते. त्यामुळे त्याला संकटांचा सामना करावा लागतो. कडक ऊन असो किंवा कडाक्याची थंडी; पावसाळ्यातही त्याची प्रचंड धांदल उडते. याअनुषंगाने सर्वांसाठी घरे हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण आहे. मात्र अनेकांना घरकुलाचा लाभ मिळत नाही.



दरम्यान बार्शीटाकळी येथेही अनेक लाभार्थी वंचित आहेत. बार्शीटाकळी शहरांमध्ये पंतप्रधान घरकुल आवास योजना व रमाई घरकुल आवास योजना अंतर्गत अनेक लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाली. मात्र लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश मिळाला नसल्याच्या तक्रारी लाभार्थ्यांनी केल्या. वास्तविक लाभार्थ्यांना कामानुसार वेगवेगळ्या टप्प्यावर निधी वितरण करणे अपेक्षित आहे. मात्र सदर लाभार्थींना निधीची वितरण करण्यास विलंब होत आहे असे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे. लाभार्थींना घरकुलाचे काम करणे, अडचणीचे जात आहे. त्यामुळे तातडीने आदेश देण्यात यावेत, अशी मागणी निवेदनकर्त्यांनी केली. निवेदन देताना राकाँच्या अजित पवार गटाचे शहर अध्यक्ष चक्रधर राऊत, अजय इंगळे ,योगेश खंडारे, विशाल अंभोरे, सौरव वानखडे ,श्रीकांत इंगळे, जय इंगळे, राजू चव्हाण, राजेश अवचार मधुकर वानखडे, नीलेश तायडे आदी होते.

# शेअर बाजारात नफ्याचे आमिष; तब्बल २१.९२ लाखांची

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ३१:** शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास अधिक प्रमाणात नफा मिळेल असे आमिष दाखवून शहरातील ५१ वर्षीय शिक्षकाला सायबर लुटारूंनी ३३ दिवसांत २१ लाख ९२ हजार रुपयांनी फसवले आहे. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शिक्षकाने पोलिसांत धाव घेतली. या प्रकरणी सायबर पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. लक्ष्मीकांत शंकर गायकवाड (५१, रा. आचलविहार, अमरावती) असे तक्रारदार शिक्षकाचे नाव आहे. लक्ष्मीकांत गायकवाड यांना दोन महिन्यांपूर्वी शेअर बाजारात गुंतवणुकीसाठी समाज माध्यमावरील एका समुहावर जोडण्यात आले. त्या समुहातील सर्व सहभागी शेअर बाजाराशी संबंधित होते. त्या समूहामध्ये तीच चर्चा आणि गुंतवणूक केल्यास कोणाला किती फ्रायदा झाला, हे दाखवण्यात येत होते. यातच गायकवाड यांनाही गुंतवणूक केल्यास अधिक नफ्रा




देण्यात येईल, असे आमिष दाखवण्यात आले. त्यामुळे गायकवाड यांनी समूहामधून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे गुंतवणूक सुरू केली. सुरुवातीला त्यांना नफा झाल्याचे दाखवण्यात आले. दरम्यान त्यांना एका ॲप्लिकेशनवर स्वतःचे खाते बनवायला सांगितले. त्यांनी ते खाते तयार केले. त्या खात्यावर त्यांनी गुंतवणूक केलेली रक्कम तसेच झालेला फ्रायदा हे दिसत होते. मात्र ते आभासी अकाउंट होते. ही बाब मात्र गायकवाड यांना महिना भरानंतर लक्षात आली. कारण या अकाउंटवर गुंतवलेली व फायदा झालेली रक्कम दिसत होती, मात्र ती काढता येत नव्हती. गायकवाड यांनी रक्कम काढण्याचा प्रयत्न केला असता रक्कम निघाली नाही. त्यामुळे त्यांना फ्रसवणूक झाल्याचा संशय आला. त्यांनी ग्रुपमधील काहींना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता कोणीही प्रतिसाद देत नव्हते. दरम्यान, गायकवाड यांनी २ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या ३३ दिवसात २१ लाख ९२ हजार रुपये याच ठिकाणाहून शेअर बाजारात गुंतवले होते, मात्र फ्रसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तत्काळ सायबर पोलिसांसोबत संपर्क केला. पोलिसांनी तत्काळ सूत्रे हलवून शिक्षकाची रक्कम 'होल्ड' करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी १० लाख रुपये वाचविण्यात सायबर पोलिसांना यश आले. जानेवारी महिन्यांपासून शहरातील पोलीस ठाण्यांत सायबर विषयक एकूण ७२ गुन्हे दाखल झाले असून, त्यामध्ये ७ कोटी ७३ लाखांची फ्रसवणूक झाली आहे. या ७२ गुन्ह्यांपैकी २३ गुन्हे हे गुंतवणुकीशी संबंधित आहेत. त्यामध्ये सर्वाधिक गुन्हे शेअर बाजारामध्ये फसवणुकीच्या नावे झालेले आहेत.

# पोलिस ठाण्यात जाऊन फौजदारी करा

## अनधिकृत नारायणा स्कूल प्रकरणात शिक्षणाधिकाण्य ऱ्यांचे बीईओंना आदेश

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. ३० :** खडकी, कौलखेड भागातील राधा नगरीतील नारायणा ईटेक्नो स्कूलच्या व्यवस्थापनावर फौजदारी कारवाईसाठी स्वत: खदान पोलिस ठाण्यात उपस्थित राहून करू कारवाई करावी, असे आदेश शिक्षणाधिकाण्य ऱ्यांनी अकोला पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकाण्य ऱ्यांना (बीईओ) दिले आहेत. यापूर्वी बीईओंनी खदान पोलिस स्टेशन कारवाईसाठी पत्र दिले होते. मात्र त्यानंतरही कारवाई न झाल्याने शिक्षणाधिकाण्य ऱ्यांनी बीईओंना पत्र दिले आहे.

**शासनाची परवानगी न घेताच सुरू केली आहे शाळा**



मुंबई येथील नारायणा एज्युकेशन ट्रस्टद्वारा संचालित नारायणा ई-टेक्नो स्कूल सुरू करण्यात आली. मात्र, याबाबत शिक्षण विभागाने चौकशी केली. शासनाची पूर्व परवानगी न घेताच शाळा सुरू करण्यात आल्याने शिक्षण विभागाने दोन लाखाचा दंड ठोठावला होता. ट्रस्टने नवीनशाळा प्रस्ताव ८ जुलै रोजी २०२४ रोजी सादर केला होता. मात्र प्रस्ताव शिक्षणाधिका?ब यांनी परत केला होता. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवठ्यापर्यंत ही नवीन प्रस्ताव नव्हता.

# भक्तिमय वातावरणात निघाली यल्लमादेवीची पालखी मिरवणूक

## दोन दिवसीय यात्रा महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी,

**मूर्तिजापूर , दि.३० :** येथील चिखली(कासवी) मार्गावरील यल्लमा उर्फ्र रेणुका माता मंदिरात दरवर्षीप्रमाणे देवीचा दोन दिवसीय यात्रा महोत्सव धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. भक्तिमय वातावरणात यल्लमादेवीची पालखी मिरवणूक काढण्यात आली.



यात्रा महोत्सवानिमित्त सकाळी ७ ते ८ अभिषेक तर ९ वाजता महाआरती करण्यात येऊन १०.३० वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान संकलनाकरिता अकोला येथील रक्तपेढीची चमू आली होती. रक्तदान शिबिरात एकूण ५० रक्तदात्यांनी आपल्या रक्तदानाचा हक्क बजावला. यात महिला व युवतींचाही समावेश होता. रक्तदात्यांचा देवीचा फ्रोटो व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. रक्तदान शिबिर सुरु झाल्यानंतर देवीच्या पालखी मिरवणुकीला प्रारंभ झाला. भक्तीमय वातावरण संपूर्ण शहरात देवीच्या नावाचा जयघोष करीत हळदीची उधळण मिरवणूक काढण्यात आली. चौका चौकात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. अनेक भाविकांचा यात्रा महोत्सवात समावेश होता. मिरवणूक मार्गावर फराळ दुधाचे वितरण करण्यात आले. मंगळवार बाजारातील खंडोबा मंदिराजवळ महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मिरवणुकी मध्ये डफडी पथक आकर्षणाचे केंद्र होते. देवीच्या पालखीची महिलांद्वारा पूजा करण्यात आली. मिरवणूक शांततेने व शिस्तीने पार पडली. पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता. मिरवणूक शांततेत पार पाडण्याकरीता यात्रा महोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, एलमार समाजाच्या युवकांनी परिश्रम घेतले.

# विभागीय क्रीडा स्पर्धेचे राळेगाव येथे उद्घाटन

## ७ प्रकल्पांतील २,३०५ विद्यार्थ्यांचा सहभाग

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. ३१ :** अपर आयुक्त आदिवासी विकास अमरावती अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा यांच्या वतीने तालुका क्रीडा संकुल राळेगावच्या प्रांगणावर विभागीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे नुकतेच थाटात उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेत २,३०५ विद्यार्थी विविध कला व क्रीडा प्रकारांत आपले कौशल्य दाखवणार आहे. या उद्घाटन कार्यक्रमाला आमदार राजू तोडसाम, अध्यक्षस्थानी अप्पर आयुक्त जितेंद्र चौधरी होते. उद्घाटक म्हणून धारणी



येथील प्रकल्प अधिकारी प्रियवंदा हाडदळकर, राळेगावचे उपविभागीय अधिकारी विशाल खत्री, आदिवासी विभागाचे सहायक आयुक्त एस.आर. पेढेकर, छत्रपती संभाजीनगरच्या प्रकल्प अधिकारी चेतना मोरे, पुसदचे प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर, जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड, वरिष्ठ संशोधन अधिकारी प्रीती तेलखडे, सहायक प्रकल्प अधिकारी चंद्रिकापुरे उपस्थित होते. अपर आयुक्त जितेंद्र चौधरी यांनी विद्यार्थ्यांना खेळामुळे होणारा व्यक्तिगत व सामाजिक विकास याविषयी मार्गदर्शन केले. प्रकल्प अधिकारी सुहास गाडे यांनी प्रास्ताविकात खेळाचे आयुष्यातील अविभाज्य महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. शासकीय व अनुदानित आश्रमशाळांच्या विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये पांढरकवडा, पुसद, संभाजीनगर, अकोला, कळमनुरी, धारणी, किनवट या ७ प्रकल्पातील १ हजार १५८ मुले व १ हजार १४७ मुली असे २ हजार ३०५ विद्यार्थी सहभागी झाले आहे.

आभार विजय क्षीरसागर यांनी मानले. या क्रीडा प्रकारांचे मैदानावर रंगणार सामने क्रीडा स्पर्धांमध्ये व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, भालाफेक, गोळा फेक, हँडबॉल, १०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे, ४०० मीटर धावणे, ८०० मीटर धावणे, १२०० व १५०० मीटर धावणे इत्यादी क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रकल्प अधिकारी मेघना कावली, मोहन कुमार व्यवहारे, कळमनुरीचे प्रकल्प अधिकारी एस.आर.बारसे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# सावित्रीबाई फुले विद्यालयात अंधश्रद्धा निर्मूलनावर सत्र

■ महासागर प्रतिनिधी,

**पातूर, दि. ३०:** पातूर तालुक्यातील खानापूर येथे सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाने संचालित सावित्रीबाई फुले उच्च माध्यमिक विद्यालय आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने अंधश्रद्धा निर्मूलन विषयावर बौद्धिक सत्र २३ डिसेंबर रोजी झाले. सावित्रीबाई फ्रुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्ष सपना म्हैसणे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात अंकुर साहित्य संघाचे केंद्रीय संघटक देवानंद गहिले यांनी मार्गदर्शन केले. गहिले यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, 'विद्यार्थ्यांनी जिद्द आणि चिकाटी कायम ठेवून आपले यशाचे शिखर गाठावे. परंतु श्रद्धा ठेवावी, परंतु अंधश्रद्धा ठेवून प्रगतीमध्ये खंड पडू नये.' त्यांनी



अंधश्रद्धेच्या अनेक पैलूंवर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले आणि जीवनातील प्रगतीसाठी अंधश्रद्धा दूर करण्याचे महत्त्व सांगितले. गहिले यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी आपली कविता सादर केली आणि विविध भन्नाट आवाज काढून त्यांना उत्साही केले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला.

त्यांनी अंधश्रद्धेच्या नकारात्मक परिणामांवर प्रकाश टाकला आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याचे महत्त्व सांगितले. यावेळी प्रा. विठोबा गवई यांनी देखील अंधश्रद्धा निर्मूलनावर मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी आपली कविता सादर केली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये अंधश्रद्धेच्या विरोधातील जागरूकता वाढली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हर्षल भुवनेश्वर यांनी केले, तर सूत्रसंचालन काजल पवार यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. जयद्रथ बोरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या उद्घाटनास सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सपना म्हैसणे, सचिव सचिन ढोणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्राध्यापक भास्कर काळे, ग्रामपंचायत सरपंच सुनीता देशमुख, सुधीर देशमुख, महिला कार्यक्रमाधिकारी माधुरी ढोणे आणि कार्यक्रमाधिकारी हर्षल ढोणे उपस्थित होते.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




# वर्षअखेर विशेष २०२४






**सध्याच्या काळात पर्यावरणविषयक प्रश्न अतिशय गुंतागुंतीचे झाले असून संपूर्ण मानवजातीनेच माणूस म्हणून आपण कुठे आहोत, याचा विचार करण्याची गरज जाणवू लागली आहे. हे लक्षात घेता २०२५ मध्ये डोळे उघडून आपला प्रांत, राज्य वा देशाकडेच नव्हे, तर संपूर्ण जगाकडे बघणे गरजेचे आहे, असे मला वाटते. शेवटी हद्दी माणसाने ठरवलेल्या असतात, निसर्गाने नव्हे. या समेवर नववर्षाचे स्वागत करु या...**

## नवे वर्ष, नवी अनुभुती!

वर्षअखेर विशेष २०२४

**मृण्मयी देशपांडे**

प्रसिद्ध अभिनेत्री

आपल्यापैकी प्रत्येकालाच नवीन वर्षाबाबत कुतूहल असते. तसे औत्सुक्य मलाही आहे. मागील काही काळाप्रमाणे येणारे वर्षही अनेक नवनवीन प्रोजेक्ट्सने भरलेले, फॉर्मवरील आयुष्यात नवे रंग दाखवणारे असेल, अशी आशा आहे. आज आमच्याच नव्हे, तर आपल्या सगळ्यांच्याच आयुष्याला प्रचंड वेग आला आहे. एक वर्ष कधी संपते आणि नवे कधी सुरू होते, याचा हिशेबही कधी कधी लागेनासा होतो. त्यामुळेच या संमिश्र भावनेतून सरत्या वर्षाला निरोप दिला जात आहे. खरे तर २०२४ भरात आल्यासारखे वाटतेय. पण आता २०२५ चे स्वागत करण्याची वेळ आली आहे. अर्थातच नवे वर्षही याच वेगाने पुढे सरकणार आहे. ऋतूबदलाचे एक चक्र अनुभवत आयुष्य पुढे सुरू राहणार आहे. तेव्हा या वर्षाचे आणि आयुष्याचे मोकळ्या मनाने स्वागत करु या.

सध्याच्या काळात पर्यावरणविषयक प्रश्न अतिशय गुंतागुंतीचे झाले असून संपूर्ण मानवजातीनेच आता माणूस म्हणून आपण कुठे आहोत, याचा विचार करण्याची गरज जाणवू लागली आहे. हे लक्षात घेता २०२५ मध्ये डोळे उघडून आपल्या प्रांत, राज्य वा देशाकडेच नव्हे तर संपूर्ण जगाकडे बघणे गरजेचे आहे, असे वाटते. शेवटी हद्दी माणसाने ठरवलेल्या असतात, निसर्गाने नव्हे. त्यामुळेच या हद्दींच्या पलिकडे जात होणारा विचारच भविष्याला आकार देणारा ठरणार आहे. चराचरातील एक प्रजाती म्हणून स्वत:ला शोधण्याची गरज मला प्रकर्षाने जाणवते. कारण हे केले नाही तर आपण आपल्या प्रजातीच्या नाशाला कारणीभूत ठरु. वेळीच पावले उचलली नाहीत तर आज ना उद्या हे घडणारच आहे. असेच निष्काळजीपणाने जगत राहिलो तर पुढील दहा वर्षांमध्येच आपल्याला अनेक धोकादायक बदलांना सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळेच एक वर्ष संपून नवे वर्ष सुरू होताना कधी कधी आनंदापेक्षा दडपणाचे प्रमाणच वाढल्याचा अनुभव सध्या येत आहे. मात्र या भीतीने गलितगात्र न होता, धीर न सोडता नव्या दमाने, नव्या विचारांनीशी दिवसाची सुरूवात करायला हवी, कारण निराश होत जगणे हे कधीच चांगले जगणे होत नाही. तेव्हा चांगले जगायचे तर आपल्याला आशावादी रहायलाच हवे. प्रत्येक वर्षाची सुरूवात मनात आशेचा अंकुर ठेवूनच झाली पाहिजे. तरच आपण शहाणे होऊ आणि वाढलेल्या बुद्ध्यांकांचा चांगल्या प्रकारे उपयोग करुन घेऊ शकू. आधीपासून माणूस हुशार आहेच. पण आता तो शहाणा होणार का, हा खरा प्रश्न आहे. येत्या वर्षात याचे उत्तर शोधावे लागेल.

गेली काही वर्षे आम्ही निसर्गाचा निकटचा सहवास अनुभवत आहोत. नैसर्गिक शेतीमध्ये अनेक नवीन प्रयोग करत बरेच काही शिकत आहोत. या निमित्ताने वेगवेगळ्या लोकांना भेटत आहोत. त्यातच एका मान्यवरांचे एक वाक्य मनाला भावले. गप्पा मारताना ते म्हणाले, आपण आपले तर घेतच आहोत, पण पुढच्या पिढीचेही आपणच संपवत आहोत. निसर्गामध्ये वावरत असताना हे सत्य अधिक तीव्रतेने आणि प्रकर्षाने जाणवत आहे. खरे तर निसर्गाच्या जितक्या जवळ जाऊ, तितक्या तुमच्या जाणीवा प्रगल्भ होतात, प्रखर होतात आणि तुम्ही अधिक चांगल्या प्रकारे काम करु शकता. त्यामुळे येत्या वर्षात अनेकांनी निसर्गाशी सोयरेपण जपण्याची गरज आहे, असे मला वाटते. त्या दृष्टीने आम्ही एक पाऊल उचलले आहेत. आता मागोमाग काही लोक येत आहेत.

अलिकडेच आम्ही फार्मवर काही कार्यशाळा सुरू केल्या आहेत. त्यातून काही समजून घेऊन आजूबाजूचे शेतकरीही आपल्या शेतजमिनींकडे बघत आहेत. त्यांना शेतीमध्ये नवे प्रयोग करायचे आहेत. सेंद्रिय शेतीतले नवे काही जाणून घ्यायचे आहे. रासायनिक खते न वापरता विषमुक्त शेती करण्याकडे लोकांचा कल वाढताना दिसतोय. आमच्याकडे बघून काही लोकांना असे करावेसे वाटणे ही देखील एक मोठी उपलब्धी म्हणावी लागेल. शेवटी आम्ही स्वार्थासाठी म्हणजेच स्वच्छ हवा, चांगले आणि सकस अन्न, पुरेसा सूर्यप्रकाश मिळवण्यासाठी, पाळलेल्या कुत्र्यांना चांगली आणि पुरेशी जागा देण्यासाठी हे पाऊल उचलले असले तरी यातून काहींना नवी दृष्टी मिळणे ही सुखावणारी बाब आहे. या पार्श्वभूमीवर लोकांपुढे चांगल्या गोष्टींचा आदर्श ठेवणे, त्यांना चांगल्या गोष्टींकडे वळवणे ही मला जबाबदारी वाटते. ती पार पाडली जात असल्याचा निखळ आनंद सरत्या वर्षाने आम्हाला दिला आहे आणि नवे वर्षही तो देत राहील याची खात्री आहे.

आपल्या देशामध्ये अगदी ६० वर्षांपूर्वीदेखील विषमुक्त शेती होती. घरोघरी हीच पद्धत अनुसरली जायचे. मात्र काळाच्या ओघात बरेच काही बदलले आणि बिघडले. ते सगळे पूर्ववत करणे आमच्या एकट्याच्या प्रयत्नाने साध्य होणारे काम नाही. पण किमान आमच्या कामाने समाजात जागृती निर्माण झाली आणि काही लोक प्रामाणिक प्रयत्न करुन चांगल्या दिशेकडे वळले तरी आपण बरेच काही मिळवू शकू, हा विचार सगळ्या कामामागे आहे. हे सगळे करत असताना माझ्या विचारांमध्ये झालेला बदलही प्रकर्षाने जाणवणारा आहे. अगदी आठ-दहा वर्षांपूर्वी पैसा असता तर एखादी आलिशान गाडी विकत घेण्यास मी प्राधान्य दिले असते. सगळी शक्ती पणाला लावली असती. पण आता पैसे असतानाही मला कोणत्याही ब्रँडच्या मागे धावण्याची इच्छा होत नाही. त्याऐवजी आणखी जमीन घेणे मला आवडेल.

आज जंगलातील काही भाग विकत घेऊन निगराणी करणे, संरक्षित करणे मला अधिक आवडेल, कारण ती खरी संपत्ती असल्याचे आता मला समजले आहेत. थोडक्यात, निसर्गाच्या सहवासात राहून प्रगल्भ झालेल्या जाणीवांचाच हा परिपाक आहे. चकमकत्या आणि दिखावू विश्वात कार्यरत असले तरी आता घर, गाडी, बंगला, नोकरचाकर आमचा प्राधान्यक्रम राहिलेला नाही वा त्याचे अप्रूपही राहिलेले नाही. शेवटी एखाद्याच्या जाणीवा प्रगल्भ होतात तेव्हाच तो शहाणा होऊ लागतो. हुशारी योग्य दिशेकडे वळते. असे असताना तुम्ही तुमच्याबरोबर समाजाचे भले केले नाही तरी किमान कुठला नाश तरी करत नाही. सध्या याच दिशेने आमचा प्रवास सुरू आहे आणि २०२५ मध्येही तो अशाच वेगाने सुरू राहील.

बाकीचे सगळे कामही सुरू आहेच. चित्रपटांमधून वेगवेगळ्या भूमिका साकारायला मिळत आहेत, याचा आनंद आहेच. पण प्रामाणिकपणे सांगायचे तर मी शेतीच्या कामात अधिक रमतीये. इकडची ओढ वाढते आहे. याचे एक कारण असेही आहे की पर्यावरणाच्या दृष्टीने जागतिक पटलावरील भयावह परिणाम पाहता येत्या काही काळात काम करायला माझे क्षेत्र असेल की नाही, हेदेखील मला माहिती नाही. कारण आता मर मर करुन मी चित्रपट करेन, नाटक करेन पण एखादी नैसर्गिक आपत्ती आली तर बंद पडणारे पहिले क्षेत्रही माझेच असेल. कोरोनाकाळाने हे दाखवून दिले आहे. विनाशाकडील आपली घोडदौड वेगाने सुरू आहे. म्हणूनच आता आपण आपल्या रक्षणासाठी काय करतोय, हा विचार अधिक प्रभावी होत आहे. नाच, गाणे, अभिनय, फिरणे याची पॅशन तर आधीपासून होतीच. ती आजही आहे. त्यापलिकडे मला काही येतही नाही आणि कधी काही वेगळे केलेही नाही. पण आता एकाच वेगाने आणि रेषेमध्ये या दोन्ही गोष्टी सुरू आहेत.

वर उल्लेख केल्याप्रमाणे आता विकत घेण्याच्या कोणत्याही गोष्टींची अभिलाशा राहिलेली नाही. गेल्या तीन वर्षांपासून अनेक गोष्टी माझ्या आयुष्यातून बाद झाल्या आहेत. सतत काही तरी विकत घ्यायचे, ड्रेस रिपीट करायचा नाही हे विचारही आता स्पर्श करत नाहीत. यशस्वी अभिनेत्री असूनही मला साधे राहणे जमते आहे. आता मी भारंभार कपडे विकत घेत नाही. ब्रँडेड चपलांचा अट्टहास तर कधीचाच संपला आहे. दोन-तीन हिल्स, दोन बूट आणि रोज वापरण्याच्या एका चपलांच्या जोडीवर मी राहू शकते, कारण या कशाचा आणि तुमच्या कामाचा एकमेकांशी काहीही संबंध नाही, हे आता समजले आहे. तुम्ही सेलिब्रिटी असाल तर समाजापुढे चांगले आदर्श उभे करण्यासाठी ही सर्वोत्तम वेळ आहे, असे माझे ठाम मत आहे. त्यामुळेच या नवीन कामात झोकून द्यायचे, आधी कोणीच पायाखाली न घेतलेल्या वाटेवर प्रवास करण्याचे माझे प्रयत्न तर सुरू आहेत. २०२५ मध्ये ते अधिक यशस्वी होतील, या आशेनेच २०२४ ला निरोप देते. नव्या वर्षाचे स्वागत करते.

✦✦✦

**२०२४ ला निरोप देताना प्रत्येकाच्या भावना वेगळ्या असतील. कोणी काही गमावले असेल तर कोणी काही कमावले असेल. त्याचा लेखाजोखा मांडण्याचा हा संधीकाल हळवा करणारा आहेच, पण त्याच वेळी नवी स्वप्ने पेरणाराही आहे. अर्थात केवळ स्वप्न पाहून उपयोग नसतो तर त्यांना प्रयत्नांची शिंपणही गरजेची असते. हे लक्षात घेत हातून झालेल्या चुकांचे परिमार्जन करण्याचा शहाणपणाही दाखवायला हवा.**



## चुकांचे परिमार्जन व्हायला हवे...

निरोप देताना...

**स्वाती पेशवे**

कमालीचा वेग घेतलेल्या आजच्या काळात बऱ्यावाईट आठवणींचे गाठोडे पाठीवर टाकत आणखी एक वर्ष परतीच्या प्रवासाला लागले आहे. सरलेल्या ३६४ संध्यासमयांसारखी ही तिन्हीसांजही हळूहळू काळोखाच्या उदरात सामावेल आणि नव्या वर्षाच्या गर्भातून जन्म घेत नवतेज सामोरे येईल. निसर्गासाठी सामान्य असणारी ही घटना काळ-काम-वेगाचे गणित मांडत जगणारे जग अप्रूपाने साजरे करेल. आपले किती दिवस गेले आणि किती राहिले याचा विचार करत भविष्यातील ध्येय गाठण्याच्या दृष्टीने प्रत्येकाची नवी धाव सुरू होईल. खरे तर आत्तापासूनच 'गेट-सेट-गो'च्या सूचना त्यांच्या कामी घुमू लागल्या असतील. त्यामुळेच प्रत्येकाने जगाने स्विकारलेल्या सर्वमान्य वर्षगणनेनुसार सुरू होणाऱ्या या वर्षाचे स्वागत करण्याची आपापली पद्धतही एव्हाना ठरवली असेल.

अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत काळाची गती संथ होती. वर्षांचे येणे-जाणेही हलक्याशा झुळुकीसारखे सहज आणि सुखावणारे होते. जगण्याची स्पर्धा तीव्र नसताना सरते वर्ष नव्या वर्षाची नवी धास्ती देऊन जात नव्हते. मात्र आज एकीकडे नववर्ष स्वागताचा कल्लोळ वाढला असला तरी ते कसे जाईल, याविषयीच्या चिंता आणि भीतीचा सूरही तेवढाच तीव्र झाल्याचे दिसते. त्यामुळेच ग्रहणकाळात झाकोळणारे सूर्य वा चंद्रबिंब परछायेतून मुक्त होताच पूर्वीसारखे प्रकाशमान होणार आहे, हे ठाऊक असले तरी त्या काळात वाटणारी धास्ती आताशा वर्ष सरताना मनात डोकावून जाते. पूर्वी आणि काही प्रमाणात आजही ग्रहण लवकर सुटण्यासाठी 'दे दान, सुटे गुरान' म्हणत फिरणारे याचक दिसायचे. देवांना साकडे घातले जायचे. जपजाप्य पार पडायचे. ग्रहणकाळात न खाण्यापिण्याचा नेम पाळला जायचा. या सगळ्यामागे तमाची एक अदृश्य भीतीच दिसायची. आताही सरत्या वर्षाला निरोप देताना अस्थिर भविष्याविषयी अशी भीती दिसते. कर्कश्श होत जाणाऱ्या नववर्ष स्वागताच्या साजरीकरणावर तिची छटा स्पष्ट जाणवते. पुढे कधी असे सुख उपभोगायला मिळेल की नाही, या विचारातून अधिकाधिक आनंद लुटण्याचा प्रयत्न दिसतो. त्यामुळेच ही केविलवाणी स्थिती दूर सरुन लख्ख प्रकाश घेऊन येणारे नवे पर्व सुरू होईल, अशी आशा करत त्याच्या स्वागताला सज्ज व्हायला हवे.

२०२४ हे वर्ष जागतिक पातळीवरील युद्धजन्य स्थितीने आणि देशपातळीवर निवडणूकज्वराने पोळलेले होते. उच्च शिक्षण, नोकरी-धंदा वा अन्य कोणत्या कारणांमुळे देश-विदेशात गेलेले आपले लोक सुखरुप असतील का, विदेशांमध्ये त्यांना तात्कालिक वा कायमच्या निवासासाठी आवश्यक असणारा परवाना मिळेल का, रोजगाराची उपलब्धता कशी असेल, त्यांना परत तर यावे लागणार नाही ना अशा एक ना अनेक प्रश्नांनी काही उच्च मध्यमवर्गीय घरांमधील वातावरणही ढवळून निघालेले दिसले तर दुसरीकडे निवडणुकांदरम्यान दिली जाणारे आश्वासने, मिळालेली भरघोस मदत, नानाविध कल्याणकारी योजना आदींमधून समाजातील एका वर्गाने सुखाचा काळही अनुभवलेला दिसला. तेव्हा मोदीपर्वाची तिसरी टर्म सुरू झाल्यानंतर आणि उलथापालथ घडवून आणणारे राजकारण कडेला जात राज्यात स्थिर सरकार स्थापन झाल्यानंतर आता आपल्या जगण्याचे चक्रही सुरळित सुरू होईल, हीच आशा वर्षाला निरोप देणाऱ्या प्रत्येकाच्या मनात आहे.

आता प्रौढावस्थेत असणारा आपला देश चौफेर घोडदौड करत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेचा विचार करता विकासदरात सातत्यपूर्ण प्रगती करणाऱ्या भारताने जगात तिसरे स्थान पटकावले आहे. आगामी काळात अर्थव्यवस्था पाच ट्रिलियनची करण्याचे ध्येय समोर ठेवून त्या अनुषंगाने आर्थिक निर्णय घेत, आंतरराष्ट्रीय पातळीवरील परस्परसंबंध वृद्धिंगत करत, गर्तेतील देशांना मदतीचा हात देत आपण दमदार पावलांनिशी वाटचाल करत आहोत. जगाच्या कानाकोपऱ्यात भारतीयांना मिळणारा मान सुखावणारा आहे. वाढता दर्जा आपली बुद्धिमत्ता सर्वमान्य असल्याचे सिद्ध करणारा आहे. मात्र जगाच्या क्षितिजावर असे कौतुक मिळवणाऱ्या देशातील अंतर्गत स्थिती कशी आहे याचाही गांभीर्याने विचार करण्याची हीच वेळ आहे. एकीकडे आपण विस्तारत्या रस्त्यांचे, मेट्रोसेवा, मोनोरेल आणि अन्य दळणवळण यंत्रणेचे गोडवे गातो तर दुसरीकडे वाढत्या रस्ते अपघातामुळे परदेशांमध्ये बोलताना शरमेने आपली मान खाली जाते, असे दस्तुरखुद्द महनीय मंत्र्यांचे विधान ऐकतो. वेगावरील नियंत्रण सुटल्यामुळे कधी भररस्त्यात शिरलेले वाहन अनेक निरपराध सामान्यांना चिरडून जाते तर कधी भर समुद्रामध्ये खेळातील वाहने थडकावीत इतक्या थरारक पद्धतीने स्पीड बोट आणि प्रवासी नौकेची धडक होऊन लहानग्यांसह काहींना जलसमाधी मिळते. कधी वळणांवर तर कधी महामार्गांवर होणाऱ्या अपघातांमध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या तर गणतीतही नाही. ही स्थिती उगवणाऱ्या प्रत्येक दिवशी ग्रहणाची दाहकता देणारी ठरते आहे.

एकीकडे जगातील अनेक देशांमध्ये स्त्रीला मातेसमान मानणारी आपली संस्कृती अभ्यासली जात आहे. अमृताशीही पैज जिंकणाऱ्या विविध भाषांचा अभ्यास होत आहे. मात्र दुसरीकडे देशामध्ये महिला-मुलींवरील अत्याचारांमध्ये वाढ होत आहे. वाढणारे क्रौर्य अंगावर भीतीचा शहारा उमटवून जात आहे. अगदी दोन-चार वर्षांच्या मुलींपासून सत्तर-ऐंशी वर्षाच्या वृद्धेपर्यंत कोणीही पुरुषी अहंपणाला आणि त्यांच्यातील पाशवी, लिंगपिसाट प्रवृत्तीला बळी ठरेल अशी स्थिती आहे, कारण तशी एक ना अनेक उदाहरणे आपल्या समोर आहेत. मुख्य म्हणजे 'पुरुष' या संज्ञेमध्ये अगदी पंधरा-सोळा वर्षीय किशोरांचाही समावेश होताना दिसतो तेव्हा ग्रहणकाळ किती प्रदीर्घ आहे, हे जाणवते. आज महिला सुरक्षित, संरक्षित, सुशिक्षित, स्वाभिमानी झाल्या असल्याच्या काळातही त्यांच्यावरील अत्याचारांचे पाढे वाचत, त्यांच्या समर्थनासाठी हाती मेणबत्त्या घेऊन लाखोंना मोर्चे काढावे लागतात तेव्हा अंधार किती गडद आहे, हे स्पष्टपणे समजते.

आजच्या शिक्षणाचा उद्घोष होणाऱ्या काळातही बालविवाहांचे नोंद घेण्याजोगे प्रमाण, वाढती शाळागळती, शिक्षणव्यवस्थेतील त्रुटी, शाळांची उपलब्धता नसणे यासारखे मुद्दे मुख्य मथळ्यात दिसतात तेव्हा खरेच जगाला आणि आपल्यालाही अपेक्षित असणारे स्थान ग्रहण करण्यास खरेच सज्ज आहोत का, हा प्रश्न पडल्याखेरीज राहत नाही. अर्थात प्रचंड लोकसंख्येमधील प्रत्येक जीव सामाजिक नियमांचे काटेकोर पालन करत शहाणपणाने वागेल, ही अपेक्षा कोणी अभावानेच ठेवू शकेल. उडदामाजी काळेगोरे राहणारच आहे. मात्र समाजावर निर्घृणतेने चरे उमटवणाऱ्यांवर अंकुश बसेल, धाक निर्माण होईल आणि त्यांच्यामुळे होणारे नुकसान कमी होईल, ही अपेक्षा नक्कीच अवाजवी नाही. येत्या वर्षात तरी या दृष्टीने काही निर्णय घेतले जातील अशी अपेक्षा आहे.

सध्या आपण निसर्गाचा लहरीपणाही जवळून अनुभवत आहोत. एका दिवसात सर्व ऋतूंचे दर्शन घडवणारा काळ सोसत आहोत. गेली काही वर्षे होत असलेल्या चुका दुरुस्त केल्या नाहीत तर येत्या काळात हा लहरीपणा वाढणारच आहे. त्यामुळेच येणारे वर्ष निसर्गाला न पेलणारा विकास कमी करण्याच्या विचाराच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरणारे आहे. थेंबाथेंबाने तळे साठते हे खरेच आहे. मात्र अतिउष्णतेने त्याची वाफ होण्यासही वेळ लागत नाही, हे वास्तव आहे. पर्यावरणाला, वन्य जीवनाला हानिकारक ठरणाऱ्या अनेक चुका आपल्या हातून झाल्या आहेत. अत्यंत संवेदनशील भागांमध्ये अट्टहासाने होणारा विकास आणि झालेले निकृष्ट काम खचणाऱ्या बोगद्यांच्या, पडणाऱ्या पुलांच्या, भेगाळणाऱ्या रस्त्यांच्या, थोडा पाऊस झाला तरी पाण्याखाली जाणाऱ्या मार्गांच्या रुपाने समोर आला आहे. त्यामुळे कुटुंबापासून समाजापर्यंत आणि ग्रामपातळीपासून देशपातळीपर्यंतच्या प्रत्येक पायरीवर याचा विचार होण्याची गरज आहे. पुढच्या पिढीसाठी उत्तम वातावरण निर्माण करणे, आहे ते जपणे हे वर्तमानातील पिढीचे कर्तव्य असते. मात्र सध्याची पिढी असेल, नसेल त्या साधनांचा चट्टामट्टा करत, सगळे काही संपवण्याच्या मागे आहे. मिळाले नाही तर ओरबाडून घेण्याचा अधाशी प्रयत्न करणाऱ्यांची भीड चेपल्याचे जाणवत आहे. याच प्रवृत्तीनिशी सामोरे गेलो तर नवीन वर्षात प्रवेश करणे हे केवळ दिनदर्शिकेचे नवे पान उलटण्यासारखे होईल. ते कोरे असेल पण करकरीतपणा पुढच्या पिढीचे भविष्य धोक्यात आणणारा ठरेल. म्हणूनच यंदा नववर्षाबरोबरच नवविचारांचेही स्वागत होणे गरजेचे आहे. देश आचार-विचाराने समृद्ध होईल तेव्हाच ग्रहणावस्थेतून बाहेर येत नव्या तेजाने झळाळून निघेल. तेव्हा नववर्षामध्ये त्याचे पहिले दर्शन घडेल अशी अपेक्षा व्यक्त करत स्वागताला सिद्ध होऊ या.

✦✦✦

## अपघातात गेला होता विद्यार्थिनीचा जीव

# बस अन् चालकाचा परवाना निलंबित

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :
हिंगणा स्कूलबस अपघाताला सुमारे एक महिन्याचा कालावधी पूर्ण झाला आहे. त्यानंतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून या अपघाताला जबाबदार असलेली खासगी बस आणि चालकावर कारवाईचा बडगा तीन आरटीओ कार्यालयांनी उगारला आहे.

उपराजधानीतील शंकरनगरमधील सरस्वती माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी सहलीला जात असताना भाड्याने घेतलेल्या बसवरील चालकाचे नियंत्रण सुटून २६ नोव्हेंबरला बस हिंगणा परिसरात उलटली. या अपघातात एका विद्यार्थिनीचा मृत्यू, तर अनेक विद्यार्थी जखमी झाले. सर्व जखमींवर नागपुरातील एम्स रुग्णालयात उपचार सुरू केले गेले. या प्रकरणात अपघातग्रस्त बसचा परवाना नसणे, अपघातानंतर बसची पीयूसी काढण्यात येणे, अपघातग्रस्त बसचा आपत्कालीन द्वार कायमचा बंद असणे, अशा अनेक त्रुटी पुढे आल्या होत्या.



दरम्यान, आरटीओच्या विविध कार्यालयाशी संबंध असल्याने या प्रकरणात एकाच वेळी तीन आरटीओ कार्यालयांकडून संबंधित प्रकरणात नोटीस बजावण्यासह इतर कारवाईची प्रक्रिया सुरू होती. त्यानुसार शहर आरटीओ कार्यालयाने बस चालकाला वाहन चालवण्याचा परवाना निलंबनाची नोटीस बजावली.

नागपूर ग्रामीण आरटीओ कार्यालयाने बस मालकाला परवाना निलंबन का करण्यात येऊ नये, अशी नोटीस बजावली. पूर्व नागपूर आरटीओ कार्यालयाकडून पीयूसी केंद्राला त्यांचा परवाना रद्द का करण्यात येऊ नये, अशी नोटीस बजावण्यात आली.

**दोन विद्यार्थ्यांसह शिक्षिकेवर शस्त्रक्रिया**
अपघातग्रस्त बसमधील एका विद्यार्थ्याच्या पोटाला गंभीर इजा झाली होती. तातडीने त्यावर शस्त्रक्रिया केली गेली. एका विद्यार्थ्याच्या मूत्रपिंडावर शस्त्रक्रिया झाली. शिक्षिकेच्या पाठीच्या मनक्याला इजा असल्याने तिच्यावर उपचार झाले.

समाधानकारक उत्तर न मिळाल्याने पूर्व नागपूर आरटीओ कार्यालयाने संबंधित पीयूसी केंद्राचा परवाना निलंबित करून यंत्र जप्त केले. शहर आरटीओने बस चालकाचा परवाना सहा महिन्यांसाठी निलंबित केला तर नागपूर ग्रामीण आरटीओने बसची नोंदणी ९० दिवसांसाठी निलंबित केली. एकाच वेळी तिन्ही आरटीओंकडून कारवाई झाल्याने परवानगी न घेता सहलीचे आयोजन करणाऱ्या खासगी बस चालकांचे धाबे दणाणले आहेत.

## सरत्या वर्षात एनडीपीएसची मोठी कारवाई
# अडीच कोटींचा मुद्देमाल जप्त

**११२ आरोपींना अटक**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :
अंमली पदार्थ आणि सायकोट्रॉपिक पदार्थ कायद्यांतर्गत येथील अंमलीपदार्थ विरोधी पथकाने धडाकेबाज कारवाई करीत २ कोटी ६० लाख ७२ हजार ३८५ रूपयांच्या मुद्देमालासह ११२ आरोपींना अटक केली आहे.

मुद्देमालासोबत जप्त केलेले मोबाईल, गाडी असे इतर साहित्य पकडून ५ कोटी ४१ लाख ७२ हजार रूपयांचा माल जप्त केल्याचे अहवालात नमुद केले आहे. एनडीपीएसच्या वार्षिक अहवालात एकूण ५२ प्रकरणे दाखल करण्यात आली. तर २४१ किलो ७०१ ग्रॅमचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले.

ताज्या कारवाईत कुख्यात गँगस्टर सुमित चिंतलवार, मीर मिश्रा, मोनू मिश्रा व इतर साथीदारांना क्राईम ब्रांचच्या एनडीपीएस पथकाने ५० लाखांपेक्षा एमडीसह पकडले. १ जानेवारी ते २५ डिसेंबर २०२४ या कालावधीत ४५ लाख २४ हजार रूपयांचा २३९ किलो गांजा जप्त केला. तसेच ४८ आरोपींना अटक करण्यात आली. १ लाख ७५ हजार रूपयांचे ७५ ग्रॅम चरस, २ कोटी १३ लाख ९३ हजार ३०० रूपयांचे २ किलो मेफेड्रोन जप्त करण्या सोबत ४४ आरोपी अटकेत आहे. ६ लाख ८४ हजार रूपयांचा मांजा, कॉपी राईट ॲक्ट अंतर्गत २ कोटी ०४ लाख ०७ हजार रूपयांची कारवाई करीत ६ आरोपींना अटक केली.

१ ते २५ डिसेंबर २०२४ या कालावधीत ७ प्रकरणांत ११ लाख १४ हजार ६८० रूपयांचे २६ किलो २९३ ग्रॅम अंमली पदार्थ जप्त केले. तर २७ आरोपींना अटक केली आहे. तर १ जानेवारी ते ३० नोव्हेंबर या कालावधीत ३ कोटी ९६ लाख ६९ लाख १०५ रूपयांचे ४८२ किलो ४३४ ग्रॅम अंमली पदार्थ जप्त केले. तर ३७० आरोपींना अटक करण्यात आली.

१ जानेवारी ते ३० नोव्हेंबर या कालावधीत ३ कोटी २० लाख ६१ हजार रूपयांचे मेफेड्रॉन तसेच ६३ लाख ७७ हजार रूपयांचा गांजा जप्त करण्यात आला. नागपूर शहरात ड्रग विक्रेत्यांचे मोठे नेटवर्क उभे झाल्याचे दिसून येत आहे.

# पैशाच्या वादातून भाच्यांचा खून

**नागपुरात थरार**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :
पैशाच्या वादातून मामानेच आपल्या दोन्ही भाच्यांचा चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात एका भाच्याचा घटनास्थळावरच मृत्यू झाला तर दुसऱ्यावर मेयो रुग्णालयात उपचार सुरू असताना पहाटे चार वाजताच्या सुमारास मृत्यू झाला.

ही थरारक घटना रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास तहसील पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंतर्गत काली माता मंदिरासमोर गांधीबाग येथे घडली. रवी राठोड आणि दीपक राठोड असे मृत्यू झालेल्या भाच्याची नावे आहेत. बदनसिंग राठोड असे आरोपी मामाचे नाव आहे. भर रस्त्यावर झालेल्या हत्याकांडामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था पुन्हा बिघडल्याचे चित्र दिसत आहे.

तहसील पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रवी व दीपक राठोड हे सख्खे भाऊ आहेत. दोघेही हंसापुरी भागात राहतात. त्यांचा बांगड्या विक्रीचा व्यवसाय आहे. मागील काही दिवसांपासून त्यांचा आपला मामा बदनसिंग सोबत पैशाच्या व्यवहारातून वाद सुरू होता.

पैसे देत नसल्यामुळे मामा चिडून होता. रविवारी मध्यरात्री १२ वाजताच्या सुमारास मामाने आपला गांधीबागमध्ये भाचा रविवर चाकूने जीवघेणा हल्ला केला. मामाचा अवतार बघून आपल्या भावाला वाचविण्यासाठी दीपकने धाव घेतली. मामाने त्याच्यावरही चाकूने हल्ला केला. दीपकला गंभीर जखमी अवस्थेत पोलिसांनी रुग्णालयात दाखल केले मात्र दीपकचाही पहाटे चार वाजताच्या सुमारास मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच तहसील पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा ताफ्यासह घटनास्थळी पोहोचले. रात्री १ वाजता पोलीस अधिकारीसुद्धा पोहोचले. जखमी दिपकवर मेयो रुग्णालयात उपचार सुरू होता. पहाटे चार वाजताच्या सुमारास दीपकचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला.

दीपक आणि रवीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. या घटनेमुळे गांधीबाग परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. या घटनेने उपराजधानी पुन्हा एकदा हादरली आहे.

# ठॉय, ठॉय थांबलं पाहिजे...

**सुरेश धस आक्रमक**



■ वृत्तसंस्था, बीड, दि. ३० :
बीड जिल्ह्यात बंदुकीचे परवाने भाजपील्यासारखे, चिरीमिरीसारखे वाटले आहेत. ते कोणीही लोक असोत, त्या लोकांवर तातडीने कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी आष्टीचे भाजप आमदार सुरेश धस यांनी केली. ते आज जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना भेटले. त्यानंतर सुरेश धस माध्यमांशी बोलत होते.

105 परवाने रद्द झाले आहेत. दहा-बारा परवाने बँकांशी संबंधित आहेत. राहिलेले हजार परवान्यांचा रिव्ह्यू घेऊन लवकरात लवकर रद्द करू असं आश्वासन जिल्ह्याधिकाऱ्यांनी दिलं आहे, कोणत्या एसपीच्या काळात सर्वाधिक परवाने दिले त्याचे नाव आणि यादी मागवली आहे. यादी मिळाल्यावर चिरीमिरी घेऊन एसपी आणि डीवाएसपी अग्निशस्त्र परवाने दिले असेल तर बिहारच्या पुढचं काबुलिस्तान झाल्याची वेळ आली आहे, असं धस म्हणाले.

लग्नात आल्यावर बंदूक दाखवतो. लक्ष्मीपूजन, आणि ढाब्यावर ठॉय ठॉय केलं जात आहे. हे सर्व थांबलं पाहिजे. सर्व परवाने रद्द करावे. नाही केलं तर आम्ही जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करणार आहे. ज्यांनी शिफारसी केल्या आहेत. तेही बाहेर यावं. माझा फोन आला असेल शस्त्र परवान्यासाठी तर माझ्यावरही कारवाई करावी, असेही ते म्हणाले.

**राखेच्या धंद्यासाठी पुरावे लागतात का?**

राखेच्या धंद्यासाठी पुरावे लागतात का? माझ्याकडे काही पुरावे आले आहेत. लवकरच ते मी सादर करणार आहे. पिस्तूल प्रकरणावर जिल्हाधिकारी कारवाई करतील यावर विश्वास आहे, असं सुरेश धस म्हणाले.

## शिवसेनेचे माजी खासदार सतीश प्रधान यांचे निधन

**ठाणे :** महापालिकेचे प्रथम नगराध्यक्ष, प्रथम महापौर आणि शिवसेनेचे माजी खासदार सतीश प्रधान यांचे रविवारी ठाण्यात वृद्धापकाळाने निधन झाले. ते 85 वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ठाणे शहराच्या विकासात तसेच शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीत प्रधान यांनी मोठे योगदान दिले होते.

ठाण्याचे पहिले नगराध्यक्ष म्हणून 1974-81 या कालावधीत सतीश प्रधान यांनी काम पाहिले. शहरात शिवसेना पक्षाचा पाया रोवण्यात त्यांचा मोठा वाटा होता. 1986-87 या काळात त्यांनी शहराचे पहिले महापौरपद भूषवले. यासह शिवसेनेचे राज्यसभा सदस्य, संसदीय गटनेते आणि केंद्रातील विविध समित्यांवर त्यांनी काम केले.

## बस-ट्रकच्या धडकेत दोन भक्त ठार

**पंढरपूर :** खासगी प्रवासी वाहतूक करणारी भाविकांची बस आणि मालवाहतूक ट्रक यांच्यात भीषण अपघात झाला. त्यामध्ये दोन विठ्ठलभक्तांचा जागीच मृत्यू झाला तर अन्य १३ भाविक जखमी झाले. पंढरपूर ते टेंभुर्णी मार्गावरील भटुंबरे गावच्या हद्दीत पंढरपूरपासून दोन किलोमीटर अंतरावर ही दुर्घटना घडली.

बसमधील बेबाबाई महाळसकर वय (55) व जनाबाई महाळसकर (7) अशी मृतांची नावे आहेत. अपघातग्रस्त बस पुणे जिल्ह्यातील असून मृत भाविक मावळ तालुक्यातील आहेत. बसचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पंढरपूर - टेंभुर्णी मार्गावर भटुंबरे गावच्या हद्दीत रविवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास तुकाराम खेडलेकर महाराज मठासमोर हा अपघात झाला. टेंभुर्णीकडून पंढरपूरकडे येणाऱ्या भाविकांची बस (एमएच 14 एलएस ३955) आणि पंढरपूरकडून टेंभुर्णीकडे निघालेल्या मालवाहतूक ट्रकची (आरजे 14 जीएल 1780) समोरासमोर धडक झाली. बस आणि मालवाहतूक ट्रकचा समोरचा भाग चक्काचूर झाला आहे.

## मदरशातील मुलाने घेतला गळफास

**मुंबई :** मुंबईतील मालवणी भागात एका मदरशाच्या स्वयंपाकघरात 11 वर्षांचा मुलगा फासाला लटकलेल्या अवस्थेत सापडला, अशी माहिती पोलिसांनी दिली. मालवणी मदरशाच्या (इस्लामिक सेमिनरी) शिक्षकाने या विद्यार्थ्याला खेळण्यासाठी बाहेर गेल्याबद्दल खडसावले असता या विद्यार्थ्याने कपड्यांचा वापर करून छताच्या लोखंडी रॉडला गळफास घेतला. त्याचे नाव अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. पोलिस या मुलाच्या कुटुंबीयांचा शोध घेऊन सखोल चौकशी करत आहेत.

## नांदेड शहरातून बांगलादेशी अटकेत

**नांदेड :** शहरातील कौठा भागात गेल्या अनेक महिन्यांपासून अनधिकृतरीत्या घुसखोरी करून राहणाऱ्या बांगलादेशी युवकाला, दहशतवाद विरोधी पथक व नांदेड ग्रामीण पोलिसांनी अटक केली. यासीन खान अन्वर खान ऊर्फ सुमन विकास बिस्वास (25, रा. गोपीनाथपूर, जि. गोपालगंज, डिव्हिजन ढाका, बांगलादेश) असे अटकेतील युवकाचे नाव आहे.

कौठा येथे न्यायालयाच्या नूतन इमारतीचे बांधकाम सुरू आहे. या ठिकाणी एक घुसखोर बांगलादेशी राहत असल्याची माहिती दहशतवाद विरोधी पथकाचे नांदेड युनिटचे पोलिस निरीक्षक दत्ता केंद्रे यांना मिळाली. यावरून पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी संबंधित युवकाला अटक केली. अधिक चौकशी केली असता त्याच्याकडे भारतात येण्यासाठी आवश्यक असणारे वैध कागदपत्रे नसल्याचे आढळून आले. त्यानंतर त्यास नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात नेऊन पोलिसांनी चौकशी केली. त्याने स्वतःहून बांगलादेशी नागरिक असल्याची कबुली दिली. रोजगारासाठी भारतात आल्याचे त्याने सांगितले. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक महेश गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलिसांत, आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## खासगी शाळा नोंदणी मुदत आजपर्यंत
### पोर्टल १ जानेवारीस सुरू

**नाशिक :** शिक्षण हक्क अधिकार कायदा अर्थात आरटीईनुसार 25 टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी खासगी शाळांच्या नोंदणीस मंगळवारी (दि. ३१) अखेरची मुदत आहे.

नवीन वर्षाच्या सुरवातीस १ जानेवारीपासून शालेय शिक्षण विभागाकडून आरटीई प्रवेशाचे पोर्टल सुरू करण्यात येणार आहे. आरटीई प्रवेशासंदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून काही दिवस आधीच नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे पुढील दीड महिन्यात प्रवेश पूर्ण केले जाण्याची शक्यता आहे.

## लठ्ठपणा आजार आणि आधुनिक उपचार

**लोकारोग्य**



**: हॅलो डॉक्टर :**
अलीकडच्या काही दशकांचा विचार केला तर आपली भारतीय जीवनशैली झपाट्याने बदलताना दिसतेय. चटपटीत, चमचमीत आणि फास्टफूड अशा खाण्याच्या बदलत्या सवयींचा मोठा दुष्परिणाम हा मानवी आरोग्यावर होताना दिसतोय.

जंकफूड आणि फास्टफूड अशा चुकीच्या आहारामुळे आणि व्यायामाच्या अभावामुळे अगदी छोट्यांपासून ते जेष्ठांपर्यंत लठ्ठपणा हा आजार वाढताना दिसतोय. लठ्ठपणा म्हणजे केवळ वजन वाढणे इतकाच मर्यादित अर्थ नसून वाढत्या वजनामुळेच हृदयविकार,मधुमेह,लैंगिक अक्षमता वाढणे, फुफुसाचे विकार,किडनीचे आजार अशा प्रकारचे विविध स्वरूपाचे शारीरिक दुष्परिणाम देखील उद्भवतात.

हा लठ्ठपणा आजार म्हणजे नक्की काय?आणि लठ्ठपणा टाळण्यासाठी उपाय काय? लठ्ठपणा कायमचा घालवून विविध शारीरिक आजारांपासून मुक्ती मिळवायची असेल तर आधुनिक उपचार पद्धती नेमक्या कोणत्या आहेत? या संदर्भात जे टी फाउंडेशन च्या संचालिका आणि महाराष्ट्र राज्य सरकारच्या लठ्ठपणाच्या विरुद्ध सुरु असलेल्या अभियानाच्या मार्गदर्शिका, भारतातील पहिल्या महिला बेरियाट्रिक सर्जन डॉ. जयश्री तोडकर यांच्याशी केलेली बातचीत.

**लठ्ठपणा आजार आहे का?**
होय, वैद्यकीय शास्त्राच्या संशोधनानुसार लठ्ठपणा किंवा स्थूलत्व हा नक्कीच एक आजार मानला गेला आहे. बदलत्या भारतीय जीवनशैलीमुळे विशेषतः खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि प्रकार आणि व्यायामाचा अभाव यामुळे शरीरात चरबीचे प्रमाण वाढत जाते आणि शारीरिक संस्थेची कार्यप्रणाली बिघडते. चयापचय क्रिया देखील बदलते. त्याचाच दुष्परिणाम म्हणजे हृदयविकार, मधुमेह, शरीरातील हार्मोन्स मध्ये चुकीचे बदल घडणे, लैंगिक क्षमता कमी होणे, फुफ्फुसाचे विकार बळावतात. लठ्ठपणाचा हा आजार मानसिक तणाव देखील निर्माण करतो त्यामुळे लठ्ठपणावर आपल्या तज्ञ डॉक्टारांकरवी वेळीच उपचार करणे गरजेचं आहे.

**दुष्परिणाम नेमके काय होऊ शकतात?**
स्त्री किंवा पुरुषाचे वजन हे त्याच्या उंचीनुसार अवलंबून असत. मात्र, हे शारीरिक वजन हे खूप फसवे असते अगदी वेगाने ते वाढते आणि त्यानंतर प्री डायबिटिक त्रास सुरु होतो. थायरॉइडच्या ग्रंथी देखील काम करेनाशा होतात. शरीरातील मेटाबॉयलिझम कमी होतो. व्यक्ती जसजशी जाड होत जाते, तसे तसे शरीरातील इन्सुलिन कमी होत जाते. परिणामतः अधिक भूक लागणे, सतत तहान लागणे, एकदा जेवल्यानंतर देखील पुन्हा खाण्याची इच्छा होणे असे विकार बळावू लागतात.

अनेकदा मानेभोवती, जांघेत व काखेत काळपटपणा येतो, चामखीळ येतात. ही सगळी प्री डायबिटिकची लक्षण असतात. याशिवाय हृदयविकार किडण्याचे विकार, रक्तवाहिन्या जाडसर होणे आणि शरीरातील हार्मोन्सची लेव्हल कमी झाल्यामुळे वीर्यातील शुक्राणूंची संख्या कमी कमी होत जाणे असे अनेक दुष्परिणाम होऊ लागतात.

**बेरियाट्रिक सर्जरी उत्तम उपचार**
लठ्ठपणा हा शरीरावर शस्त्रक्रिया करून चरबी कमी करून कमी करता येतो. मात्र शरीरातील मेटाबायलिझम कमी करण्यासाठी दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करून शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करता येते.

या शस्त्रक्रियेत जठरात जी टोपी असते त्याभागात फॅट न जळल्यामुळे अतिरिक्त चरबी वाढते ज्यामुळे हार्मोन्स बिघडतात, ती चरबी कढून टाकली जाते. आणि मेटाबायलिझम कमी करता येतो व पर्यायाने वजन देखील कमी होते, ज्यामुळे शरीरावरील होणारेय इतर दुष्परिणाम टाळता येतात. हि सर्जरी दुर्बिणीद्वारे केली जाते आणि २ दिवसात तो रुग्ण नेहमीच्या कामाला लागू शकतो. ही सर्जरी म्हणजेच बेरियाट्रिक सर्जरी.

**आहार आणि विहार कसा असावा?**
लठ्ठपणा टाळायचा असेल तर चमचमीत स्वरूपाचे जंक आणि फास्ट फूड खाण बंद करावं. तळलेल्या पदार्थांचा देखील आहारात समावेश टाळावा. व्यक्ती तितक्या प्रकृती या उक्ती प्रमाणे प्रत्येक व्यक्तीचा आहार हा त्याच्या वजनाप्रमाणे घेणं गरजेचं आहे.

शिवाय, चालणं आणि व्यायाम करण देखील तितकाच गरजेचं आहे. शिवाय उत्तम आहार विहराबरोबरच मानसिक आरोग्य देखील स्वस्थ ठेवणं तितकंच गरजेचं असत. शरीराचा मास इंडेक्स योग्य प्रमाणात ठेवला तर लठ्ठपणा नक्कीच टाळता येतो. ■ ■

# वाल्या कराडला आणायला काय हरकत?



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून सरकारवर सडकून टीका केली. तुम्ही दाऊदला फरफटत आणणार होते. मग वाल्या कराडला आणायला काय हरकत आहे? असा थेट सवाल जितेंद्र आव्हाड यांनी सरकारला केला आहे.

राजकीय हस्तक्षेपामुळे वाल्मीक कराडवर जाणीवपूर्वक कारवाई केली जात नसल्याचा आरोपही आव्हाड यांनी केला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात अजित पवार यांनीही पक्षअध्यक्ष म्हणून अद्यापपर्यंत कोणतीच जबाबदारी घेतली नाही, असेही ते म्हणाले.

सरपंच संतोष देशमुख हत्याकांडमुळे संपूर्ण राज्य हादरले आहे. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळील वाल्मीक कराडचे नाव आल्यामुळे या प्रकरणाची संवेदनशीलता वाढली आहे. वाल्मीक कराडला अद्याप अटक का केली होत नाही? असा सवाल विरोधकांकडून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर जितेंद्र आव्हाड यांनी आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी या प्रकरणावरून सरकारवर टीकास्त्र सोडले. तसेच अजित पवार यांच्यावरही निशाणा साधला.

या प्रकरणी 302 मध्ये वाल्मिक कराड यांचे नाव नाही. मोक्का लावू असे सभागृहात सांगितले होते, मात्र अद्याप काहीच हालचाली नाही, तुम्ही दाऊदला फरफटत आणणार होते. मग वाल्या कराडला आणायला काय हरकत आहे? असा सवालही आव्हाड यांनी केला. तुम्ही वाल्या कराडला आणू शकत नाही, तर मग दाऊदपर्यंत कसे पोहोचणार? असा टोलाही आव्हाड यांनी लगावला.

## मजुरांच्या माध्यमातून २ हजारांच्या
# नोटा बदलवण्याचे रॅकेट

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :
दीड वर्षांपूर्वी भारतीय रिझर्व बँकेने चलनातून बाद केलेल्या दोन हजार रुपयांच्या नोटा मजुरांच्या माध्यमातून बदलवून घेणारे मोठे रॅकेट पोलिसांनी उघड केले असून त्याचे कनेक्शन थेट दिल्ली, गुजरात आणि उत्तरप्रदेश राज्यांशी असल्याचे तपासात उघड झाले आहे.

मजुरांकडून लाखोंच्या नोटा बदलवून त्यांना काही रुपयांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून काम करून घेतल्या जात होते. यामागे व्यापाऱ्यांची टोळी कार्यरत असल्याचे समजते.

सदर पोलिसांनी दलाल नंदलाल मोर्या (३५) रा. सीताबर्डी, रोहित बावणे (३४) रा. शांतीनगर, किशोर बोहरीया (५४) रा. झिंगाबाई टाकळी आणि व्यापारी अनिलकुमार जैन (५६) रा. जबलपूर-मध्यप्रदेश यांना अटक केली आहे. नोटा बदलून घेणाऱ्या टोळीचा म्होरक्या अनिलकुमार जैन असून त्याने आतापर्यंत कोट्यवधीच्या नोटा बदलवल्या असल्याची माहिती समोर आली आहे.


गेल्या दीड वर्षांपूर्वी २ हजार रुपयांच्या नोट चलनातून बाद करण्यात आल्या. मात्र, ज्यांच्याकडे अजूनही नोटा आहेत, त्यांनी आरबीआयमध्ये आपला पत्ता, आधारकार्ड देऊन नोटा बदलवून देण्यात येतात. मात्र, त्यासाठी २० हजार रुपये अशी मर्यादा घालण्यात आली आहे. महाराष्ट्रात नागपूर, बेलापूर आणि मुंबई या तीन ठिकाणी नोटा बदलून घेण्यात येते.

रिझर्व्ह बँकेत विशेष काउंटर आहे. मुख्य आरोपी अनिलकुमार जैन हा दिल्ली आणि उत्तरप्रदेशातून २ हजारांच्या चलनी नोटा आणतो. त्या बदलण्यासाठी त्याने नागपुरातील नंदलाल मोर्या, रोहित बावणे आणि किशोर बहोरीया यांना हाताशी धरले. बहोरिया हा झोपडपट्टीबहुल वस्त्यात जाऊन महिलांना गोळा करीत होता. त्या महिलांना ३०० रुपये मजुरी देऊन आरबीआयमधून नोटा बदलविण्यास सांगत होता.

**आतापर्यंत बदलविल्या कोट्यवधी रुपयांच्या नोटा**
गेल्या तीन महिन्यांपासून नोटा बदलविण्यासाठी आरबीआयमध्ये महिलांची अचानक गर्दी वाढायला लागली. त्यामध्ये मजूर, गरीब आणि झोपडपट्टीतील महिलांचा मोठ्या प्रमाणावर समावेश होता. त्यामुळे या रॅकेटची कुणकुण ठाणेदार मनिष ठाकरे यांना लागली. त्यांनी सापळा रचून काही महिलांना ताब्यात घेतले. त्यांनी नोटा बदलविण्याचा मोहबदला म्हणून ३०० रुपये मिळत असल्याची कबुली दिली. त्यानंतर हे अनिल जैनचे नाव समोर आले. या टोळीत आता आणखी आरोपींची संख्या वाढणार आहे.

**अशी आहे साखळी**
अनिलकुमार जैन हा मध्यप्रदेशात फाटक्या नोटा कमी पैशात घेऊन बँकेत बदलविण्याचे काम करायचा. तो दिल्ली, उत्तरप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, गुजरात अशा राज्यातील व्यापाऱ्यांकडून दोन हजार रुपयांच्या नोटा आणायचा.

तो एका लाखावर २० हजार रुपये कमिशन घ्यायचा. तर नागपुरातील रोहित, किशोर आणि नंदलाल या तिघांना प्रत्येक मजुरामागे १ हजार रुपये देत होता. अशाप्रकारे एका लाखांतील जवळपास ७५ हजार रुपये व्यापाऱ्यांना परत देण्यात येत होते.



## नेफ्रोप्लसने वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये एचडीएफ तंत्रज्ञानासह ॲडव्हान्स डायलिसिस केअर सेवा


नेफ्रोप्लस, आशियातील सर्वात मोठ्या डायलिसिस नेटवर्कने, मुंबईतील आग्रीपाडा येथील वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये प्रगत हेमोडायफिल्ट्रेशन तंत्रज्ञान सादर करून डायलिसिस उपचार मानकांमध्ये वाढ केली आहे.

हा उपक्रम नेफ्रोप्लसच्या अत्याधुनिक डायलिसिस सेवा प्रदान करण्याच्या आणि भारतभरातील रुग्णांसाठी त्या प्रवेशयोग्य, परवडण्याजोग्या आणि प्रभावी बनविण्याच्या निरंतर प्रतिबद्धतेचा एक भाग आहे.

वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये हेमोडायफिल्ट्रेशन तंत्रज्ञानाचा परिचय क्रांतिकारक डायलिसिस उपचार आणि सेवांच्या वितरणात एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. HDF ही एक तांत्रिकदृष्ट्या प्रगत थेरपी आहे जी शरीरातून मध्यम रेणू काढून टाकण्याच्या मोठ्या क्षमतेसाठी ओळखली जाते, जी पारंपारिक डायलिसिसने प्रभावीपणे काढली जात नाही. हे रेणू डायलिसिस - संबंधित अमायलोइडोसिस सारखे दीर्घकालीन परिणाम घडवतात, ज्यामुळे गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. जे रुग्ण HDF वापरतात त्यांना सुधारित नैदानिक परिणाम, उच्च जीवन गुणवत्ता आणि द्रव निर्मूलनाशी संबंधित कमी समस्यांचा फायदा होतो.

हे सुधारित आणि सुरक्षित डायलिसिस थेरपी शोधणाऱ्या रुग्णांसाठी HDF हा एक आदर्श पर्याय बनवते. वोक्हार्ट हॉस्पिटलमधील नेफ्रोप्लस क्लिनिकमध्ये एक विशेष एचडीएफ मशीन आहे ज्याचा रुग्ण आता वापर करू शकतात आणि चांगल्या थेरपीचा लाभ घेऊ शकतात. ■ ■

## आरोग्य आणि सौंदर्यवर्धक कांदा



भारतीय खाद्यसंस्कृतीत कांदा महत्त्वाचा घटक आहे. कांद्याशिवाय अथवा कांदा-खोबऱ्याच्या वाटणाशिवाय भारतीय जेवण पूर्णच होऊ शकत नाही. जेवतानाही कच्चा कांदा पानात वाढण्याची पद्धत आहे. कच्चा कांदा खाण्याचे फायदे अनेक आहेत.

लाल कांद्यामध्ये फ्लेव्होनॉईड असते ज्यामुळे हृदयाचे आरोग्य राखले जाते. शिवाय कांद्यामध्ये नैसर्गिक सल्फरही असतं ज्याचा तुमच्या हृदयावर चांगला परिणाम होतो. कांद्यातील सल्फरमुळे हृदयविकाराचा धोका टाळता येतो. कांद्यामुळे रक्त पातळ होते आणि हार्ट अटॅक अथवा स्ट्रोकचा धोका कमी होतो. जर तुम्ही नियमित कांदा खात असाल तर तुमच्या रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होते. कांद्यामधील सल्फरमुळे मधुमेह नियंत्रित राहतो. कांदा हा एक फायबरयुक्त पदार्थ आहे. यात मोठ्या प्रमाणावर फायबर्स असतात ज्याचा चांगला परिणाम तुमच्या पचनसंस्थेवर दिसून येतो. कांद्यामधील गुणकारी घटक तुमच्या आतड्यांमध्ये चांगले बॅक्टेरिआ निर्माण करतात. ज्यामुळे अन्नाचे पचन चांगल्या पद्धतीने होते. ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre@rediffmail.com

नागपूर
# महासागर वृत्तसागर
■ मंगळवार, दि. ३१, डिसेंबर २०२४ ■

## प्लॅटफॉर्म तिकीटविक्री २ जानेवारीपर्यंत बंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

मावळत्या वर्षाला निरोप व नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी विविध ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत वाढ झाली आहे.

प्रवाशांना स्थानकावर सोडण्यासाठी येणाऱ्या व्यक्तींची संख्या अधिक असते. त्यामुळे, रेल्वेस्थानकावर गर्दी उसळते. हीच बाब लक्षात घेवून, मध्य रेल्वेच्या मुख्य स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर तात्पुरते निर्बंध घालण्यात आले आहेत. नागपूर रेल्वेस्थानकावर २ जानेवारीपर्यंत प्लॅटफॉर्म तिकीटविक्री बंद राहणार असल्याची माहिती मध्य रेल्वेकडून देण्यात आली आहे.

रेल्वेस्थानकावरील अतिरिक्त गर्दी रोखण्यासाठी प्लॅटफॉर्म तिकीटविक्री बंद असली तरी एकट्याने प्रवास करणाऱ्या वृद्ध, ज्येष्ठ नागरिक,आजारी व्यक्ती, लहान मुले, व्यक्ती व महिला प्रवाशांना स्थानकावर सोडण्यासाठी येणाऱ्या व्यक्तींना सूट देण्यात आली आहे.

मध्य रेल्वे प्रशासनाने नागपूरसह १४ रेल्वे स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीटविक्री बंद करण्याचा निर्णय घेतला. काही वर्षांमधील अनुभव लक्षात मध्य रेल्वे प्रशासनाने तात्पुरते निर्बंध आणले आहेत.

हे निर्बंध २ जानेवारी २०२५ च्या मध्यरात्री १२.०० वाजेपर्यंत लागू असतील. त्यामुळे, प्रवाशांव्यतिरिक्त अन्य व्यक्ती स्थानकात प्रवेश करू शकणार नाही.

# युपीएससी मुलाखतीसाठी दिल्लीत नि:शुल्क अभिरुप मुलाखत प्रशिक्षण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) नागरी सेवा (मुख्य) परीक्षा २०२४-२०२५ उत्तीर्ण झालेल्या व मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या राज्यातील उमेदवारांसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्यावतीने ४ जानेवारी ते ६ एप्रिल २०३५ दरम्यान नवी दिल्ली येथील जुन्या महाराष्ट्र सदनात अभिरुप मुलाखत प्रशिक्षण २०२४-२५ कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पात्र उमेदवारांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन या कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक तथा भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र नागपुरचे संचालक डॉ. प्रमोद लाखे यांनी केले आहे.




केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा (मुख्य) परीक्षा २०२४-२५ परीक्षेचा निकाल ८ डिसेंबर २०२४ रोजी घोषित झाला असून मुख्य परीक्षेत उत्तीर्ण होऊन मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या पुढाकाराने अभिरुप मुलाखत प्रशिक्षण २०२४-२५ कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागातर्फे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमातंर्गत उमेदवारांसाठी अभिरुप मुलाखती सत्रांचे ४ जानेवारी ते ६ एप्रिल २०२५ दरम्यान येणा-या प्रत्येक शनिवार व रविवारी दिल्लीतील जुने महाराष्ट्र सदन, कोपरनिकस मार्ग, मंडी हाऊस जवळ, नवी दिल्ली-११०००१ आयोजन करण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील सर्व उमेदवारांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी संकेतस्थळावरील सविस्तर सूचना बघावी. संपकार्साठी दुरध्वनी क्रमांक ०७१२-२५६५६२६ या दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्र. ९४२२१०९१६८ या क्रमांकावर संपर्क साधावा. तथा मुलाखती संदर्भातील प्रवेश अर्ज जुने महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथील मुलाखत केंद्रावर उपलब्ध करुन देण्यात येईल. अजासीबत युपीएससीचे मुलाखत पत्र, डोमेसाईल प्रमाणपत्र आणि पासपोर्ट आकारातील फोटो आणावीत. तसेच प्रत्येक उमेदवारांनी मुलाखतीस येतांना D.A.F. च्या ०६ छायांकीत प्रती व एक पासपोर्ट फोटो न चुकता सोबत आणावेत, असे प्रसिद्धीप्रत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

## एसटी महामंडळाच्या पाच हजार बसेस भंगारात



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) मागील पाच वर्षांमध्ये पाच हजार बसेस भंगारात निघाल्या आहेत. भंगारात निघालेल्या बसेस तुलनेत नवीन बसेस उपलब्ध न झाल्याने प्रवाशांना समस्यांचा सामना करावा लागत आहे. हळू- हळू बसेस कमी होण्यासह एसटीच्या प्रवासी सेवेतील अडचणींबाबत आपण जाणून घेऊ या.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) २०१८- १९ दरम्यान १६ हजार ४१४ बसेस प्रवासी सेवेत होत्या. ही संख्या २०२२- २३ मध्ये घसरून १३ हजार ३१६ बसेसपर्यंत खाली आली. त्यामुळे बसेसची संख्या कमी होतांना दिसत आहे. तर ३१ मार्च २०२० दरम्यान एसटीच्या १ हजार ५८६ बसेस भंगारात निघाल्या. ३१ मार्च २०२१ मध्ये ९२९ बसेस, ३१ मार्च २०२२ मध्ये ७५२ बसेस, ३१ मार्च २०२३ मध्ये ५७९ बसेस तर ३१ मार्च २०२४ दरम्यान तब्बल १ हजार १२९ बसेस भंगारात निघाल्याची माहिती माहिती सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांना माहिती अधिकार कायद्याव्दारे प्राप्त झाली.

दरम्यान जुन्या बसेस भंगारात निघत असताना नवीन बसेस एसटीच्या ताफ्यात फारशा न आल्याने महामंडळातील बसेसची संख्या घसरली आहे. हिवाळी अधिवेशनादरम्यान महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी संचालक मंडळाची नागपुरात बैठक घेतली. यावेळी त्यांनी महामंडळाच्या ताफ्यात नवीन वर्षात ३ हजार ५०० बसेस दाखल होणार असल्याचा व ईव्ही बसेस व भाडेतत्वावरीलही अनेक बसेस मिळणार असल्याचा दावा केला होता. यावर आता महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने प्रश्न उपस्थित केला आहे. एसटी महामंडळाच्या ताफ्यातील बसेस कमी झाल्याने त्याचा प्रवासी सेवेवरही परिणाम होत आहे. राज्यातील विविध भागात यात्रा वा इतर मोठे कार्यक्रमानिमित्त पूर्वी मोठ्या प्रमाणात एसटीच्या फेऱ्या वाढवल्या जात होत्या. परंतु बसेसची संख्या कमी झाल्याने आता या फेऱ्या वाढवण्यावर मर्यादा आल्या आहे.

## खासदार क्रीडा महोत्सवाच्या तारखांची घोषणा १ जानेवारीला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या सातव्या खासदार क्रीडा महोत्सवाच्या तारखांची घोषणा बुधवारी 1 जानेवारी 2025 रोजी होणार आहे. महोत्सवाचे प्रेरक केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते रेशीमबाग येथील कवीवर्य सुरेश भट सभागृहामध्ये सायंकाळी 5.30 वाजता सातव्या खासदार क्रीडा महोत्सवाच्या तारखांची घोषणा तसेच क्रीडा संघटनांना ध्वज वितरण केले जाईल. या कार्यक्रमामध्ये प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि विशेष अतिथी म्हणून भारतीय पॅरा ऑलिम्पिक कमिटीचे अध्यक्ष पद्मश्री देवेंद्र झांझरिया उपस्थित राहतील, अशी माहिती माजी महापौर खासदार क्रीडा महोत्सवाचे संयोजक संदीप जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी सचिव डॉ. पीयूष आंबुलकर, कोषाध्यक्ष आशिष मुकीम, सदस्य पद्माकर चारमोडे, सचिन देशमुख, अशफाक शेख उपस्थित होते.

खासदार क्रीडा महोत्सवाच्या सातव्या पर्वाच्या तारखांची घोषणा समारंभामध्ये देशाचा अभिमान असलेले पॅरिस पॅरा ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूंचा विशेष सन्मान अतिथींच्या हस्ते करण्यात येणार आहे. बॅडमिंटन पुरुष एकेरीत सुवर्ण पदक विजेता नितेश कुमार, ॲथलेटिक्स भाला फेक मध्ये सुवर्ण पदक विजेता सुमित अँतिल, तिरंदाजी वैयक्तिक प्रकारात सुवर्ण पदक विजेता हरविंदर सिंग, ॲथलेटिक्स क्लब थ्रो मध्ये सुवर्ण पदक विजेता धरमबीर नैन, ॲथलेटिक्स उंच उडीमध्ये सुवर्ण पदक विजेता प्रवीण कुमार, ॲथलेटिक्स भाला फेक मध्ये सुवर्ण पदक विजेता नवदीप सिंग, महिला गटात 10 मीटर एअर रायफल शुटिंगमध्ये सुवर्ण पदक विजेती अवनी लेखारा या खेळाडूंनी पॅरा ऑलिम्पिकमध्ये आपल्या कामगिरीने जगात संपूर्ण देशाचे नावलौकिक केले आहे.

या सर्व खेळाडूंना खासदार क्रीडा महोत्सव समितीद्वारे बुधवारी 1 जानेवारी 2025 रोजी महोत्सवाचे प्रेरक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. यंदाचा खासदार क्रीडा महोत्सव मागील सहा महोत्सवांच्या तुलनेत अधिक भव्य आणि आकर्षक ठरणार आहे.

तरी या समारंभाला शहरातील खेळाडू, क्रीडा संघटक आणि क्रीडा प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माजी महापौर, खासदार क्रीडा महोत्सवाचे संयोजक संदीप जोशी यांनी केले आहे.

## कुंदन इंगळे यांची संयुक्त सचिव, राष्ट्रीय परिषद, आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संरक्षण परिषदेवर नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

दूरसंचार सल्लागार समितीचे सदस्य भारत सरकारच्या केंद्रीय संचार मंत्रालयाच्या अंतर्गत, म्हणून काम करणारे कुंदन वासुदेव इंगळे यांची नियुक्ती जाहीर करतांना आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संरक्षण परिषदला आनंद होत आहे. तीन वर्षांच्या कार्यकाळासाठी राष्ट्रीय परिषदेचे सहसचिव म्हणून इंगळे त्यांच्यासोबत अनुभव, समर्पण आणि मानवी हक्क आणि सामाजिक न्यायाच्या कायार्साठी प्रगल्भ वचनबद्धता आणतात. त्यांच्या नवीन भूमिकेत, इंगळे हे संपूर्ण देशात मानवी हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या परिषदेच्या दृष्टीकोनाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील. त्याच्या नेतृत्वाने



IHRPC ला नवीन टप्पे गाठण्यासाठी, त्याच्या पुढाकारांना बळकटी देण्यासाठी आणि समानता, सन्मान आणि न्यायाची संस्कृती वाढवण्याकडे नेण्याची अपेक्षा आहे.

या नियुक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना कुंदन इंगळे म्हणाले, आयएचआरपीसीच्या राष्ट्रीय परिषदेचे सहसचिव म्हणून काम करणे हा विशेषाधिकार आहे. IHRPC ची मूल्ये आणि ध्येय राखण्यासाठी आणि मानवी हक्कांना केवळ मान्यता नसून त्यांचा आदर आणि रक्षणही करता येईल असा समाज निर्माण करण्यासाठी मी अत्यंत कटिबद्ध आहे. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली, IHRPC चे उद्दिष्ट आहे की मानवी हक्कांच्या गंभीर आव्हानांना तोंड देण्यासाठी आपली पोहोच आणि परिणामकारकता वाढवणे. त्याची धोरणात्मक दृष्टी आणि सेवेची आवड यामुळे प्रभावी कार्यक्रम राबविण्याची अपेक्षा आहे ज्यामुळे देशभरातील समुदायांना फायदा होईल आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी अर्थपूर्ण योगदान मिळेल. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संरक्षण परिषद ही एक जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे जी मानवी हक्कांचे समर्थन, संरक्षण आणि संवर्धनासाठी समर्पित आहे.

विविध उपक्रमांद्वारे, IHRPC असमानता दूर करण्यासाठी, असुरक्षित समुदायांचे संरक्षण करण्यासाठी आणि सर्व व्यक्तींसाठी न्याय आणि सन्मान सुनिश्चित करण्यासाठी कार्य करते. (आयएचआरपीसि.ला) विश्वास आहे की कुंदन वासुदेव इंगळे राष्ट्रीय परिषदेचे सहसचिव म्हणून, संस्था समाजाची सेवा आणि मानवी हक्कांचे समर्थन करण्याच्या ध्येयात नवीन उंची गाठेल असे व्यक्त केले.

## राज्यातील हवामानात येत्या २४ तासात मोठे बदल

नागपूर : राज्यातील हवामानात पुन्हा एकदा बदल होणार आहेत. गेल्या आठवड्यात डोकावलेला अवकाळी पाऊस आता जवळजवळ परतला असून थंडी पुन्हा परत येणार आहे, असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. राज्यात कोरड्या वाऱ्यांचा झोत वाढणार असून तुरळक भागात हलका पाऊसही असण्याची शक्यता आहे. किमान व कमाल तापमान पुन्हा एकदा घट होण्याची शक्यता आहे. गेल्या आठवड्यात राज्यात ढगाळ वातावरण आणि अवकाळी पावसाला पोषक स्थिती होती. दरम्यान, अरबी समुद्रात वाढलेल्या आर्द्रतेमुळे राज्यात अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. आता चक्राकार वाऱ्यांची स्थिती सध्या उत्तर प्रदेश आणि परिसरात आहे. उत्तरेकडील राज्यात दाट धुके आणि थंडीची लाट आहे. परिणामी राज्यात कोरड्या वाऱ्यांचे प्रवाह सक्रिय होणार आहेत.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात किमान तापमानात दोन ते चार अंश सेल्सियसने तापमान घसरणार आहे.

## नितेश राणेंना मंत्रीपदावर राहण्याचा अधिकार आहे का? काँग्रेसचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

धर्मांधता व द्वेषाच्या राजकारणामुळे महाराष्ट्राची देशात पिछेहाट होत आहे. संविधानाची शपथ घेऊन धार्मिक द्वेष निर्माण करणारे आणि चिथावणीखोर वक्तव्य करणारे नितेश राणे यांना मंत्रिपदावर राहण्याचा अधिकार आहे काय, असा सवाल काँग्रेस केला आहे.



नितेश राणे यांनी एका कार्यक्रमात बोलताना लोकसभेतील विरोधी पक्ष नेते व काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी यांच्या लोकसभेतील विजयाबद्दल व्यक्तव्य केले. केरळ मधील वायनाड हे पाकिस्तानसारखे आहे म्हणून तेथून राहुल गांधी आणि प्रियंका गांधी जिंकून येऊ शकतात, असे ते म्हणाले होते. त्यावर काँग्रेसने तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. देशाची एकता व अखंडता राखण्याची शपथ घेऊन मंत्री झालेले नितेश राणे केरळला भारताचा पाकिस्तान म्हणतात आणि भारतीय जनता पक्षाला मतदान न करता काँग्रेस व इतर विरोधी पक्षांना मतदान करणाऱ्यांना दहशतवादी म्हणतात, अशा व्यक्तीला मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार आहे का? हे राष्ट्र प्रथम म्हणणाऱ्या भारतीय जनता पक्षाचे स्पष्ट करावे, असे प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री नितेश राणे यांच्या विधानाचा खरपूस समाचार घेत प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले की, नितेश राणे सारख्या व्यक्तीकडून काय अपेक्षा करणार? पण आमचा प्रश्न देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आहे की, आजच प्रसिद्ध झालेल्या व्यक्तीगत खर्चाच्या आकडेवारीमध्ये महाराष्ट्राला बिहार व उत्तर प्रदेशच्या बरोबर नेऊन ठेवले आहे. कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश व तेलंगणा ही गैरभाजपा शासित राज्ये यात दुपटीने आघाडीवर आहेत. शहर व ग्रामीण भागातील लोक जास्त कमावतात व जास्त खर्च करण्याची क्षमता ठेवतात हे सरकारचे आकडे आहेत. भाजपाने महाराष्ट्रात धर्मांधता व द्वेषाचे विष पेरल्याने राज्याची ही अवस्था झाली आहे म्हणूनच, कुठं नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा? असा प्रश्न विचारावा लागत आहे.

राज्यात सर्वात जास्त बेरोजगारी व महागाई आहे, रोज खून, बलात्कार होत आहेत. मंत्री नितेश नारायण राणे यांचे विधान महाराष्ट्राची प्रतिमा कलंकित करणारे असून भाजपा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर खुलासा करावा, असेही अतुल लोंढे म्हणाले.



नागपूर : कळमना बाजार परिसरात विविध प्रकारच्या मिरची प्रकार हैद्राबाद येथील मालाची आवक वाढत आहे. मिरची किंमती कमी होत आहेत.

## ॲक्सिस बँकेचे कंत्राटी कामगार तीव्र आंदोलन करणार : रॉकी महाजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

पत्रकार परिषदेत महाराष्ट्र असंघटित कामगार युनियन चे नागपूर विभागाचे अध्यक्ष कॉ. रॉकी महाजन आणि सेक्रेटरी कॉ. निलेश पाटील यांनी परिषदेत सांगितलें की, अक्सिस बँकेमध्ये काम करणारे कंत्राटी कामगारांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा केंद्र सरकारला अक्सिस बँक प्रशासनला देणार आहे.




सदर आंदोलनात आमरण उपोषणाचा उल्लेख आहे. कॉ. रॉकी महाजन आणि निलेश पाटील सादर आंदोलनात कारण सांगताना म्हणाले की, एप्रिल २०२० पासून या कामगारांच्या पगारात कुठलीही सुधारणा झालेली नाही आहे. कंत्राटदार सेव्हन एस चे संचालक सतीश पूसेगावकर सांगतात की अक्सिस बँकेने सांगितल्या शिवाय आम्ही पगारात कुठलीही सुधारणा करू शकत नाही. तर अक्सिस बँकेचे सहाय्यक एच आर संजीवन कोकणे सांगतात की, आमचा आणि बँकेच्या कंत्राटी कामगारांचा काहीही संबंध नाही. इतकेच नव्हे तर सी जी आय टि मध्ये २२/०४/२०२४ रोजी झालेल्या मीटिंग मध्ये युनियन ने सादर केलेल्या पत्र व्यवहारही स्वीकारण्यास नकार दिला. यापुढे असेही म्हणाले की, आमचे कंत्राटदार ह्या कामगारांना जो पगार देत आहे ते किमान वेतनापेक्षा जास्त आहे.

परंतु सोयीस्करपणे विसरतात की २००७ साली यूटीआय बँकेचे रूपांतर अक्सिस बँकेत झाल्यानंतर २००७ पासून ते २०२० पर्यंत सादर बँकेने युनियनशी चर्चा करून कामगारांच्या पगारात वेळोवेळी सुधारणा केलेली व सादर पगार हा किमान वेतनपेक्षा जास्त आहे. पण संजीवन कोकणे यांनी घेतलेली भूमिका सर्वस्वी पूर्वीच्या प्रथा प्रमाणे वेतन सुधारण्यास नकार देऊन प्रत्यक्षात अनुचित कामगार प्रथा अंमलात आणली आहे. सदर अनुचित प्रथेबाबद केंद्रिय सरकार औद्योगिक न्यायाधिकारण श्रम न्यायालय ह्यांच्या समोर मुंबई व नागपूर येथे प्रलंबित आहे. त्याचप्रमाणे नागपूरच्या केंद्रीय कामगार न्यायालयात पगार वाढीबाबत ही प्रकरण प्रलंबित आहे.

याबाबत अक्सिस बँकेचे अध्यक्ष अमिताभ चौधरी ह्यांना आम्ही अनेक पत्रे ईमेल पाठऊनही त्यांनी त्याबाबत काहीही एक कारवाई केली नाही. तसेच सेव्हन एस चे संचालक सतीश पूसेगावकर हे आमच्या युनियनच्या सभासदांना सावत्र पणाची वागणूक देत आहेत. इतकेच नव्हे तर आमच्या युनियनच्या नागपूर विभागचे सेक्रेटरी कॉ. निलेश पाटील यांना बिनबुडाचे खोटे आरोप करून बेकायदेशीररीत्या कामावरून निलंबित केलेले आहे.

सदर कंत्राटदार इतर युनियनच्या पदाधिकाऱ्यांना जे सुपरवायझर म्हणून काम करतात त्यांना ३०००/- रु अतिरिक्त देतात. त्यामुळे सदर युनियन ह्या कामगारांच्या वेतन सुधारणा बाबत कोणत्याही प्रकारची कारवाई करत नाहीत. असा आमचा समाज आहे. याचा अर्थ असा आहे होतो की सादर कामगार संघटना व कंत्राटदार सतीश पूसेगावकर यांचे साटेलोटे चालू आहे.

म्हणूनच आमच्या युनियनचे जवळ जवळ दीडशे (१५०) सभासद हे आंदोलनात भाग घेणार आहेत. सदर कामगार विदर्भ भागातील बहुसंख्य आहे. फक्त विदर्भ भागातील सभासद सादर आंदोलन करणार आहेत. असेही रॉकी महाजन आणि निलेश पाटील यांनी स्पष्ट केले आहे. कॉ. रॉकी महाजन व कॉ. निलेश पाटील पुढे असेही म्हणले की, आमचे आंदोलन हे हिंद मजदुर सभा चे माजी राष्ट्रीय सचिव व आमच्या युनियन चे जनरल सेक्रेटरी कॉ. सूर्यकांत बागल ह्यांच्या मार्गदर्शनाखाली सादर होणार असून व कायदेशीर प्रकरण तेच हाताळत आहेत.

यावेळी परिषदेला निलंबित सचिव कॉ. निलेश पाटील, विभागीय खजिनदार कॉ. विजय जगताप व महिला विभागाच्या प्रमुख कॉ. क्रांती उपलवर व सक्रिय मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी गोवंश तस्करीचा केला पर्दाफाश

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ३० :

कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत नागपुर - जबलपुर राष्ट्रीय चारपदरी महामार्गा वरुन मागील काही दिवसान पासुन मोठ्या प्रमाणात गोवंश तस्करी ची वाहतुक होत आहे. रविवारला रात्री बजरंग दलाच्या पदाधिकार्यांनी गोवंश तस्करीचा पदार्फाश केला. नागपुर ग्रामीण पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार यांचा आदेशा वरुन कन्हान पोलीसांनी आरोपी ला अटक करुन त्याचा जवळुन ३४ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल केला आहे. बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी गोवंश तस्करीचा पदार्फाश केल्याने कन्हान पोलीसांच्या भुमिकेवर प्रश्न निर्माण झाले आहे.

प्राप्त झालेल्या माहिती नुसार रविवार (दि.२९) डिसेंबर ला रात्री ९ ते १० वाजता च्या दरम्यान बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांना गुप्त माहिती मिळाली की डुमरी खुर्द शिवारात अन्ना लोकांची वस्ती आणि कॅनलचे पलीकडे लागून असलेले शेतात कत्तलीकरीता घेवून जाण्याचे उद्देशाने गोवंश जनावारांना बांधून ठेवले आहे.

अश्या गुप्त माहितीच्या आधारे बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी जाऊन पाहणी केली असता मोठ्या प्रमाणात गोवंश जनावरे मिळुन आले. गोवंश जनावरांना कत्तलीकरीता घेवून जाणेकरीता एक वाहन उभा दिसुन आला. बजरंग दलाने सदरची माहिती नागपुर ग्रामीण पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार यांना दिली असता त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड आणि पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांना कारवाईचे आदेश दिल्याने अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पोहचुन पाहणी केली असता शेतात ६३ गोवंश जनावरांना दोरीचे सहायाने बांधून ठेवलेले दिसून आले .

गोवंश जनावरांना कत्तलीकरीता घेवून जाण्याचे उद्देशाने एक लाल रंगाचे आयसर वाहन क्रमांक एम एच ४० सीटी ४६८० हा खाली उभा असलेला दिसून आला. वाहनाची पाहणी केली असता वाहनाचे दोन्ही साईडचे पल्लूयाला पोत्यांनी झाकलेले तसेच वाहनाचे वर ताळपत्री बांधलेली, वाहनात खाल्ली कोंढा टाकलेला अशा अवस्थेत आढळून आला. शेतात एक इसम मिळुन आल्याने पोलीसांनी नाव - पत्ता विचारले असता त्याने आपले नाव मोहमद शफीक कुरेशी वल्द अब्दूला करीम कुरेशी वय ४३ वर्ष रा. भाजीमंडी कामठी असे सांगीतले. गोवंश जनावरे आणि वाहन यांचे मालकं संबंधी कागदपत्रांची मागणी केली असता शेत मालक मोहमद शफीक कुरेशी बल्द अब्दुला करीम कुरेशी यांनी कोणतेही कागदपत्रे सादर केले नाही.

पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन आरोपी ला अटक करुन त्याचा जवळुन ६३ गोवंश जातीचे गाय किंमत ९ लाख ४५ हजार रुपए आणि आयसर वाहन किंमत २५ लाख रुपए असा एकुण ३४ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी कन्हान पोलीसांनी आरोपी मोहमद शफीक कुरेशी बल्द अब्दुला करीम कुरेशी यांचा विरुद्ध गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड आणि पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे.

# शांतिप्रिय देश घडवणारे नागरिक बना : अशोक बागुल

■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी, दि. ३० :

'देश घडवणारे, जबाबदार, शांतिप्रिय, पृथ्वीचे संरक्षण करणारे, समाजाचे कल्याण करणारे सुजाण नागरिक बना व आपले ध्येय आणि आई-वडील यांची कास कधीच सोडू नका' असे आवाहन नागपूर शहराचे डीवायएसपी (पीसीआर) डॉक्टर अशोक बागुल यांनी लाखोटीया भुतडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोंढाळी येथे स्व. सुभाषजी राठी स्मृती प्रित्यर्थ आयोजित सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा बक्षीस वितरण समारंभात केले. ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष राजेशजी राठी होते. याप्रसंगी संस्थेच्या उपाध्यक्षा रेखाताई राठी, प्राचार्य सुधीर बुटे, उपप्राचार्य कैलास थुल,पर्यवेक्षक मनोज ढाले, हरिष राठी, परीक्षा प्रमुख सुनील सोलव आदी उपस्थित होते.

स्व. सुभाषजी राठी स्मृती प्रित्यर्थ दरवर्षी संस्थेमध्ये सामान्य ज्ञान स्पर्धा मोठ्या प्रमाणावर आयोजित केली जाते या स्पर्धेमध्ये एमपीएससी व यूपीएससीच्या पॅटर्न प्रमाणे परीक्षेचे आयोजन करून मुलांना स्पर्धा परीक्षांचा सराव देण्यात येतो व उत्तम करिअरच्या संधी या स्पर्धा परीक्षेतून कशा प्राप्त करता येऊ शकतात याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले जाते.

यावर्षी एकूण १४३० विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. तिन्ही गटातून सर्वसामायिक प्रथम बक्षीस धनश्री रवींद्र चोपडे वर्ग नऊच्या विद्यार्थिनीने प्राप्त केले. तिला मान्यवरांच्या हस्ते बक्षीस म्हणून मोबाईल टॅबलेट देण्यात आला. मिडल स्कूलच्या अ गटातून प्रथम क्रमांक कुमारी अर्पिता राजेश चौबे द्वितीय निधी प्रदीप अंबुडारे व तृतीय क्रमांक रिया सुभाष पोकळे तिन्ही सातवीच्या विद्यार्थिनींनी प्राप्त केला. त्यांना स्पर्धा परीक्षांची पुस्तके ,बॅग, रिष्टवॉच,स्टडी टेबल बक्षीस म्हणून देण्यात आले. वर्ग ८ ते १०च्या ब गटातून भावेश्री नामदेवराव शेंडे हिने प्रथम क्रमांक तर सम्यक नरेश नारनवरे द्वितीय, श्रावणी संजय सोमनकर व तन्मय नरेंद्र देशमुख यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

पुरस्कार प्राप्त सर्व विद्यार्थी वर्ग 10 चे आहेत.त्यांना डिजिटल वॉच, स्कूल बॅग व पुस्तके भेट देण्यात आली. कनिष्ठ महाविद्यालय गटातून प्रथम क्रमांक रितेश कृष्णा युवनाते वर्ग अकरा विज्ञान, द्वितीय यशस्वी नासरे व तृतीय आयुषी चोपडे हिने प्राप्त केला. दोघीही 12 विज्ञानच्या विद्यार्थिनी आहेत. त्यांना एंट्रन्स एक्झाम संदभार्तील पुस्तकांचा संच व स्कूल बॅग भेट म्हणून देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला समिती प्रमुख सुनील सोलव यांनी डीवायएसपी डॉ. अशोक बागुल यांचा परिचय करून दिला व त्यानंतर प्राचार्य सुधीर बुटे यांनी या परीक्षा आयोजनामागील भूमिका विशद केली व सर्व यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रांजली मस्की व आभार प्रदर्शन अमोल काळे यांनी केले.

याच कार्यक्रमादरम्यान कुंडी सजावट स्पर्धा व क्रीडा बक्षीसांचेही वितरण करण्यात आले त्याचे संचालन हरीश राठी यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता प्रवीण गांजरे, अनंता बु-हान, हर्षल वानखेडे, रुपेश वादाफळे, प्रांजली मस्की, प्रमोद इंगुलवार, महेश घोगरे, अमोल काळे, महेश मलवे, मोहिनी भक्ते,नितीन भैसारे, सोनाली ठवळे, संध्या भुते, समीर लोणारे शुभम राऊत आदींनी सहकार्य केले.

# कांद्री येथे श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची पुण्यतिथि

■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. ३० :



श्री हनुमान मंदिर देवस्थान खदान रोड कांद्री, बैठक हॉल दिनांक 28 डिसेंबर 2024 रोज शनिवार सायंकाळी संत संताजी जगनाडे महाराज फोटोचे विधिवत पूजन श्री कृष्णाजी किरपान , शामराव चकोले, केशवजी मस्के,गंगाधर जी सरोदे,जेष्ठ नागरिक आणि प्रमुख मान्यवर श्री बलवंत पडोळे, माजी सरपंच, चंद्रशेखर बावनकुळे, अनिल पोटभरे, ईश्वर कामडे, मारोती आष्टनकर,प्रविण आखरे, शैलेश हिंगे, सिताराम बावनकुळे भैय्या मेहरकुळे, राजेश पोटभरे, शिवशंकर चकोले, आनंद देशमुख,आकाश कापसे आणि समस्त गावकरी नागरिक प्रामुख्याने हजर होते संत संताजी जगनाडे महाराज यांचे कार्याबद्दल माजी सरपंच श्री बलवंत पडोळे, अनिल पोटभरे, राजुभाऊ देशमुख यांनी संबोधित केले , आरती, प्रसाद, अल्पोहार वाटप करण्यात आले आभार प्रदर्शन प्रशांत देशमुख, श्याम मस्के यांनी केले.

# सावर्णी येथे नवनिर्मित व्यसनमुक्ती भवनाचे उद्घाटन १ जानेवारी रोजी

■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. ३० :

परिसरातील सावर्णी गावात आनंदधाम रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने नव्याने तयार करण्यात आलेल्या व्यसनमुक्ती अभियानांतर्गत आनंदधाम-३ च्या उदघाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

१ जानेवारी रोजी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती गौरव लक्ष्मणराव मेहर (बाबूजी) राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून प्रभारी मंत्री प्रद्युम्नसिंह तोमर, खासदार विवेक बंटी साहू, माजी मंत्री नानाभाऊ मोहोड, आमदार विजय रेवनाथ चौरे, डॉ. सावनेरचे आमदार आशिष देशमुख, नागपूर भाजपचे महासचिव उदयसिंह (गज्जु) यादव हे प्रभारी असतील. प्रार्थना स्थळाचे उदघाटन जिल्हा पंचायत सदस्य संदीप मोहोड, ॲड. मनजीत कौर मतानी नागपूर, सरस्वता लोढे, राजीव पोतदार, पांढुर्णा येथील विधायक निलेश उईके, पूर्व मंत्री दिपक सक्सेना, पुरूषोत्तम टेकाडे, बापू मोहोड, प्रतिभा खिरडकर सहित स्थानीय जनप्रतिनिधि मंचावर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात पाहुण्यांचे शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करण्यात येणार आहे. कार्यक्रमाची माहिती देताना आनंदधामचे राष्ट्रीय अध्यक्ष बजरंग मेहर, प्रमुख मार्गदर्शक नंदकिशोर तांडेकर , देवा मेहरकुळे म्हणाले की, १ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता प्रफुल्ल तांडेकर यांच्या हस्ते हवन, सकाळी १० वाजता बाबा जुमदेव यांची मिरवणूक, आनंदधामचे उदघाटन होणार आहे. सकाळी ११ वाजता भवन, दुपारी १२ वाजता आदरातिथ्य व संवाद वितरण होईल. कळमेश्वर व रामकोना बालक मंडळ समूहातर्फे सांस्कृतिक सादरीकरण होणार आहे. कार्यक्रमास परिसरातील बाबा जुमदेव भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# बजाज फायनस कंपनीचा नागरिकावर वसुलीचा दबाव

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. ३० :

बजाज फायनस कंपनी कर्जाच्या स्वरूपात काही व्याज टक्के लावून नागरिकांना कर्ज देत असते पैशाचे आमिष पाहून व्याजाची टक्केवारी कमी असल्याने नागरीक ही कर्ज घेतात अशाच प्रकारचे कर्ज मोवाड येथील पुरुषोत्तम संतोष राऊत वय ५२ रा. मोवाड ता. नरखेड यांनी बजाज फायनस कंपनी कडून मुलाच्या शिक्षणासाठी दोन वर्षांपूर्वी कर्ज घेतले होते.

परंतु मागच्या वर्षी त्यांचा मुलगा गौरव पुरुषोत्तम राऊत वय २३ हा नागपूर येथे शिक्षण घेत असताना आकस्मित घटना घडवून दिवाळीच्या दिवशी स्कार्पिओ टू व्हीलर ला धडक देवून त्यांचा जागीच मृत्यू झाला पुरुषोत्तम राऊत यांनी मुलाच्या शिक्षणासाठी कंपनीकडून घेतलेले कर्ज त्यातले काही कर्ज त्यांनी परतफेड केले परंतु काही रक्कम त्यांचे देण्याचे बाकी आहे आता त्यांची आर्थिक परिस्थिती ढासळलेली असल्याने कजार्ची रक्कम परतफेड करणे शक्य नाही. जीवन जगणे आता कठीण झाले आहे.

आर्थिक परिस्थिती बिकट झाली असल्याने जगावे की कंपनीचे पैसे परतफेड करावे हा त्यांच्या मागे मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे बजाज फायनस या कंपनीचे कर्मचारी उरलेल्या पैशाच्या मागणी करिता फोन करून परेशान करतात पैशेचा तगादा लावत त्यांच्यावर दबाव टाकत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे त्याची मानसिक परिस्थिती हलाखीची झाल्याने त्याचे जगणे आता कठीण झाले आहे.

# दाभ्यात श्रीमद भागवत ज्ञानयज्ञ व हरीनाम सप्ताह

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ३० :

दाभा येथील शुभारंभ सोसायटी रजत रेडीडेनसी मध्ये स्व. ह.भ.प. हेमराज इंगळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ श्रीमद भागवत ज्ञानयज्ञ व हरीनाम सप्ताहाचे आयोजन बुधवार १ जानेवारी ते बुधवार ८ जानेवारी पर्यंत दररोज दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजता पर्यंत करण्यात आले आहे. कथा प्रवक्ता ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज टापरे श्रीक्षेत्र व्याहाड यांचे सुश्राव्य वाणीद्वारे श्रीमद भागवत ज्ञानयज्ञ कथेचे निरुपण करणार आहे. कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन इंगळे परिवारातर्फे करण्यात आले आहे.

# शेगावीचा संत गजानन महानाट्याचे लागोपाठ तीन प्रयोग

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

शेगावीचा संत गजानन महानाट्याचे लागोपाठ तीन शनिवारला प्रयोग होत आहेत. शनिवारी ४ जानेवारी २०२५ ला अमन सभागृह, पारशिवनी येथे रात्री साडेसात वाजता आणि नंतरच्या शनिवारी म्हणजेच ११ जानेवारी २०२५ ला श्रीक्षेत्र शेगाव, द्वारका लॉन, अकोट रोड येथे संध्याकाळी साडेसात वाजता असे लागोपाठ तीन प्रयोग या नाटकाचे होणार आहेत. प्रेक्षकांच्या पसंतीला उतरलेल्या या महानाट्याचे लेखन आणि दिग्दर्शन श्री प्रभाकर ठेंगडी यांचे असून निमार्ते मोहन पात्रीकर आहेत निर्मिती स्वरमंथन नागपूरची आहे. युगंधर ब्राह्मण मंच नागपूर द्वारे शनिवारी २८ जानेवारीला आयोजित या महानाट्याच्या प्रयोगाला केवळ शंभर रुपये नाममात्र सहयोग राशी ठेवलेली आहे. या प्रयोगाच्या संयोजिका वृषाली शिलेदार आणि गौरी जोशी आहेत. श्री गजानन महाराजांच्या प्रमुख भूमिकेत शार्दुल मोहरील हा तरुण कलावंत असून यात ५० कलावंत आहे. ध्वनिमुद्रण चारुदत्त जिचकार मधुरीका ऑडिओ ॲड तसेच नेपथ्य देवेंद्र निखारे ,प्रकाश योजना बाबा पदम, रंगभूषा लालजी श्रीवास्तव आणि वेशभूषा मोनिका ठेंगडी यांची आहे.

# कबड्डीत जि.प. बोरीपहिलेपारचा संघ अजिंक्य

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

नागपूर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत वरिष्ठ गट कबड्डीत बोरखेडी ( रेल्वे) केंद्रातील जि. प. उच्च प्राथमिक शाळा बोरीपहिलेपार चा संघ अजिंक्य ठरला.नागपूर पं. स. मधील जिल्हा परिषद शाळामधील विद्यार्थ्यांकरिता तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन गोधनी (रेल्वे ) येथे नुकतेच पार पडले.



यात प्रत्येक क्रीडा प्रकारात कनिष्ठ व वरिष्ठ गटात प्रत्येकी १२संघांनी भाग घेतला होता. मुलांच्या वरिष्ठ गटातील कबड्डीच्या अंतिम सामन्यात सोनेगाव (बोरी ) च्या संघाला मात देत बोरीपहिलेबार शाळेचा संघ विजेता ठरला. बोरीपहिलेपार संघात आदित्य राणे, अथर्व वानखेडे, रुद्र भोंडे, तन्मय तामखाने, यश बावने, सत्यम सोनटक्के, अंश मरसकोल्हे, मोहित उरकुडे, लोकेश निकोरे यांचा समावेश होता.

वरिष्ठ गटात मुलांच्या रिले मध्ये आदित्य राणे, अथर्व वानखेडे, रुद्र भोंडे, तन्मय तामखाने यांनी वरिष्ठ गटात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच उंच उडी मध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. क्रीडा शिक्षक नरेंद्र पिंपळे, मुख्याध्यापक नामदेव नागरगोजे यांच्या मार्गदर्शनात विजय चमुने उत्कृष्ट कामगिरी केली. पंचायत समितीच्या सभापती रूपाली मनोहर, गटशिक्षणाधिकारी आरती साळुंखे , शिक्षण विस्तार अधिकारी पौर्णिमा येडपुलवार, नारायण चापले, केंद्रप्रमुख अर्चना नागपुरे, केंद्रप्रमुख प्रकाश सव्वालाखे, सर्व शिक्षकांनी विजयी चमुचे अभिनंदन केले.

# ॲड. आशिष जयस्वाल यांचा सत्कार व लाडूतुला कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३० :

तालुक्यातील काचुरवाही येथे महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री त्यांच्या जन्मभूमी गावात प्रथमच आगमन दरम्यान गावकऱ्यांच्या वतीने लाडू तुला कार्यक्रम व गौरव सत्कार दि.२९ डिसेंबरला सायंकाळी बाजार चौक काचूरवाही सभा मंडप येथे सर्व शिवसेना - भाजपा पदाधिकारी व समस्त गावकऱ्याच्या सहकार्यानी आयोजित करण्यात आला. यावेळी गावातील नागरिकांनी ठीक ठिकाणी राज्यमंत्री अँड. अशिष जयस्वाल यांच्या पुष्पहार शाल श्रीफळ देऊन गौरव सत्कार केला.



यावेळी कार्यक्रम दरम्यान ते म्हणाले राज्यमंत्रीपदासाठी मला जे खाते दिले ते आव्हानात्मक असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली चांगले काम करणार आहे तसेच रामटेक विधानसभेसह अनेक जिल्ह्यातील विकास कामांना प्राधान्य देत सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय देणे हेच उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांनी केले.

राज्यातील शिवसेना पक्ष उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेना कार्यकर्त्यांना मोठा करणारा पक्ष आहे पक्षाने दिलेल्या छोट्या जबाबदाऱ्या पार पडत आज मी राज्यमंत्री पदापर्यंत पोहोचलो आहे पक्षामध्ये संपर्क भावनेने काम करणारे कार्यकर्ते असल्यामुळे पक्षाची आज अविरत घोडदोड सुरू आहे त्यामुळे माझ्या आयुष्यात अमूल्य योगदान असणाऱ्या कार्यकर्त्यांना हा सत्कार समर्पित करीत आहो असे प्रतिपादन त्यांनी केले. विधानसभेतील विकास कामांना प्राधान्य हे सर्वसामान्य जनतेच्या प्रश्न सोडवून त्यांना न्याय देणे हेच आपले उद्दिष्ट आहे. आता या मतदार संघातील जनतेने आपल्या परिवारावर भरपूर प्रेम केले आहे म्हणून आज मी या परिवारास पाचव्यांदा या मतदार संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली .आता संधीच सोन करून मतदार संघात रोजगार आणणार व कार्यकर्त्यांना मोठा करणार आहे सोबत असणार अशी ग्वाही त्यावेळी जयस्वाल यांनी दिली.

यावेळी गट ग्रामपंचायत काचुरवाही खोडगाव ग्रुप, संजीवनी पतसंस्था काचुरवाही ग्रुप ,केशव मोरे कंट्रक्शन मसला( काचुरवाही) ग्रुप, स्व. ॲड नंदकिशोर जयस्वाल माध्यमिक विद्यालय ग्रुप, हनुमान मंदिर पंच कमिटी ग्रुप, सुरज मतिमंद मुलांची शाळा ग्रुप, हरीश हूड किरणापुर ग्रुप, विकी बावनकुळे ग्रुप काचुरवाही, अल्ट्राटेक कामगार युनियन ग्रुप, परमात्मा एक ग्रुप काचुरवाही, आदी संस्था, कडून सत्कार करण्यात आला .

यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून जिल्हा परिषद संजय झाडे, शिवसेना रामटेक तालुका प्रमुख विवेक तुरक, संजीवनी पत अध्यक्ष तथा माजी जि.प सदस्य देवराव धुर्वे, कालिदास पत संस्थेचे अध्यक्ष अनिल कोल्हे, माजी जिल्हा परिषद सदस्य नरेश धोपटे, वर्षा धोपटे, देवराव धुर्वे , माजी न.प.सभापती बिकेंद्र महाजन, युवासेना उपजिल्हा प्रमुख कमलेश शरनांगत, भाजप नागपूर जिल्हा महामंत्री राहुल किरपान, माजी पंस सभापती किरण धुर्वे, हर्षवर्धन निकोसे, सरपंच सविता नागोसे, उपसरपंच अनिकेत गोल्हर, सुनिल कोल्हे, चंदु बावनकुळे, नंदु नाटकर, सुभाष नागोसे, रोशन ढोबळे, राहुल डोकरीमारे, प्रविण नाटकर, अनिकेत कोठेकर, संजय सूर्यवंशी यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# बेसा रोडवरील अतिक्रमणामुळे वाहतूक विस्कळीत

■ महासागर प्रतिनिधी
बेसा, दि. ३० :

बेसा-मानेवाडासह अनेक भागात सीट कॅरबात पोल बांधण्याचे काम सुरू झाले आहे. बेसा येथे एकीकडे रस्त्याचे काम सुरू झाले असून, दुसरीकडे रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. आधीच अर्धे अपूर्ण बांधकाम, रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमण व एका बाजूचे काम अपूर्ण राहून दुसऱ्या बाजूचे काम सुरू असल्याने दोन्ही बाजूची वाहतूक विस्कळीत होत असून, अपघाताचा धोकाही वाढला आहे.

पदपथावरील अतिक्रमणाबाबत अखिल भारतीय ग्राहक पंचायत नागपूर महानगरचे सचिव विलास ठोसर यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन देऊन पदपथावरील अतिक्रमण तातडीने हटविण्याची मागणी केली आहे. ठोसर यांनी पत्रात म्हटले आहे की, प्रशासनाने अनेक भागात रुंद पदपथ तयार केले आहेत. त्यावर फरशा बसविण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले आहेत. फूटपाथवरून चालण्याचा पहिला अधिकार नागरिकांना आहे, मात्र आजची परिस्थिती पाहता अनेक भागात नागरिकांना चालण्यासाठी फूटपाथच शिल्लक राहिलेले नाहीत. अनेक ठिकाणी फूटपाथवर अतिक्रमण झाले आहे.

फूटपाथ फेरीवाले आणि दुकानदारांनीही पदपथ ताब्यात घेतले आहेत. फूटपाथवर अतिक्रमण असे करणारे फेरीवाले जिंकण्यास तितकेच जबाबदार आहेत, तसेच रस्त्यालगतचे कायमचे दुकानदार आणि घरमालकही आहेत. बहुतांश दुकानदार व घरमालक फेरीवाल्यांकडून महिन्याला पाच ते सहा हजार रुपये घेतात, असे तक्रारीत म्हटले आहे.

फूटपाथवर बसलेल्या एका फेरीवाल्याने यासंदर्भात माहिती दिली. ठोसर म्हणाले की, पदपथ अतिक्रमणमुक्त आहे. असे करायचे असेल तर ज्या दुकानदार व घरमालकांनी आपल्या दुकाने व घरासमोर हातगाड्या उभ्या करण्यास परवानगी दिली आहे.

## जाहीरनामा

कार्यकारी दंडाधिकारी मौदा यांचे न्यायालय, मौदा
Phone No-07115-281128
Mail Id: tahesilofficemoud@gmail.com
क्र. प्रस्तु-३/तह-मौदा/कावि-६६६/२०२४
दिनांक -१८/१२/२०२४

वाचा - १) जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ २) जन्म मत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा - २०२३ (२०२३ चा २०) च्या खंड -१ आणि उपखंड -२ ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११.०८.२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्र. अका/डि-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-५३५/२०२३ ५) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. अका/डी -१/जन्म-मृत्यु आदेश/कावि -१५८/२०२३ दिनांक ११/५/२०२४ अन्वये ६) श्री सागर घनश्याम बादुले रा. वाकेश्वर ता. मौदा जि. नागपूर

ज्याअर्थी, अर्जदार श्री सागर घनश्याम बादुले रा. वाकेश्वर ता. मौदा जि. नागपूर यांनी गिरजा जागा बाबुले यांच्या ग्रामपंचायत वाकेश्वर कार्यालयात त्यांचे मृत्युची नोंद नसल्याने मृत्युची नोंद ग्रामपंचायत वाकेश्वर दप्तरी घेण्याकरीता निर्देशित करणे कामी अर्ज सादर केला आहे.

सदरहु गिरजा जागा बादुले यांचा मृत्यु दिनांक १६/०९/१९८१ ला मौजा वाकेश्वर येथे झाला असे अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना मृत्यु प्रमाणपत्र शासकिय तथा खाजगी कामाकरीता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जा मध्ये नमुद केले आहे.

त्या अर्थी, मी कार्यकारी दंडाधिकारी मौदा उपरोक्त वाचा क्र.१ आणि २ नुसार व ५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारांनी असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देण्याकरीता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावीत आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारासह कार्यकारी दंडाधिकारी मौदा यांचे न्यायालयात स्वतः जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहिरनाम्याच्या दिनांकापासून २१ दिवसाचे आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित मृत्युनोंदीबाबतचा आदेश निर्गमीत करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी,
मौदा

## -: जाहिरनामा :-

कोर्ट विद्य. कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, भिवापूर यांचे न्यायालय भिवापूर रोड, भिवापूर जिल्हा नागपूर पिन कोड - ४४१२०१
E-mail ID-tahsilbhiwapur@gmail.com
दुरध्वनी क्रमांक -०७१०६ २३२२४१.
क्र. प्रस्तु-१/तह.भि./कावि ९८२/२०२४
दिनांक: १६/१२/२०२४

वाचा :- १) जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ २) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचें कडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र. ३) जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ २०२३ चा २०) च्या खंड १ आणि उपखंड. ४) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपुर यांचे कडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यु आदेश/कावि-१५८/२०२३ दिनांक ११/०५/२०२४ अन्वये. ५) मा. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, उमरेड यांचे पत्र क्र. प्रस्तु.४/उविअ/- उम/कावि-१५/२०२४. दिनांक ३०/०५/२०२४, अन्वये. ६) अर्जदार श्री. परसराम दौलत येवले, राह. भिवापूर तह. भिवापूर जि. नागपूर

ज्याअर्थी अर्जदार श्री. परसराम दौलत येवले, राह, भिवापूर तह. भिवापूर जि. नागपूर यांनी त्यांचे आई नामे पारबता दौलत येवले यांचा दिनांक २१/१२/२०२३ रोजी मृत्यु झाल्याने दिनांक २१/१२/२०२३ रोजी मृत्युची नोंद बाबत नगर पंचायत, भिवापूर ता. भिवापूर येथे दप्तरी घेणे करीता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदार यांचे आई नामे पारबता दौलत येवले यांचा दिनांक २१/१२/२०२३ रोजी मृत्यु झाल्याने दिनांक २१/१२/२०२३ रोजी मृत्युची नोंद घेण्यात यावी असा अर्जदारांचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदहू अर्जदार यांना मृत्यु प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, भिवापूर उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३, ४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, भिवापूर यांचे न्यायालयात स्वतः जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांका पासून पंधरा दिवसाचे आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी,
तथा नायब तहसिलदार, भिवापूर

---

जा.क्र. ACC1/१३०८८/२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सिविल लाइन्स, नागपूर-०१
दिनांक २७-१२-२४

NOTICE INQUIRY
(Form No.2)
(नमुना क्र.२)

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर .................प्रदेश.

## चौकशीची नोटीस

(सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, सन १९५० यांचे कलम - ४१ A )
सन २०२४ चा अर्ज क. ४२८/२०२३-४९

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था कामठी युवक शिक्षा प्रसारक मंडळ. एफ-५१६० (नागपूर)....... यास .. ...... रामशंकर मिश्रा ........ यानी
कलम ४१-A अन्वये केलेला अर्ज
कलम ४१-A अन्वये भरलेला नमुना यांच्या संबंधात
१. रियाझ अहमद अब्दुल अजीज ...... यांस
कलम १८ अन्वये नोंदणीसाठी

ज्याअर्थी खाली सही करणार यांचा कडून वरील सार्वजनिक विश्वसाव्यवस्थेसंबंधात .......................
कलम ४१-A अन्वये नोंदी दाखल करण्यासाठी चौकशी करण्यात येणार आहे.

त्याअर्थी तुम्हास ही नोटीस देण्यात येत आहे आणि फार्मविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीनार्फत किंवा योग्य रीतीने सुचना दिलेल्या वकीलामार्फत, खाली सही करणार यांचे समोर वर दिलेल्या पत्यावर तारीख माहे १०.०२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे आणि चौकशी संबधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोंडी व दस्तऐवजाच्या रूपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यात तुम्ही कसुर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल, तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे.

आज दिनांक.२७.१२.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व सहायक धर्मादाय आयुक्तांच्या नागपुर शिक्क्यानिशी दिली.

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नागपूर विभाग, नागपूर

---

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे कार्यालय
(तहसिल कार्यालय इमारत खोली क्र. १. आकाशवाणी चौक, सिव्हिल लाइन्स, नागपूर-०१)
Email ID sdonagpurcity@gmail.com
Tel. No.0712-2560048.
क्र. अका/फौज/उविद/नाग (श)/कावि ९४८/२०२४
दिनांक: ०४/१०/२०२४

प्रति,
निबंधक, जन्म मृत्यू विभाग,
नागपूर महानगरपालिका नागपूर

विषय - जन्माची नोंद घेणेकामी जन्म मृत्यू अधिनियम कलम १३(३) अन्वये प्राप्त अर्जावर सुनावणीस उपस्थित राहणेबाबत

संदर्भ:-प्रशांत भिमराव उमक वय ४४ वर्ष यांचा अर्ज दिनांक ०६/०९/२०२४

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय अर्जान्वये ज्या जन्माची किंवा मृत्यूची तो घडल्यानंतर एक वर्षाच्या आत नोंदणी करण्यात आली नसेल त्यांची नोंदणी जन्माचा किंवा मृत्यूचा तपशील बरोबर असल्याची खातरजमा करुन पाहिल्यानंतर प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा इलाखा शहर दंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशावरुन करण्यात येते.

सबब जन्म मृत्यू अधिनियम कलम १३ (३) अन्वये संदर्भिय अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अर्जावार दिनांक २५/१०/२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता उपविभागीय अधिकारी, नागपूर शहर कार्यालय नागपुर येथे सुनावणी घेण्यात येणार असून उक्त अर्जावर आपले म्हणने सादर करणेकामी उक्त नमूद दिनांकास न चुकता उपस्थित राहावे. अन्यथा आपले काहीही म्हणने नसून संदर्भिय अर्जासमवेत जोडण्यात आलेल्या दस्ताऐवजांची तपासणी करुन जन्म/मृत्यू नोंद घेणेकामी आदेश देण्यास आपली काहीही हरकत नाही असे समजून नियमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल याबाबत नोंद घ्यावी.

कार्यकारी दंडाधिकारी,
तथा नायब तहसिलदार

## -: जाहिरनामा :-

कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय नागपूर शहर यांचे कार्यालय, नागपूर शहर
Email: sdonagpur@gmail.com
Ph No. 07112-2560048
क्र. अका/प्रस्तुत/उविदं/नागश/कावि-९५१/२०२४
दि.:०४/१०/२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि ५३५ /२०२३ ५) अशोक देवराम तांडेकर वय ६५ वर्ष यांचा अर्ज दिनांक ०६/०९/२०२४

ज्याअर्थी अर्जदार अशोक देवराम तांडेकर वय ६५ वर्ष रा. कुंदनलाल गुप्ता नगर नागपूर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांचा जन्म दिनांक १७/५/१९६४ रोजी कुंदनलाल गुप्ता नगर नागपूर येथे राहत्या घरी झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह उपविभागीय दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी
तथा नायब तहसिलदार

## -: जाहिरनामा :-

कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय नागपूर शहर यांचे कार्यालय, नागपूर शहर
Email: sdonagpur@gmail.com
Ph No. 07112-2560048
क्र. अका/प्रस्तुत/उविदं/नागश/कावि-९४७/२०२४
दि.:०४/१०/२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि ५३५ /२०२३ ५) अब्दुल सलिम ताज मोहम्मद खान वय ४९ वर्ष यांचा अर्ज दिनांक ०६/०९/२०२४

ज्याअर्थी अर्जदार अब्दुल सलिम ताज मोहम्मद खान वय ४९ वर्ष रा. जाफर नगर गोधनी रोड नागपूर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांचा जन्म दिनांक २/६/१९७६ रोजी जाफर नगर गोधनी रोड नागपूर येथे राहत्या घरी झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह उपविभागीय दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी
तथा नायब तहसिलदार

# थर्टी फर्स्ट साठी पोलिस सज्ज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :
नववर्षाच्या स्वागतासाठी युवा पिढी सरसावली असून अनेकांनी तयारी जोरात सुरू केली आहे. मौदा पोलिसांनी नववर्षाच्या स्वागतासाठी नागरिकांच्या सुरक्षेसाठी तगडा बंदोबस्त तैनात केला आहे, अशी माहिती मौदा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे यांनी दिली आहे.

मौदा पोलिस ठाण्याच्या हद्दीत वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद घोंगे यांच्या नेतृत्वाखाली मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे.

नववर्षाचे जल्लोषात करण्यासाठी तरुणाई सज्ज झाली असली तरी कोणत्याही ठिकाणी अप्रिय घटना घडू नये, यासाठी पोलिसांचा मौदा हद्दीसह परिसरात खडा पहारा राहणार राष्ट्रीय महामार्ग हायवेवर मौदा पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये असणारे हॉटेल्स, ढाबे, बारवर कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यांना कार्यवाहीला सामोरे जाऊन त्यांच्यावर कायदेशीररित्या कार्यवाही सुद्धा केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. स्वागता वेळी मद्यप्राशन करून अनेक वेळा धिंगाणा घालण्याचे प्रकार आढळून येतात.

भरधाव वेगाने वाहने चालवून सर्वसामान्यांच्या जीवाला धोका निर्माण त्यामुळे यावर्षी पोलिसांनी मद्यपींवर विशेष लक्ष ठेवले आहे. मद्यपींसाठी पोलिसांकडून ड्रंक अँड ड्राईव्ह मोहीम राबवली जाणार आहे. ब्रिथ ॲनेलायझरव्दारे वाहन चालकांची तपासणी करून त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.

जे मद्य करून गोंधळ घालतील अशांना कार्यवाहीला सामोरे जावे लागणार आहे. नववर्षाच्या स्वागतासाठी तरुणाईला उधान येत असते. अशास्थितीत उनाड मुले महिलांची छेडछाड करताना आढळून येतात. त्यांचा पाठलाग करून त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न करतात. हे प्रकार टाळण्यासाठी पोलिसांनी विविध पथके तयार केली आहेत.

दामिनी पथक ही अशा टवाळखोरांवर लक्ष ठेवून आहे. नववर्षाच्या अनेक तरुण दुचाकी भरधावपणे चालवतात व इतरांच्या जीवाला धोका निर्माण करतात. त्यामुळे स्टंटबाजी करणाऱ्यांवर ही मौदा पोलिस लक्ष देऊन आहे.

# सेवारत्न पुरस्काराने चंद्रशेखर अरगुलेवार सन्मानित




■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ३० :
क्षमता ही कामातून जन्माला येते, प्रत्येक माणूस जन्मतःच शून्य असतो. २८० कोटींच्या देशात समाजसेवेसाठी सर्वस्व अर्पण करणारे लोक खूप कमी आहेत अरगुलेवार यांनी हवालदार पद वरुण राजीनामा देऊन, समाज सेवा कडे अग्रसर आहे, मरणोपरांत त्यांचे आणि त्यांच्या पत्नीचे मृतदेह नागपूरच्या वैद्यकीय महाविद्यालयाला दान केला आहे. स्वतःचे घर राष्ट्रसंत गाडगे बाबा वाचनालयाला दान करून, अनेक तरुणांना आर्मी, केंद्रीय पोलीस दल, दिल्ली पोलिस दाखल केले आहे.

भुकेल्यांना प्रत्येक महाअन्न आणि किराणा सामानाचे वाटप, दरवर्षी गरीब मुलींचे मोफत सर्वधर्मीय सामूहिक विवाह, दरवर्षी हिवाळ्यात गरिबांना ब्लँकेटचे वाटप, गरीब मुलांना कपडे, चप्पल, पुस्तकांचे वाटप, दरवर्षी वैद्यकीय शिबिर, रक्तदान शिबिर, रस्त्यावर फिरणाऱ्या मानसिक रुग्णांची सेवा, कामठी येथे छत्रपती शिवाजी महाराज डॉ.भीमराव आंबेडकरांच्या पुतळ्यावर स्वतःच्या पैशातून स्टीलची छत्री बसवणारे चंद्रशेखर अरगुलेवार हे तेजस संस्थेच्या माध्यमातून लोकांना अनेक सेवा देत आहेत. त्यामुळेच त्यांना अनेक सन्मानांनी सन्मानित करण्यात आले आहे. ग्लोबल इंटरनॅशनलचे टीमच्या संस्थापक/ अध्यक्ष मनीषा ठाकरे, एकता फाउंडेशनच्य संस्थापक/ अध्यक्ष जय रामटेके यांनी या सम्मानसाठी अरगुलेवारची निवड केली होती. १७ डिसेंबर २०२४ रोजी नागपुर अमृत भवन मध्ये अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत अरगुलेवार यांना सेवारत्न पुरस्कार, शिल्ड, मेडल, साल व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात करण्यात आले. तेजस संस्थेचे उपाध्यक्ष देविदास पेटरे, सहकारी मित्र मिजवा रहमान, शंकर बर्मन,राजेंद्र बावनकुडे आदी उपस्थित होते. या सन्मानाचे श्रेय अरगुलेवाराने संस्थेच्या देणगीदारांना, संस्थेच्या मित्रपरिवाराला, पत्रकारांना, वकीलांना आणि डॉक्टर मित्रांना दिला आणि मनीषा ठाकरे मॅडम, जय रामटेकेच्य आभार व्यक्त केला.

# "गायन आणि संतूर वादनाचा" कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :
चित्तपावन ब्राह्मण संघ आणि मित्र फौंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने "कवी कुलगुरू कालिदास" सभागृह पर्सिस्टंट सिस्टीम्स येथे सुप्रसिद्ध गायक आनंद भाटे यांच्या गायनाचा आणि डॉ.शंतनू गोखले यांच्या संतूर वादनाचा सुश्राव्य कार्यक्रम पार पडला. पुरिया धनश्री रागावर आधारित "पार करो, अरज सुनो" ने आनंद भाटे यांनी आपल्या गायनाला सुरुवात केली.

विविध रागांचे सादरीकरण करतांना "पायलिया झनकार मोरी" द्रुतलय झपताल, त्यानंतर सुरमल्हार रागातील बंदिश "बादरीया बरसना लागी "सादर करत, विविध रागांना आळवून "माझे माहेर पंढरी" या अभंग गायनाने, गायनाची सांगता केली. डॉ.शंतनू गोखले यांनी आपल्या संतूर वादनाच्या सुरुवातीला "राग रागेश्री" मधील बंदिश मध्यलय आणि द्रुतलईमध्ये सादर केली.

त्यानंतर पहाडी + काश्मिरी मिश्र धून तसेच विविध रागांवर संतूर वादन करून, वादनावर असलेले आपले प्रभुत्व, सिद्ध करत प्रेक्षकांना जागेवर खिळवून ठेवले.

उपरोक्त कार्यक्रमाला संवादिनीवर पुणे येथील राहुल गोळे यांनी, तर तबल्यावर अमीत कवठेकर व निखिल फाटक यांनी उत्तम साथ संगत केली. जवळपास अडीच तास चाललेल्या या कार्यक्रमाला मित्र फाउंडेशनचे पुण्याचे पदाधिकारी, चित्पावन ब्राह्मण संघ नागपूरचे पदाधिकारी तसेच कार्यकारणी सदस्य त्याचप्रमाणे दर्दी श्रोता वृंद खूप मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# नवीन वर्षात नवे विभागीय रेल्वे व्यवस्थापक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :
मध्य रेल्वे तसेच दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाला नवीन विभागीय रेल्वे व्यवस्थापक मिळाले आहे. रेल्वे मंडळाने नियुक्त केलेल्या दोन्ही व्यवस्थापक आता नव्या वर्षात रुजू होणार असल्याची माहिती रेल्वेकडून देण्यात आली आहे. रेल्वे मंडळाने अधिकृत आदेश जारी केले असून मनीष अग्रवाल यांच्या जागी विनायक गर्ग यांची नियुक्ती मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात करण्यात आली आहे. तर दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाच्या अधिकारी नमिता त्रिपाठी यांच्या जागी कुमार गुप्ता यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई- हावडा मार्गावरील मध्यवर्ती नागपूर रेल्वे स्थानामुळे रेल्वेचे नागपूर एक महत्त्वाचे जंक्शन असून नागपूर विभागप्रमुखाला मालवाहतूक-उत्पन्नाचे लक्ष्य पूर्ण करण्याबरोबरच मेल एक्सप्रेस गाड्यांचे सुयोग्य व्यवस्थापन करावे लागते.

याशिवाय दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात अरुंद गेजच्या मार्गावर दीर्घकाळ भर दिल्यानंतर आता रेल्वे मार्ग विस्तारावर भर दिला जात आहे. डीआरएम अग्रवाल कार्यरत असताना रेल्वे कर्मचाऱ्यांनी तीन कामकाज ठप्प करीत केले होते. नमिता त्रिपाठी यांनी नागपूर विभागात दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला असून त्यांची बदली करण्यात आली आहे.

# केवळ परीक्षांचा अभ्यास नको : अनिल धोटे




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३० :
मुलांना केवळ परीक्षांचा अभ्यास करणाऱ्यावर लक्ष केंद्रित न करता विविध क्षेत्रे व संकल्पनाचा शोध घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी नेहमी असे विविध उपक्रम शाळा स्तरावर राबवून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव दिला जातो, असे प्रतिपादन विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटन प्रसंगी मुख्याध्यापक अनिल धोटे यांनी व्यक्त केले.

स्थानिक विमलताई तिडके विद्यालयात शुक्रवार २७ डिसेंबर रोजी शालेय स्तरावर विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात इयत्ता ५ वी ते १० वी च्या ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विज्ञान शिक्षक सुधाकर धिरडे, किशोर गरमळे,अश्विनी फलके, प्रवीण राऊत यांच्या मार्गदर्शनात पाणी आणि हवेचे गुणधर्म,जलचक्र, ठिबक सिंचन, माती आणि जल संधारण, शरीराची वेगवेगळी कार्य, सूर्यमाला, हायड्रोलीक जॅक,ग्लोबल वॉर्मिंग, ह्युमन रेस्पिरेटरी सिस्टीम, डेन्सीटी वॉटर, हवेचा दाब, चांद्रयान ३,बर्जर गेम, आरशातील प्रतिमा, पायथागोरस प्रमय, पाणी शुद्धीकरण, ज्वालामुखी, सौर ऊर्जा, रॉकेट लॉंच, व्हॅक्यूम क्लिनर, पथदिवे, आदीसह विविध प्रकारचे शैक्षणिक चार्ट या संकल्पनांवर विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर करून सविस्तर माहिती दिली. यावेळी दिगंबर गोहणे,संदीप लापकाळे, श्रावण ढवांगळे, शीतल अवझे, सुरेखा घागरे, सुरेश फलके, मनोज ठोसर आदी शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# वाडीची श्री विश्वनाथ बाबा हायस्कूल मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत प्रथम

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३० :
येथील श्री विश्वनाथ बाबा हायस्कूल व जुनिअर कॉलेज महाराष्ट्र शासनाचा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा २०२३-२४ या उपक्रमांतर्गत वाडी केंद्रामधून प्रथम क्रमांक तर नागपूर ग्रामीण तालुक्यामधून द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

महाराष्ट्र शासनातर्फे द्वितीय क्रमांक करता दोन लाख रुपयाचे पारितोषिक ठेवण्यात आले होते .नुकत्याच जिल्हा परिषद शाळा गोधनी रेल्वे येथे २३ डिसेंबर रोजी तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक उदघाटन सोहळा व माझी शाळा सुंदर शाळा अभियान पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.




या सोहळ्यात जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ताताई कोकड्डे व जिल्हा परिषद उपाध्यक्षा कुंदाताई राऊत, सभापती मंगला हरदास, जि. प. सदस्या वृंदाताई नागपुरे यांच्या हस्ते श्री विश्वनाथ बाबा हायस्कूल वाडीचे मुख्याध्यापक राजेश बिडवाईक व सहकारी शिक्षकांना रोपटे, प्रमाणपत्र व दोन लाख रुपयांचा धनादेश प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक राजेश बिडवाईक यांनी संस्थेचे सचिव राजेश जयस्वाल यांच्या कुशल नेतृत्वामुळे व संस्थेचे अध्यक्ष श्यामकुमार जयस्वाल यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनामुळे तसेच सर्व शिक्षकांच्या सहकार्यामुळे आम्ही यशाची उंची गाठू शकलो असे मत व्यक्त केले.

शाळेचे मुख्याध्यापक राजेश बिडवाईक यांनी या अभियानाला अतिशय स्तुत्य उपक्रम अशी प्रशंसा करीत या पारितोषिकाचा स्वीकार केला. जिल्हा परिषदेतील मान्यवर पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग तसेच २५०० विद्यार्थीच्या उपस्थितीत हा सोहळा आयोजित करण्यात आला.

# महापुरुषांच्या विचारांची समाजाला गरज : छेदन कटरे



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ३० :
वाघदरा इसासनी येथे क्षत्रिय चक्रवती सम्राट राजा भोज चौक नामकरणाचा सोहळा क्षत्रिय पोवार राजाभोज संस्था हिंगणा व सौदामिनी लेआऊट यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाला. अध्यक्षस्थानी छेदन कटरे तर उपसभापती पौर्णिमा दिक्षित, पंचायत समीती सदस्य लिलाधर पटले, सरपंच अरविंद ढोणे,सामाजिक कार्यकर्ते सुशील दिक्षित, आदर्श पटले, लोकेश चौहान, लखन ठाकरे, बबलू बनोठे, जयसिंग पटले, दादाराव मसराम, जयसिंग पटले, सुरेश ठाकरे शशिकला ठाकरे व मुरलीधर चौधरी प्रमुख पाहुणे उपस्थित होते. सुत्र संचालन प्रफुल पंधे यांनी तर नरेश अंबुले यांनी आभार मानले. याप्रसंगी सुभाष राठोड, लक्ष्मीचंद हरीणखेडे , योगेश कडवे, राजेश पांडे, सुधाकर देशमुख, अरविंद पेटकर, नरेंद्र खाडे, टेकलाल पारधी, प्रकाश पिल्लारे, तिथानंद रंहागडाले, सुरेश कटरे, लंकेश सुमुने, योगेश्वर पटले, निलेश धारपुरे, आनंद आचरे, टागोर बिसेन, राकेश कडवे, ज्ञानेश्वर चौधरी, गणेश शिवणकर, संजय ठाकुर, बेबि चौधरी, नमिता कटरे, अल्का पटले, गांवडेताई, गजापुरे यांनी विशेष सहयोग प्रदान केला.

# नागपुर पुणे मशाल रॅली निघाली



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :
भीमा कोरेगाव येथील क्रांती स्तंभाला मानवंदना देण्यासाठी नागपूरच्या शांती नगरातील पंचकमिटी बुद्ध विहार आंबेडकर चौक येथील मयूर मेश्राम यांच्या नेतृत्वात बंटी सपकाळ, अथांग करोडे, रॉकी मेश्राम, प्रणय गडपायले, संकेत पाटील, धीरज इंगळे, तुषार पवार, गजानन ताठे, गणेश कुरड, आनंद अनघाले, नकुल बजनूर हे धावपटू दीक्षाभूमीवरून धावती मशाल घेऊन नागपूर ते पुणे धावत निघाले.

या युवकांना भंते महेंद्र यांनी त्रिशरण पंचशील दिल्यावर दीक्षाभूमी स्मारक समितीचे कार्यकर्ते शरद मेश्राम यांनी निळी झेंडे दाखवून मशाल रॅली रवाना केली. याप्रसंगी प्रामुख्याने जितेंद्र मेश्राम, रवी मेश्राम, प्रशांत गडपायले, आंचल कावळे, श्रीकांत डफ, रुपेश कोटांगळे, राज मेश्राम, बसपा नेते एड राहुल सोनटक्के, उत्तम शेवडे, संदीप मेश्राम, संजय जयस्वाल, जितेंद्र घोडेस्वार, चंद्रशेखर कांबळे, अमित बागेश्वर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

धावती मशाल रॅली अमरावती मार्गे अमरावती, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, बाळापूर, खामगाव, चिखली, जालना, संभाजीनगर, अहमदनगर, शिरूर मार्गे भीमा कोरेगाव पुणे येथे 31 डिसेंबर रोजी रात्री पोहोचेल. ते सर्व धावपटू 1 जानेवारीला सकाळी शौर्य स्तंभाला मानवंदना देतील. मयूर मेश्राम व त्यांच्या सहकाऱ्यांचे धावती मशाल रॅली काढण्याचे हे दुसरे वर्ष आहे.

# रेल्वेच्या पुरस्कार सोहळ्यात नागपूर विभागाला सात पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :
मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने उल्लेखनीय कार्य करीत शिल्ड आणि ट्रॉफी जिंकून आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. रेल्वे सप्ताह पुरस्कार सोहळ्यात नागपूर विभागाने सात पुरस्कार मिळविले मध्य रेल्वेच्या ६९ व्या रेल्वे सप्ताह पुरस्कार सोहळ्यात नागपूर विभागाने सात पुरस्कार मिळविले आहे.

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरमवीर मीना यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण केंद्रात हा पुरस्कार सोहळा झाला. नागपूर विभागाला आंतरविभागीय कार्यक्षमता शिल्ड, सर्वोत्कृष्ट उद्यान देखभाल ट्रॉफी, लेखा ट्रॉफी, यांत्रिकी ट्रॉफी आणि स्वच्छता ट्रॉफी यासह अनेक प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले.

# द् नॉलेज हाऊस या ग्रंथालयाचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
उमरेड, दि. ३० :
शहरात झालेल्या ९९व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष, सुप्रसिद्ध साहित्यिक, रंगकर्मी प्रेमानंद गज्वी यांनी त्यांची कर्मभूमी भिवापूर तालुक्यातील कारगाव येथे स्थापन केलेल्या, बोधी द् नॉलेज हाउस या ग्रंथालयाचे उद्घाटन महाराष्ट्रातील विचारवंत ताराचंद्र खांडेकर यांचे हस्ते नुकतेच करण्यात आले.



यावेळी खांडेकर यांनी जागतिक ग्रंथ प्रेमी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रंथ प्रेमाचा आढावा घेत, प्रेमानंद गज्वी यांच्या, बोधी द् नॉलेज हाउस या संकल्पनेच स्वागत केलं. मुंबईसारख्या शहराकडे गेलेली माणसे सहसा आपल्या खेड्याकडे परत येत नाही. पण गज्वी यांनी तसे केले नाही. स्वखर्चाने त्यांनी गावातील नव्या पिढीसाठी, त्यांच्या मनात वाङ्मयप्रेम व्हावं आणि नवे साहित्यिक आणि कलावंत घडावेत या हेतूने, बोधी द् नॉलेज हाऊस स्थापना केली. या द्यनॉलेज हाऊस मध्ये विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, वाङ्मयकला व नाट्यकलेच्या विकासासाठी विशेष उपक्रम राबविले जातील.

याप्रसंगी नाट्य दिग्दर्शक नीलकांत कुलसंगे यांनीही आपले विचार मांडले. गज्वी यांच्या या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. प्रेमानंद गज्वी यांनीही आपले मनोगत केले. कार्यक्रमाचे संचालन काव्यकार इ.मो.नारनवरे यांनी केले. यावेळी गावातील नागरिकांसमवेत रोशन गजभिये, राजेश रामटेके, ॲड. एन.बी. रामटेके तसेच उमरेड येथील नाट्यअभिनेते रूपराव कामडी आदी मान्यवर उपस्थित होते.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ९० प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :
नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. सोमवार (30) रोजी शोध पथकाने 90 प्रकरणांची नोंद करून 59,200/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 33 प्रकरणांची नोंद करून 13,200/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 2 प्रकरणांची नोंद करून 200 रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 6 प्रकरणांची नोंद करून 2,400/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 18 प्रकरणांची नोंद करून 34,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 27 प्रकरणांची नोंद करून 5,400/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 4 प्रकरणांची नोंद करून 4,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.





तसेच उपद्रव शोध पथकाने धरमपेठ झोन अंतर्गत मॅक्स मंडळी यांच्या विरूध्द परवानगी शिवाय पाईप लाईन जोडण्यासाठी सर्व्हिस रोड खोदणे म्हणून मनपाच्या आदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल रु. 15,000/- चे दंड वसुल करण्यात आला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. गावंडे क्लासेस यांच्या विरूध्द विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. साईनाथ फूड्स तसेच गौरव स्वीट्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल प्रत्येकी रू. 5,000/- असे एकूण 10,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. उपद्रव शोध पथकाने 4 प्रकरणांची नोंद करून रू. 30,000/- दंड वसूल केला.

# सशस्त्र सेना ध्वजनिधी संकलनात सर्वांचा सहभाग मोलाचा : जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

सशस्त्र सेना ध्वजनिधी संकलनाच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांपर्यंत राष्ट्रभक्तीला घेऊन आपल्या परीने योगदान देण्याचा, अप्रत्यक्ष सहभाग घेण्याचा संस्कार पोहचविणे शक्य होते. विद्यार्थ्यांनी किती निधी दिला हे महत्वाचे नसून त्या-त्या संस्थांनी, शाळांनी विद्यार्थ्यांपर्यंत सैनिकांच्या योगदानाला कसे पोहचविले हे अधिक महत्वाचे आहे. जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रासह, शासकीय अधिकारी-कर्मचारी, उद्योजक, व्यापारी यांच्या इतकाच मुलांचा सहभाग अधिक महत्वाचा आहे. त्यादृष्टीने शिक्षण विभागाने सैनिकांप्रती कृतज्ञताभाव वृध्दींगत व्हावा यासाठी परिपूर्ण नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिले. यावेळी अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सेना मेडलने सन्मानित मेजर आनंद पाथरकर व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने सशस्त्र सेना ध्वजनिधी संकलनाचा शुभारंभ करण्यात आला. येथील औद्योगिक क्षेत्र, मिहान, विविध महामंडळे, उद्योजक, दाते यांच्या माध्यमातून राज्यातून प्रथम क्रमांकाचे उद्दिष्ट यावर्षी साध्य करु असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी व्यक्त केला. जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झालेल्या समारंभात गतवर्षी ध्वजनिधी संकलनात अधिक योगदान दिले त्या विभाग प्रमुखांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक सूरजकुमार रामोड, माध्यमिक शिक्षणाधिकारी रोहिणी कुंभार, प्राथमिक शिक्षणाधिकारी सिध्देश्वर काळुसे, जिल्हा खनिकर्म अधिकारी अतुल दोड, नगर भूमापन अधिकारी प्रशांत हांडे यांना त्यांच्या योगदानाबद्दल गौरविण्यात आले. याचबरोबर माजी सैनिकांच्या पाल्यांना विविध क्षेत्रात साध्य केलेल्या गुणवत्तेबद्दल 20 हजार रुपयांचा धनादेश व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यात आर्यन अविनाश मेश्राम, प्रांजली श्रीकृष्ण बावणे, किर्ती गंगाधर गोटीपट्टी यांनी इयत्ता दहावीमध्ये अनुक्रमे 97 टक्के, 91 टक्के व 90 टक्के गुण साध्य केल्याबद्दल त्यांना पुरस्कार देण्यात आले. गायत्री शरद कुबडे हीने बारावीमध्ये 89.80 टक्के गुण प्राप्त केले. जान्वी कालकाप्रसाद सुर्यवंशी या विद्यार्थीनी 86.67 टक्के गुण साध्य केले. चैतन्य रविशंकर खनगई या पाल्याने कोझीकोडे येथे आयआयटी मध्ये प्रवेश मिळविला. याला 1 लाख रुपयांचा धनादेश व प्रशस्तीपत्र देण्यात आले. माजी सैनिक, हवालदार रत्नाकर वामनराव ठाकरे यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांना 25 हजार रुपयांचा धनादेश व प्रशस्तीपत्र देण्यात आले. सहाय्यक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सत्येंद्र चवरे व इतर अधिकारी उपस्थित होते.

# अवैध दारूविक्रेत्यांवर पोलिसांची धाड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

थर्टीफस्टसाठी शहरातील अवैध दारूविक्रेते सक्रीय झाले आहेत. त्यांनी मोठ्याप्रमाणात मद्याचा साठा करून ठेवला आहे. अशात पोलिसांनीही त्यांच्याविरुद्ध कंबर कसली आहे. पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी गुन्हे शाखेच्या पथकांसह सर्व ठाणेदारांना त्यांच्या हद्दीतील अवैध धंद्यांवर कारवाईचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार शनिवारी गुन्हे शाखा युनिट 5 सह शहरातील विविध ठाण्याच्या पोलिसांनी अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाई करून मोठ्याप्रमाणात मद्यसाठा जप्त केला.

पहिली कारवाई गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने पारडी पोलिस ठाण्यांतर्गत केली. पथकाने गोपनिय माहितीवरून बाराद्वारी ते पारडी मार्गावर शिवम पानठेल्यासमोर सापळा रचला. एमएच-49/सीएच-5848 क्रमांकाच्या दुचाकीवर संशयितरित्या जात असलेल्या शिवकुमार अंबिका सिंग (24) रा. भरतनगर, कळमना याला अडविले. झडतीमध्ये त्याच्याजवळ देशी दारूच्या 90 एमएलच्या 200 बॉटल मिळाल्या. पोलिसांनी दारू आणि दुचाकी असा 87 हजारांचा माल जप्त करून शिवकुमारला ताब्यात घेतले. दुसरी कारवाईही युनिट 5 च्या पथकानेच जरीपटका पोलिस ठाण्यांतर्गत केली. गोपनिय माहितीवरून साई मंदिर चौकाजवळील श्री पान पॅलेसजवळील मोकळ्या जागेत धाड टाकण्यात आली. आरोपी सुजीत चंद्रमणी मेंढे (24) रा. अशोक चौक, पाचपावली हा ग्राहकांना दारू पिण्यासाठी जागा व साहित्य उपलब्ध करताना आढळला. पोलिसांनी त्याच्याकडून अर्धवट दारूच्या बॉटल, टेबल, खुर्ची, पाणी कॅन, ग्लास व इतर साहित्य जप्त केले.

तिसरी कारवाई एमआयडीसी पोलिसांनी ठाण्यांतर्गत सोनेगाव निपाणी येथे केली. गोपनिय माहितीवरून नीलेश गुलाब चाफले (38) याच्यावर धाड टाकून 90 एमएलच्या 11 बॉटल जप्त केल्या. चाफले याने गावातील चौकातच आपला अवैध दारूचा गुत्था थाटला होता.

चौथी कारवाई गिट्टीखदान पोलिसांनी केली. सुरेंद्रगड परिसरातील स्वागत पार्कजवळ धाड टाकून लक्की राजू शाहू (29) याच्याकडून देशी दारूच्या 12 बॉटल जप्त केल्या. पाचवी आणि सहावी कारवाई जरीपटका पोलिसांनी केली. बेझनबागच्या गौतमनगरात धाड टाकून मोरेश्वर रंगराव गजभिये (58) याच्यावर कारवाई करून देशी दारूच्या 23 बॉटल जप्त केल्या. तसेच बाराखोली परिसरात नाल्याजवळ धाड टाकून निकेश लीलाधर राऊत (26) याला 15 बॉटल देशी दारूसह पकडले.

सातवी कारवाई कोराडी पोलिसांनी केली. महादुलाच्या सार्वजनिक शौचालयाजवळ धाड टाकून रमेश आनंद गवळी (28) याला 29 बॉटलसह पकडले. आठव्या कारवाईत कळमना पोलिसांनी चिखली झोपडपट्टीत धाड टाकून मोनू अज्जू शेख (34) याच्याकडून देशीदारूच्या 14 बॉटल जप्त केल्या. नववी कारवाई कपिलनगर पोलिसांकडून करण्यात आली.

समतानगरच्या अनवर लेआऊट परिसरात अल्केश भोतमांगे नावाचा व्यक्ती अवैधरित्या देशी दारूची विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून पोलिसांनी तेथे धाड टाकली असता अल्केश अवैधरित्या दारूची विक्री करताना मिळाला. पोलिसांनी त्याच्याकडून 15 बॉटल जप्त केल्या. या कारवाईने शहरातील अवैध दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. ही कारवाई पुढेही अशीच सुरू राहिल अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

## अल्पवयीन वाहन चोर जाळ्यात

**नागपूर :** गुन्हे शाखा युनिट 5च्या पथकाने गस्तीदरम्यान मोटारसायकलने संशयितरित्या जात असलेल्या अल्पवयीनला ताब्यात घेतले. चौकशीत ती मोटारसायकल चोरीची असल्याचा खुलासा झाला. शनिवारी रात्री 10 वाजताच्या सुमारास युनिट 5 चे पथक मानकापूर ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान अल्पवयीन आरोपी एमपी-22/एमएच-7322 क्रमांकाच्या मोटारसायकलने संशयास्पदरित्या जाताना दिसला. पोलिसांनी त्याला थांबवून वाहनाची कागदपत्रे मागितली असता तो उडवा-उडवीची उत्तरे देऊ लागला. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने ती मोटारसायकल कन्हान येथून चोरी केल्याची माहिती दिली. मानकापूर ठाण्यात आणून अभिलेख तपासला असता कन्हान पोलिस ठाण्यात वरील क्रमांकाचे वाहन चोरीचा गुन्हा दाखल होता.

# अंजार खान रॉयल चेस क्लबच्या पहिल्या शास्त्रीय बुद्धिमत्ता स्पर्धेचा विजेता

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

रॉयल चेस क्लबने अभिमानाने आपल्या पहिल्या-वहिल्या शास्त्रीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन केले, ही एक रोमांचक स्पर्धा आहे ज्याने संपूर्ण प्रदेशातील बुद्धिबळप्रेमींना एकत्र आणले. स्पर्धेमध्ये 30-सेकंद वाढीसह 30-मिनिटांच्या वेळेचे नियंत्रण होते, ज्यामुळे चार तीव्र फेऱ्यांमध्ये आव्हानात्मक आणि आकर्षक स्पर्धा सुनिश्चित होते.

निर्विवाद चॅम्पियन म्हणून उदयास आलेल्या, अन्जार खानने अपवादात्मक कौशल्य आणि रणनीती दाखवून त्याच्या सर्व प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले आणि अव्वल स्थान मिळवण्यासाठी परिपूर्ण गुण मिळवले.




उर्वरित स्थानांसाठी स्पर्धा तितकीच चुरशीची होती, खेळाडूंनी 2 ते 5 वे स्थान पटकावले - नितेश शाह, गौतम मेश्राम, अन्वित सोनटक्के आणि अथर्व निंबाळकर - सर्वांनी 4 पैकी 3 गुण मिळवले. टायब्रेक सिस्टीमने त्यांची अंतिम स्थिती निश्चित केली आणि प्रत्येकाला त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन पदक देण्यात आले.

अशोक बनसोड आणि हरीश मुकरुते या मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली. समर्पित संघ सदस्य कुणाल सुदामे आणि श्याम अग्रवाल यांच्या अतुलनीय पाठिंब्याने स्पर्धेचे संचालक पुज्जम बनसोड यांच्या नेतृत्वाखाली ही स्पर्धा अतिशय काळजीपूर्वक पार पडली.

या उद्घाटन कार्यक्रमाचे यश रॉयल चेस अकादमीसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे आणि बुद्धिबळ प्रतिभाला चालना देण्यासाठी आणि खेळासाठी एक दोलायमान समुदाय निर्माण करण्याची आपली वचनबद्धता अधोरेखित करते.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत सहचालकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

रस्ता ओलांडताना अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत एका व्यक्तीचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. ही घटना हिंगणा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. सेंथीलकुमार एम. मनी (44) रा. उमाकोंडापट्टी, तामिळनाडू असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी रमेश वरधरासू (44) रा. ईल्लुपूर, तामिळनाडूच्या तक्रारीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. फिर्यादी रमेश हे ट्रक चालक आहेत, तर मृतक सेंथीलकुमार हा त्यांचा सहचालक होता. दोघांनीही उत्तरप्रदेश येथे ट्रक क्र. टीएन-52/एडी-7098 मध्ये प्लायवूड व कापड लोड केले आणि तामिळनाडूला परतत होते. शनिवारी रात्री 8 वाजता ट्रक घेऊन ते नागपुरात पोहोचले. वर्धा मार्गावर संदेश सिटीजवळील एचएनआर पेंट्रोल पंपवर त्यांनी काहीतरी खाऊन घेण्यासाठी त्यांनी ट्रक थांबवला. सेंथील ट्रकमधून खाली उतरला आणि नास्ता आणण्यासाठी गेला. रस्ता ओलांडून दुसऱ्या बाजूला जात असताना भरधाव असलेल्या वाहनाच्या चालकाने त्याला जबर धडक दिली आणि पळून गेला. सेंथील गंभीर जखमी झाला. रमेश यांनी लोकांच्या मदतीने त्याला उपचारार्थ एम्स रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# सौर पॅनेलच्या कचऱ्याचा प्रश्न ऐरणीवर

## उत्तर प्रदेशातील शेतकऱ्याच्या याचिकेनंतर एनजीटीची केंद्राला नोटीस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

निकामी सौर पॅनेलची अयोग्य विल्हेवाट आणि त्यांचा पुनर्वापर या मुद्द्यांवरून नुकत्याच झालेल्या सुनावणीदरम्यान राष्ट्रीय हरित लवादाने केंद्रावर ताशेरे ओढले. तसेच नोटीस बजावून त्यांना उत्तर द्यायला सांगितले आहे. उत्तर प्रदेशातील एका शेतकऱ्याने वापरलेल्या सौर पॅनेलच्या योग्य विल्हेवाटीची कोणतीही सुविधा नसल्याचा दावा करीत राष्ट्रीय हरित लवादाकडे (एनजीटी) याचिका दाखल केली होती. या याचिकेची लवादाने दखल घेतली.



लवादाचे अध्यक्ष न्या. प्रकाश श्रीवास्तव आणि तज्ज्ञ सदस्य ए. सेंथिल वेल यांच्या खंडपीठासमोर २३ डिसेंबरला सुनावणी झाली. याचिकाकर्त्या शेतकऱ्याच्या उत्तर प्रदेशातील गावामध्ये २०१९पासून कुसुम योजने अंतर्गत सिंचनासाठी ऊर्जा निर्माण करण्याकरिता सौर पॅनेलचा वापर केला जात आहे. हे सौर पॅनेल निकामी झाल्यानंतर त्यांच्या विल्हेवाटीची कोणतीही व्यवस्था नाही अशी तक्रार याचिकाकर्त्याने केली आहे. सुनावणी दरम्यान लवादाने सौर पॅनेलच्या व्यवस्थापनातील त्रुटी अधोरेखित केल्या. या सौर पॅनेलची दुरुस्ती करणे शक्य नाही, त्याची भंगार म्हणून विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. मात्र, ते नेमके टाकायचे कुठे, याबाबत कोणतीही व्यवस्था नाही. कारण, हे सौर पॅनेल जमिनीत गाडले तर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊन मातीची गुणवत्ता ढासळते, याकडे याचिकेत लक्ष वेधण्यात आले आहे. त्याबरोबरच मर्यादित भंगार मूल्य असलेल्या पॅनेलसह विविध मुद्देही उपस्थित करण्यात आले आहेत.

लवादाने या प्रकरणात पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, तसेच नवीन आणि अक्षय ऊर्जा मंत्रालयाच्या सचिवांना प्रतिवादी ठरवून त्यांच्यावर ताशेरे ओढले. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि उत्तर प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल खात्याच्या लखनौ क्षेत्रीय कार्यालयाच्या सदस्य सचिवांवरही या प्रकरणी ठपका ठेवण्यात आला आहे. पुढील सुनावणी १० फेब्रुवारीला होणार आहे.

भंगार विक्रेते सौर पॅनेलचे केवळ ॲल्युमिनियम, तांबे आणि काचेचे घटक स्वीकारतात. त्याव्यतिरिक्त पॅनेलमध्ये शिसे आणि कॅडमियमसारखे जड धातू असतात. ते तसेच फेकून दिल्यास माती आणि पाण्यात मिसळू शकतात. त्यामुळे पर्यावरणाचे दीर्घकालीन नुकसान होऊ शकते. खराब झालेल्या सौर पॅनेलची सुरक्षित विल्हेवाट किंवा पुनर्वापरासाठी कोणतीही प्रस्थापित यंत्रणा नाही असे लवादाने नमूद केले.

# महाकुंभासाठी पाच विशेष रेल्वेची सुविधा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

प्रयागराज महाकुंभ मेळ्याकरिता दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या पाच रेल्वेंना नागपूर मंडळातील गोंदिया, बालाघाट व नैनपूर स्थानकावर थांबे देण्यात आले आहेत. महाकुंभ मेळ्याकरिता देशभरात तीन हजार विशेष रेल्वे चालविल्या जाणार आहे. दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळातील गोंदिया, बालाघाट व नैनपूर स्थानकावरुन रेल्वेव्दारे मेळ्याला जाता येणार आहे.



संबंधित पाचपैकी कन्याकुमारी-गया- कन्याकुमारी (०६००५/०६००६) रेल्वे कन्याकुमारी येथून ६ व २० जानेवारी रोजी रात्री ८.३० वाजता तर, गया येथून ९ व २३ जानेवारी रोजी रात्री ११.५५ वाजता, कोच्चुवेली-गया- कोच्चुवेली (०६०२१/०६०२२) रेल्वे कोच्चुवेली येथून ७ व २१ जानेवारी आणि ४ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता तर, येथून १० व २४ जानेवारी आणि ७ फेब्रुवारी रोजी रात्री ११.५५ वाजता, चेन्नई- गोमती नगर-चेन्नई (०६००१/०६००२) रेल्वे चेन्नई येथून ८, १५ व २२ जानेवारी आणि ५, १९ व २६ फेब्रुवारी रोजी दुपारी २.२० वाजता तर, गोमतीनगर येथून ११, १८ व २५ जानेवारी, ८ व २२ फेब्रुवारी व १ मार्च रोजी ३.४५ वाजता, कन्याकुमारी-बनारस कन्याकुमारी (०६००३/०६००४) रेल्वे कन्याकुमारी येथून १७ फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० वाजता तर, बनारस येथून २० फेब्रुवारी सायंकाळी ६.०५ वाजता, ०६००७/०६००८ कोच्चुवेली-बनारस-कोच्चुवेली (०६००७/ ०६००८) रेल्वे कोच्चुवेली येथून १८ व २५ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता तर, बनारस येथून २१ व २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.०५ वाजता प्रस्थान करणार आहे.

देशभरातून १३ हजार रेल्वे प्रयागराज महाकुंभाला जाणार आहेत. भाविकांना आपापल्या सोयीच्या ठिकाणाहून त्या रेल्वे पकडता येतील, अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

## भास्कर केदारे यांचा सामाजिक कार्यांबद्दल सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

हलबा जमात मैरेज ब्यूरो, तर्फे नागपूरचे अध्यक्ष भास्कर सदाशिवराव केदारे यांचा सामाजिक कार्यांबद्दल सुभाष कोटेचा, सदस्य, राष्ट्रीय परिषद, न्यू दिल्ली तसेच संस्थापक अध्यक्ष, सर्व मानव सेवा संघ, नागपूर यांचे तर्फे भारत मातेची प्रतिमा देवुन दि.27.12.2024 ला त्यांच्या गुरुदेव नगर, नवीन नंदनवन, नागपूर येथील कार्यालयात सामाजिक कार्योबद्दल सत्कार करन्यात आला. या वेळी उपस्थित हेमंत केदारे, वर्षा केदारे ,शुभम केदारे व कार्यालयातील कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# मंगलदीपनगरात १६.७० लाखांची घरफोडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

संपूर्ण कुटुंब लग्नाच्या स्वागत समारंभासाठी गेले असता अज्ञात आरोपींनी दाराचा कडीकोंडा तोडून रोख 11 लाख व 5 लाख रुपये किंमतीच्या दागिन्यांसह एकूण 16 लाख 70 हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही खळबळजनक घटना हुडकेश्वर पोलिस ठाण्यांतर्गत मंगलदीपनगरात घडली. या प्रकरणी पोलिसांनी अल्पेश बंडूजी ठाकरे (28) च्या तक्रारीवरून अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदविला आहे.

अल्पेश यांची शेती आहे आणि ते प्रॉपर्टी डिलिंगचे काम करतात. शुक्रवारी 27 डिसेंबर रोजी त्यांचे लग्न होते. शनिवारी घोगली परिसरातील निलकंठ लॉन येथे स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण ठाकरे कुटुंब आणि पाहुणे सायंकाळी 7.30 वाजताच्या सुमारास घराला कुलूप लावून स्वागत समारंभासाठी लॉनमध्ये गेले होते. घरी कोणीच नसल्याची संधी साधून अज्ञात आरोपींनी मागच्या दाराचा कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. घरी लग्नात मिळालेल्या भेटवस्तू व पैशांची पाकिटे ठेवलेली होती. चोरांनी दोन बेडरूमच्या कपाटात ठेवलेली 11 लाखांची रोकड, सोन्याचे दागिने व पैशांची पाकिटे असा एकूण 16,70,000 रुपयांचा माल चोरी केला आणि पसार झाले. रात्री 12.30 वाजताच्या सुमारास ठाकरे कुटुंब कार्यक्रम आटोपून घरी परतले असता मागचे दार उघडे होते. घरातील सर्व सामानही अस्तव्यस्त होते.

दोन्ही कपाटही उघडे होते आणि त्यातील दागिने व रोकड गायब होती. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. हुडकेश्वर पोलिस घटनास्थळी पोहोचले. मोठी चोरी असल्याने अंगुलीमुद्रा पथकालाही पाचारण करण्यात आले.

अंगुलीमुद्रा पथकाने घराची पाहणी करून ठसे घेतले. पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. आसपासच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज पाहून आरोपींचा सुगावा लावण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# धरमपेठ झोनमधील सर्व प्रभागांमध्ये स्वच्छता जनजागृती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने धरमपेठ झोनमधील सर्व प्रभागांमध्ये स्वच्छता जनजागृती अभियान राबविण्यात आले. नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व समजावून देणे आणि समाजात स्वच्छतेची चांगली सवय रुजविणे, या उद्देशाने संपूर्ण शहरात हे अभियान राबविण्यात येत आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार व अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांच्या मार्गदर्शनामध्ये धरमपेठ झोनमध्ये राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. याप्रसंगी उपायुक्त प्रकाश वराडे, झोनल अधिकारी श्री. दिनदयाल टेंभेकर उपस्थित होते.



धरमपेठ झोनमधील स्वच्छता जनजागृती अभियानामध्ये प्रत्येक प्रभागामध्ये स्वच्छता रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शालेय विद्यार्थी, स्थानिक नागरिक आणि मनपा कर्मचारी सहभागी झाले. या रॅलीमधून नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याचे आणि स्वच्छतेला जीवनाचा भाग बनवण्याचे संदेश देण्यात आले. विविध ठिकाणी पथनाट्य देखील सादर करण्यात आले. या पथनाट्यांद्वारे माय पॉकेट माय बिन आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर संदेश देण्यात आले. नागरिकांना कचरा सार्वजनिक ठिकाणी न फेकता कचरा पेटीत टाकण्याचे, तसेच कचरा पेटी नसल्यास कचरा आपल्या खिशामध्ये ठेवून योग्य ठिकाणी फेकण्याचे महत्त्व सांगितले. धरमपेठ झोनमधील विविध प्रभागांमध्ये स्मार्ट टॉयलेट्सवर स्वच्छतेबाबत जागरूकता अभियान राबविण्या आले. या अभियानात सार्वजनिक शौचालयांचा योग्य वापर, स्वच्छतेचे महत्त्व आणि स्वच्छतेला सवय म्हणून स्वीकारण्यावर भर देण्यात आला. स्वच्छतेबद्दल एकता आणि प्रतिबद्धता दर्शवण्यासाठी प्रत्येक प्रभागात मानवी साखळी तयार करण्यात आली. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, नागरिक आणि अधिकारी सहभागी झाले आणि स्वच्छतेचा संदेश दिला.

नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे. सार्वजनिक ठिकाणी कचरा व्यवस्थापनासाठी नागरिकांना प्रोत्साहित करणे. स्वच्छ शौचालयांचा योग्य वापर वाढविणे. स्वच्छतेला समजिक जीवनाचा अविभाज्य भाग बनवणे, हा या अभियानाचा उद्देश होता. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता वाढली. विशेषतः विद्यार्थी आणि तरुणांनी स्वच्छता मोहिमेतील भागीदारी दर्शवली आहे. ही मोहीम नागपूर महानगरपालिकेच्या स्वच्छ भारत मिशनच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरली आहे.